

# कमला

ताराराणी विद्यापीठाचे कमला कॉलेज, कोल्हापूर.

# क्रीडाक्षेत्रांतील विजयिनी :



व्हॉलीबॉल व बास्केट बॉल यांचे विजेते संघ मा. प्राचार्य समवेत



।। निर्मातुं शिव सुंदरम् ।।

# कमला

तारारा‌णी विद्यापीठाच्या

कमला कॉलेजचे

## नियतकालिक

द्वितीय अंक

१९८६-८७

# संपादक मंडळ

अध्यक्ष :

**प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार रं. पाटील**

प्रमुख संपादक :

**प्रा. सौ. वरदा माडगूळकर**

**विभागीय संपादक**

मराठी विभाग :

**प्रा. कु. मीना भोसले**

हिंदी विभाग :

**प्रा. सौ. सुमित्रा पोवार**

इंग्रजी विभाग :

**प्रा. जे. बी. पाटील**

विद्यार्थिनी प्रतिनिधी :

**कु. राजश्री भोजे**

---

❋ या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ज्योत ही पौरुषाची



**सम्राज्ञी ना, समरकुशला लोकनेत्रि प्रतापी**
**सत्तांधांना नमवुनि रणीं आपलें राज्य स्थापी**
**नारी नोहे अमर जगींत ज्योत ही पौरुषाची**
**ताराराणी जननि अमुच्या अस्मितेची, यशाची !**

ग. दि. माडगूळकर



**मा. श्री. व्ही. टी. पाटील तथा काकाजी**
संस्थापक, अध्यक्ष– ताराराणी विद्यापीठ

दंपती



कै. सौ. सरोजिनीदेवी तथा कमला विश्वनाथराव पाटील

जन्म– २८–४–१९०९ मृत्यू–१८–७–१९६९

# कार्याची तडफ



प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील
एम. ए., पी. एच. डी.

# संपादकीय . . .

## हितगुज

जैसी कमळ कलिका जाले पणे ।
हृदयीचिया मकरंदाते राखो नेणे ।
हे राया रंका पारणे । आमोदाचे ।।

'कमला' या नियतकालिकाचा द्वितीय अंक सादर करीत असताना ज्ञानदेवांच्या वर उद्‌धृत केलेल्या ओवीचा साक्षात्कार मनाला होत आहे. अवघ्या चार वर्षांच्या कालखंडात या महाविद्यालयाचा कीर्तीसौरभ चोहोकडे दरवळू लागला आहे. ज्ञान, कला, क्रीडा या सर्वच आघाडयावर या कॉलेजने स्पृहणीय यश संपादन केले आहे.

### १. ती. काकाजींच्या आकांक्षाची झेप

या यशाचे प्रमुख शिल्पकार ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष मा. व्ही. टी. पाटील तथा काकाजीच आहेत. ती. काकाजींनी गेली ४०–४५ वर्षे ताराराणी विद्यापीठातील विविध शिक्षणसंस्थांचा संसार सुखाचा व्हावा म्हणून आपला देह चंदनासारखा झिजविला आहे. ती. काकाजी हे आता वयाच्या ८७ व्या वर्षात आहेत. आजही त्यांच्या आकांक्षाची झेप संपलेली नाही. नव्या नव्या कल्पनांच्या भराऱ्या त्यांची प्रतिभा अजूनही घेत असते. आणि त्या भराऱ्यांची पूर्ती करण्यासाठी ती. काकाजी आजही जिवापाड दौड करीत आहेत. बालभवन पासून तो पदव्युत्तर शिक्षणापर्यंत ( 'के-जी टू पी-जी' ) सोय ताराराणी विद्यापीठात झाली पाहिजे, अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे. म्हणूनच 'ताराराणी महिला विद्यापीठाचे' भव्य दिव्य स्वप्न साकार करण्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न सुरू आहेत.

ती. काकाजींची अनेक स्वप्ने साकार करण्यात त्यांच्या पत्नी कै. सौ. कमलादेवी विश्वनाथराव पाटील तथा कै. सौ. काकीजी यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांनी हिंदू पतिव्रतेच्या निष्ठेने आपल्या पतीच्या पावलांचे अनुसरण केले. आपल्या पोटी संतान नाही याची मनात खंत तर बाळगली नाहीच, उलट आपली मालमत्ता औदार्याने ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकली. या अलौकिक त्यागाचे, निरपेक्ष दातृत्वाचे चिरंतन स्मारक म्हणजे 'कमला कॉलेज' आहे. या अलौकिक दंपतीपुढे माथा नम्र करूनच या संपादकीयाची ही चार अक्षरे लिहिण्याचे धाडस करीत आहे.

### २. कमला कॉलेजची वाटचाल

१९८३ जूनमध्ये उषाराजे कला आणि वाणिज्य ज्युनिअर कॉलेजची स्थापना करण्यात आली. या ज्युनिअर कॉलेजचे द्वितीय वर्ष संपन्न होत असतानाच 'कमला' कॉलेजची मुहूर्तमेढ महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. वसंतरावदादा पाटील यांच्या शुभ हस्ते रोवली गेली. १९८६–८७ या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शासनाच्या आदेशानुसार ज्युनिअर कॉलेज कमला कॉलेजशी संलग्न करण्यात आले. कमला कॉलेजचे नेतृत्व गेली तीन वर्षे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील मोठ्या कार्यकुशलतेने आणि तडफदारपणे करीत आहेत. सध्या या कॉलेजमध्ये ११ वी कला, वाणिज्य पासून तृतीय वर्ष कला आणि वाणिज्य पर्यंतचे सर्व वर्ग चालविण्यात येतात.

तृतीय वर्ष, कला शाखेकडे अर्थशास्त्र आणि समाजशास्त्र व तृतीय वर्ष वाणिज्य शाखेकडे औद्योगिक व्यवस्थापन या विषयाची सोय विशेष स्तरावर करण्यात आली आहे. पुढील वर्षी आणखी काही विषय विशेष स्तरावर सुरू करण्याची व्यवस्थापनाची उमेद आहे.

### ३. ग्रंथालयाची वास्तू

कमला कॉलेजच्या आकर्षक आणि भव्य इमारतीलगतच सुसज्ज अशी २ लाख रुपये किंमतीची ग्रंथालयाची इमारत बांधण्यात आली. या ग्रंथालयामध्ये निरनिराळे संदर्भग्रंथ पाठ्य-पुस्तके, नियतकालिके आणि वर्तमानपत्रे, विद्यार्थिनी आणि प्राध्यापकवर्गासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यांचा लाभ विद्यार्थिनी आणि प्राध्यापक यांना नित्यश: होत असतो.

### ४. संख्यात्मक व गुणात्मक वाढ

यावर्षी कमला कॉलेजातील विद्यार्थिनींची संख्या ७०० च्या वर गेली. कोल्हापूर शहरातील मुलींच्या महाविद्यालयाची गरज यामुळे सिद्ध झालीच आहे. यंदा ११ वी कला आणि वाणिज्य या शाखेकडे मुलींनी इतक्या प्रचंड संख्येने प्रवेश घेतला की, त्यामुळे नाईलाजाने काही मुलींना प्रवेश नाकारावा लागला. आमच्या कॉलेजातील ही वाढ केवळ संख्यात्मक नसून गुणात्मकही आहे. यंदाही आमच्या कॉलेजने निकालांची उज्ज्वल परंपरा राखली आहे. निकाल पुढीलप्रमाणे –

१२ वी कला ५१ टक्के

१२ वी वाणिज्य ६२ टक्के

प्रथम वर्ष कला ९८ टक्के
प्रथम वर्ष वाणिज्य ६८ टक्के

द्वितीय वर्ष कला ९२ टक्के
द्वितीय वर्ष वाणिज्य ७५ टक्के

या निकालावरून विद्यार्थिनी व प्राध्यापक यांनी यासाठी केलेले परिश्रम व प्राचार्यांचे अचूक मार्गदर्शन यांची प्रचिती येते.

### ५. क्रीडाक्षेत्रातील यश

महाराष्ट्रातील क्रीडाजगतामध्ये तारा-राणी विद्यापीठाचे नाव गेली कित्येक वर्षे गाजत आहे. कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनीही क्रीडाजगतात मातृसंस्थेच्या लौकिकाला साजेल असेच यश संपादन केले आहे. ज्युनिअर कॉलेजच्या संघाने शहर पातळीवर बास्केटबॉल, व्हालीबॉल, ॲथलॅटिक्स व टेबलटेनिस स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. यामध्ये बास्केटबॉलच्या संघाने विजेतेपद मिळविले. व्हॉलीबॉलचा संघ जिल्हा पातळीवर उपविजेता ठरला. ॲथलॅटिक्स-मध्ये कु. सुवर्णा डोईजड हिने शहर पातळीवर उंच उडीमध्ये पहिला तर जिल्हा पातळीवर दुसरा क्रमांक पटकाविला. टेबल-टेनिसमध्ये कु. कविता टेंगशे आणि कु. मृदुला बोकील यांच्या संघाने शहर पातळीवर तसेच विभागीय स्तरावर आणि राज्य स्तरावरही अजिंक्यपद मिळविले. कु. कविता टेंगशे हिने राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करून टेबल-टेनिसमध्ये महाराष्ट्राला दुसरा क्रमांक व रौप्यपदक मिळवून दिले. सिनिअर कॉलेजच्या कु. सुनीता कोळेकर आणि ज्युनिअर कॉलेजची कु. नंदा भोसले यांनी वेटलिफ्टींग, थाळीफेक व भालाफेक या स्पर्धामध्ये क्रीडाक्षेत्रात अनेक विक्रम नोंदविले.

### ६. विविध उपक्रम

अभ्यास, क्रीडा याप्रमाणे आमच्या विद्यार्थिनींनी निरनिराळ्या उपक्रमात सहभागी होऊन ते यशस्वी केले.

**राष्ट्रीय सेवा योजना :** राष्ट्रीय सेवायोजने मध्ये १५० विद्यार्थिनींनी योगदान दिले. गतवर्षी १०० विद्यार्थिनींचे युनिट होते. यावर्षी आणखी

५० विद्यार्थिनींचे दुसरे युनिट देण्यात आले. मौजे चिंचवाड या दत्तकखेड्यात झालेल्या शिबिरामध्ये वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, ग्रामसफाई गाजरगवतनिर्मूलन इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये आमच्या विद्यार्थिनींनी सक्रीय भाग घेऊन ते यशस्वी केले.

**प्रौढ साक्षरता योजना** : प्रौढ साक्षरतेच्या कार्यामध्ये आमच्या कॉलेजातील ९२ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. या कॉलेजामार्फत गेल्या वर्षी ५ प्रौढ साक्षरता केंद्रे सुरू करण्यात आली होती. त्यामध्ये यावर्षी आणखी ५ केंद्रांची भर पडली. शिवाजी विद्यापीठामार्फत आमच्या कॉलेजमध्ये संघटक प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

**एन. सी. सी.** : एन्. सी. सी. युनिटमध्ये एकूण ३५ विद्यार्थिनी आहेत. त्यापैकी ३० मुलींची निवड वारणानगर येथे आयोजित केलेल्या कँपसाठी झाली होती. ३ विद्यार्थिनींची अमरावती येथे झालेल्या एन्. सी. सी. बास्केट बॉल स्पर्धामध्ये निवड करण्यात आली होती.

## ७. प्राध्यापक प्रबोधिनी

प्राध्यापकांनी आपल्या विषयाचा व्यासंग करून त्यासंबंधी आपले विचार प्रकट करावे यासाठी 'प्राध्यापक प्रबोधिनी' नावाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. यामध्ये प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्रा. श्री. जाधव, प्रा. सौ. मगदूम यांनी आपले विचार प्रकट केले.

## ८. अभिनंदन

दिल्ली येथील National Institute of Educational Administration and Planning या संस्थेच्यावतीने भारतातील सर्व विद्यापीठातून प्राचार्यासाठी Orientation Programme In Educational Planning And Administration For College Principals आयोजित करण्यात आला होता. यासाठी आमच्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांची शिवाजी विद्यापीठातर्फे निवड करण्यात आली होती. याचा आम्हाला अभिमानपूर्वक उल्लेख करावासा वाटतो.

आमच्या कॉलेजमधील अर्थशास्त्राचे व्यासंगी प्राध्यापक श्री. शितोळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शिक्षणसेवा वर्ग १ मध्ये शिक्षणाधिकारी म्हणून निवड झाली. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

## ९. 'गुंजारव'

विद्यार्थिनींच्या अंगातील साहित्यिक गुणांना वाव मिळावा म्हणून 'गुंजारव' नावाचे भित्तीपत्रकही सुरू करण्यात आले आहे. त्यातील उत्कृष्ट साहित्य आम्ही आमच्या 'कमला' नियतकालिकासाठी निवडतो. सातारा येथील 'युवकमुद्रा' या नियतकालिकाच्या विद्यमाने महाविद्यालयीन नियत कालिकांची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये आमच्या 'कमला' या नियतकालिकाला तीन पारितोषिके मिळाली, याचा सानंद उल्लेख करीत आहे.

## १०. कृतज्ञता

प्रस्तुत नियतकालिक संपादित करीत असताना ज्या अनेक सहकाऱ्यांची मदत झाली त्यांचे मन:पूर्वक आभार मानते. विशेषत: विभागीय संपादक प्रा. कु. मीना भोसले, प्रा.सौ. सुमित्रा पोवार व प्रा.श्री. जे.बी. पाटील यांच्याशिवाय हे कार्य तडीस जाणे अशक्य होते. कमला कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

'कमला'च्या द्वितीय अंकांचे सुरेख मुखपृष्ठ श्री. किरण जोशी कमर्शिअल डिझायनर यांनी

तयार केले आहे. त्यांच्या अर्थपूर्ण मुखपृष्ठाने 'कमला' ची मोहकता वाढली आहे. ' राजहंस ' प्रिंटर्सच्या चालकांनी व त्याच्या कामगार बंधूंनी हे मासिक अल्पकाळात छापून दिले. त्यांचे मन:पूर्वक आभार,

**११. समारोप** : वसंतऋतूच्या दर-वर्षीच्या प्रारंभी ' कमला ' मासिकाचे अंक असेच निघत राहाणार आहेत. जुन्या विद्यार्थिनी पदवी घेऊन बाहेर पडणार आहेत. तशा अल्लड चैतन्याने बहरलेल्या नव्या विद्यार्थिनी कॉलेजात प्रवेश करणार आहेत. ही बकुळीची माळ अनादिकाळ गुंफली जाणार आहे. जुन्या कळ्या सुकून जातील. परंतु, त्यांचा सुगंध मात्र कायमच राहील. या अंकापेक्षाही अधिकाधिक दर्जेदार साहित्याने नटलेले 'कमलां'चे अंक वाचकांच्या भेटीस येतीलच. तथापि, या बकुळ माळेतील एक लहानशी कळी आपण आपल्या हाताने गुंफली होती याचे चिरंतन समाधान प्रस्तुत संपादिकेस मिळत राहील.

करविली तैशी केली कटकट ।
वाकडी का नीट देव जाणे ।।
कोणाच्या कारणे जाले हे निर्माण ।
देवाचे कारण देव जाणे ।
तुका म्हणे मी अभिमानावेगळा ।
घालूनी गोपाळा भार असे ।।

**प्रा. सौ. वरदा माडगूळकर**
प्रमुख संपादिका



जैसी हरळांमाजि रत्नकिळा ।
कि रत्नांमाजि हिरा निळा ।
तैसी भासांमाजि चोखाळा ।
भासा मराठी ।।
जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी ।
कि परिमळांमाजि कस्तुरी ।
तैसी भासांमाजि साजिरी ।
मराठिया ।।
पखियामधें मयोरू ।
व्रूखिआंमधें कल्पतरू
भासांमधें मानु थोरू ।
मराठियेसि ।।

– फादर थॉमस स्टीफन्स

# मराठी विभाग

# कमलदले

## गद्य–परिमल


१) एक त्यागी जीवन–ती. कै. सौ. काकाजी — कु. माधुरी कोण्णूर
२) बाळ तू कुठे रे आहेस ? — कु. निशा भांडवले
३) महात्मा फुले–एक द्रष्टा सुमाजसुधारक — कु. वंदना बनसोडे
४) परतीची वाट — कु. पौर्णिमा विचारे
५) वनदेवतेच्या सहवासात — कु. अनघा हावळ
६) हुंडा एक ज्वलंत समस्या — कु. मधुमती रणनवरे
७) गोमंतकीय कवी- बा. भ. बोरकर — कु. संहिता शास्त्री
८) मुग्ध श्रावण मास — कु. प्रतिमा कुंभारे
९) 'उपरा'मधून जाणवणारा कैकाडी समाज — कु. मधुजा केळकर
१०) संगम हवा–जुन्याचा — कु. मिनाक्षी गायकवाड
११) मृत्यू एक महान वर — कु. अंजली कुलकर्णी
१२) कासऱ्याच्या येढयात — कु. सुजाता संकपाळ
१३) प्रदूषण — कु. शोभा पाटील
१४) दहाव्या एशियाडमधील भारताचे स्थान — कु. विद्या पाटील
१५) प्रौढ साक्षरता एक काळाची गरज — कु. स्मिता हसबनीस
१६) विकृती आणि सामाजिक दृष्टिकोन — कु. अनिता लटके


## काव्यगंध


१) परमेश्वरच कोठे आहे ? — कु. माधुरी कोण्णूर
२) वर्ष — कु. वैशाली यादव
३) उषःकाल — कु. शोभा पाटील
४) पान — कु. अनघा हावळ
५) फुलविले गुलाब ज्यानी — कु. निशा भांडवले
६) रूपे मानवाची — कु. उज्वला गाठ
७) सावली — कु अरूंधती राजे
८) प्रश्नचिन्ह — कु. शोभा पाटील


## पराग


१) राष्ट्रीय सेवा योजना — कु. अनुराधा साळोखे
२) मराठीची असे माझी मायबोली — कु. सुनिता अपराज
३) भारतातील पारंपारिक नृत्य प्रकार — कु. पद्मश्री अथणे
४) स्वागताच्या काही पद्धती — वैशाली मोहिते

# १) एक त्यागी जीवन– ती. कै. सौ. काकीजी

कु. माधुरी कोन्नूर
द्वितीय वर्ष, कला

चैत्रातली प्रसन्न सकाळ उमलत असते. हळूहळू सुर्याच्या किरणशलाका आपले तेज उधळीत येत असतात कमला कॉलेजकडे विद्यार्थिनींचे थवेच्या थवे लगबगीने जात असतात. या विद्यार्थिनींच्या मध्ये मी पण एक असते. आम्ही ताराराणीच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश करतो आणि प्रथमतः आमच्या दृष्टीस पडतो तो आमच्या अस्मितेची जननी असलेला महाराणी ताराराणीचा पुतळा. सुप्रसन्न सकाळी ताराराणी साहेबांच्या त्या पुतळ्याकडे पाहिले की, आमच्या मध्येसुद्धा एकप्रकारचे ओज, तेज निर्माण झाल्याची प्रचिती येते. आम्ही झपावतच ताराराणी विद्यापीठाच्या इमारतीच्या पायऱ्या चढतो. एक मिनिटातच तीन मजले पार केले जातात. ते एका असामान्य, अलौकिक अशा त्यागी जीवनाच्या दर्शनासाठी. हे समर्पित जीवन आमच्या ती. कै. सौ. काकीजींचे. ती. कै. सौ. काकीजींचे एक मोठे छायाचित्र आमच्या कमला कॉलेजच्या प्रवेशद्वारासमोर लावलेले आहे. दररोज त्यांच्या दर्शनाने आमची शैक्षणिक वाटचाल सुरू होत असते.

ती. कै. सौ. काकीजी म्हणजे ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष मा. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या पत्नी कै. सौ. कमलादेवी. आमचे दुर्भाग्य की आम्ही त्यांना पाहू शकलो नाही. ज्यांनी आमचे जीवन फुलविण्यासाठी आपल्या अवघ्या संपत्तीचा त्याग केला, त्या मूर्तिमंत त्यागी जीवनाला आम्ही पाहू शकलो नाही याचे क्षणोक्षणी वाईट वाटते. तरीही, त्यांचे अस्तित्व आम्हाला ताराराणी विद्यापीठात जाणवते. येथील प्रत्येक वस्तु आणि वास्तु त्यांच्या अलौकिक त्यागाची साक्ष देते. आम्ही त्यांच्या आठवणींनी त्यांच्याशी हितगुज करीत असतो

ती. कै. सौ. काकींचा जन्म १९०९ साली बेनाडीकर पाटील यांच्या प्रसिद्ध आणि खानदानी घराण्यात झाला. ती. कै. सौ. काकीजी लौकिकार्थाने फारशा शिकलेल्या नसल्या तरी सुसंस्काराचे शिक्षण त्यांनी मिळविले होते. त्यांचे माहेरचे नाव ' कमला ' होते. १९२७ साली ती. काकाजींशी त्यांचा विवाह झाला. त्या सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील झाल्या. जुने संस्कारी वळण, घर पाहुण्यांनी, मुलाबाळांनी भरलेले असावे असे त्यांना वाटायचे. ती. सौ. काकीजी सर्वांना समभावनेने वागवायच्या. नोकर–चाकर, सगे–सोयरे, पाहुणे–रावळे यांचा घरी अखंड राबता असायचा. पण कोणीही कधी विन्मुख गेले नाही. ती. सौ. काकीजी सर्वांना सांभाळून घ्यायच्या.

लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या एका कवितेत म्हटल्याप्रमाणे, " मूर्तिमंत प्रेम तयाचे नाव जगीं दाम्पत्य. " असे ती. सौ. काकीजींचे व काकाजींचे जीवन समृद्धीने आणि सुखाने ओथंबलेले होते. उणीव एकच होती आणि ती म्हणजे आपल्या पोटी संतान नाही. याचे त्यांना कधीतरी दुःख वाटायचे. परंतु या अलौकिक दंपतीने या दुःखावर मात केली. ती. काकाजींनी १९४५ साली मुलींच्या शिक्षणासाठी ताराराणी विद्यापीठ ही संस्था काढली. प्रतिकूल परिस्थितीतही मोंगलांशी झगडून ज्या वीरांगनेने हिंदवी स्वराज्याचे संरक्षण आणि संवर्धन केले, तिचे चिरंतन स्मारक म्हणून ताराराणी विद्यापीठ उभे राहिले होते. या ताराराणी विद्यापीठातील सर्व मुलींचे त्या

उभयतांनी मातृत्त्व व पितृत्त्व स्वीकारले. एवढेच नव्हे तर आपली सर्व मालमत्ता या संस्थेला दान केली. ती. काकाजींनी तर आपले जीवनच या संस्थेला दिले आहे. परंतु ती. सौ. काकीजींनी आपल्या सौभाग्यालंकारासहित सर्व संपत्ती या संस्थेला दान केली आहे. सर्व संपत्तीचा त्याग या संस्थेसाठी केला आहे. कोणाचा त्याग मोठा हे एक न सुटणारे कोडे आहे !

आज आमच्या ‘ कमला कॉलेजच्या ’ रूपाने ती. सौ. काकींजींचे सजीव असे स्मारक उभे राहिले आहे. एका अलौकिक आणि असीम त्यागाचे ते एक कृतज्ञ स्मारक आहे.

या कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या आम्ही विद्यार्थिनी खरोखरच भाग्यवान आहोत. आम्हाला येथे केवळ पुस्तकी शिक्षण दिले जात नाही, तर त्याबरोबर सुसंस्काराचे धडेही दिले जातात. खऱ्या अर्थाने या स्मारकाचे चिरंतनत्व आमच्या त्यागाने, कर्तृत्वानेच वाढणार आहे. आमच्या मातृतुल्य ती. सौ. काकीजींसारखे होण्याचा आम्ही परोपरीने प्रयत्न करू.

ती. सौ. काकीजींच्या आठवणींचा भावसुगंध आम्हाला त्यांनी आमच्यासाठी केलेल्या त्यागाची जाणीव सतत देत राहील. आमच्यासारख्या असंख्य कन्यकांना मुक्तपणे वावरण्यासाठी आणि आमचा स्वतःचा विकास करण्यासाठी ज्यांनी असामान्य त्याग केला, त्या धैर्यशील, मूर्तिमंत त्यागदेवतेला माझे शतशः प्रणाम.

# २) बाळ, तू कुठे रे आहेस ?

कु. निशा भांडवले
प्रथम वर्ष, कला

नेहमीप्रमाणे येणारी ती दुपार होती. सर्वत्र शांतता होती. नित्याच्या सवयीप्रमाणे मी वाचत बसले होते. हे रोजच चालायचं. वाचता वाचता झोपी जायचं.

अशीच आजही डोळ्यावर झापड आली म्हणून मी सोप्यावर तशीच लवंडले पण एक विलक्षण आणि आर्त किंकाळीने माझी झोपेची धुंदी खाडकन उतरली. शेजारच्या घरातील रंजनाताईंचा आवाज होता.

" बाळ, तू कुठे आहेस रे ? मला सोडून नको रे जाऊं. " मी धावतच गेले. घराभोवती खूपशी गर्दी होती. मला काहीच समजेना. आत गेले तर. . . . तर डोळ्यावर विश्वासच बसेना. तोंडातून शब्दच फुटेना. कशी बशी सावरले. समोर सर्वांचा लाडका बाळ उर्फ निखिलचा अचेतन देह पांढऱ्या वस्त्रात ठेवला होता. बुद्धीला पटेना, हे कसे झाले? सकाळीच अकराच्या सुमारास निखिल पप्पांबरोबर बाहेर गेला होता आणि आता. . . .

हे कसं काय ? कांहीच समजत नव्हतं. कोणी सांगण्याच्या मनस्थितीत नव्हते आणि कोणी विचारायच्याही. रंजनाताई मला पहातच त्यांचं दुःख उफाळून आलं.

" अग आमच्या बाळाला पाहिलेस का तू ? कुठेय ग माझा बाळ ? आणशील का तू?

रंजनाताईंचा एक एक शब्द काळजाला घरे पाडून जात होता. मी कसं समजावू त्यांना त्यांच्यातल्या मातेला ! कारण माझं मलाच समजत नव्हते. शेजारच्या रमाबाईंना बाजूला नेऊन विचारले तर. . . तर ऐकले ते भयानक होते. डोके अगदी सुन्न झाले.

" आज रविवार निखिलचे पपा रमेश, सुट्टी असल्यामुळे त्याला घेऊन मार्केटिंगला गेले होते, कारण निखिलला बॅट नि बॉल हवा होती. अगदी हट्ट करून तो पप्पांबरोबर गेला होता. आणि परत येताना शिवाजी पुतळ्याला टर्न घेत असताना अचानक स्कूटरचा ब्रेक तुटला अन् भरधाव धावणारी स्कूटर समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. निखिलचे पपा बाजूला पडले पण निखिल पडला तो नेमक्या समोरून येणाऱ्या बसखाली आणि मग. . .

रमाबाई सांगत होत्या. पण पुढचे मला ऐकवेना मी तशीच घरी आले. आईपप्पा कालच गावी गेले होते. घरी मी एकटीच होते. विचारांचे भुंगे मेंदू पोखरत होते. काय करावे ते सुचत नव्हतं. रंजनाताईंचा आवाज हृदयाचा ठाव घेत होता. चाळीतला प्रत्येकजण गदगदत होता. कारण बाळ होताच असा. थोड्या वेळाने निखिलच्या काकांनी त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. कारण रमेशरावांचा पाय फ्रॅक्चर झाला होता. शिवाय अजून ते शुद्धीवर सुद्धा आले नव्हते.

जडावलेल्या अंतःकरणाने मी घरी आले. बाळाचे ते स्वप्नील विश्व माझ्यासमोरून तरळले. निखिल–रंजना व रमेश या सुखी दांपत्याचा गुणी मुलगा. फक्त चार वर्षाचा होता. खरोखर सुखी कुटुंब होते, अगदी हेवा करण्यासारखे. रमेश एका कंपनीत क्लार्क होता. आणि रंजना ती एक सुगृहिणी होती. या दोन भक्कम चाकांच्या साहाय्याने त्यांचा संसाररूपी रथ अगदी सुरळीत चालला होता.

लग्नानंतर त्यांच्या जीवनरूपी वेलीवर उमलेलं पहिलं–वहिलं फूल म्हणजे–निखिल, किती गोंडस होता ! मात्र त्याचा जन्म झाला त्यावेळी डॉक्टरानी एक धक्कादायक बातमी सांगितली होती. रंजना परत कधीच माता बनणार नव्हती. त्यामुळे दोघेही निखिलला आपले सर्वस्व मानून तळहाताच्या फोडाप्रमाणे जपत होते. दोघांचे विश्वही तेवढंच होतं. आपला बाळ....बाळ.... लाडानेच त्याला या

नावाने हाक मारीत. चाळीत देखील याच नावाने प्रसिद्ध होता. बोबडचा व बोलक्या स्वभावामुळे त्याने सर्वांना आपलेसे केले होते. दिवसभर तो सर्वांशी बडबडत राही. सकाळी मी कॉलेजला निघाले की दारातून गोड आवाज येई.

" दिदि टाऽटाऽ "

किती जरी वेळ झाला तरी दोन शब्द बाळाशी बोलल्याशिवाय माझा पाय पुढे निघतच नसे. संध्याकाळी सहाच्या सुमारास बाळ रोजच घरी यायचा आणि हट्ट धरायचा, " ये दिदि मला गोष्ट सांग ना ? " माकलाची, हत्तीची सांगतेस ना ?

मग त्याच्या साखरपेरणीमुळे मला माझा अभ्यास दूर ठेवावा लागे. त्याला खेळवताना वेळ कसा पटकन् जाई. बाहेर मुलांशी खेळायला लागला की बाळ शुक्राच्या ताऱ्याप्रमाणे चकाकत असे. होतच तस त्याच रूप ? गोबरे गोबरे गाल ! गोरागोरा रंग, भुरे-भुरे केस, लालचुटूक ओठ आणि बरोबर बोबडे बोल सर्वांना वेड लावीत असे. कुणालाही आवडेल असा होता बाळ! एकही दिवस असा जात नव्हता की बाळ आमच्याकडे आला नाही.

रंजनाताई व रमेश त्याला जिवापेक्षा जास्त जपत असत. त्याला थोडेसे जरी कुठे लागले तरी रंजनाताईच्या डोळ्यात पाणी येत असे. त्याच्या पायाची कळ दोघांच्या हृदयात उमटत होती. आणि आज . .

परमेश्वर एवढा कसा निर्दयी, निष्ठूर झाला होता ? त्याने हे फूल का तोडले ? चाळीला सुगंधीत करणारा गुलाबच देवाने खुडला होता. रंजनाताईंच्या ओटच्यातल फळच हिरावून नेलं होत. त्याचे गोड हास्य दुडूदुडू धावणारी पावलं आणि बोबडे बोल आता कधीच पहायला मिळणार नव्हते. त्याच्या दिदि या बोबडचा बोलाला मी कायमची मुकले होते.

विचारांच्या आवर्तात मी फिरत होते. पण एकाही प्रश्नाचं उत्तर मला मिळत नव्हते. का ? कसे ? काहीच समजत नव्हते.

रंजनाताईंच्या जीवनातील ही पोकळी कशी आणि कशाने भरून निघणारी होती ? तिचे मातृहृदय विसरेल का ह्या बाळाला ? त्यांची जीवन गाथा आता सुनी झाली होती. जीवनाची मैफीलच व्यर्थ होणार होती. कारण मातृत्व ही स्त्रीजीवनाची सांगता असते. संसाराची पूर्णतः असते. आणि आई म्हणणारा बाळ त्यांच्याजवळ नव्हता. निष्ठूर काळाने आई व बाळाला अलग केले होते.

अजूनही रंजनाताईंचा आवाज हृदयाचा थरकाप उडवीत होता,

" बाळ तू कुठे आहेस रे ? "

## कमला कॉलेज एन्. एस्. एस्.

**ए**कात्मता हा भारत भूमीचा मंत्र
**न**म्रता, शांती, सेवा हेच जीवनाचे तंत्र

**ए**काग्र होता सर्व लाभते मना
**स**हकार्यातून मिळवा विकास जीवना

**ए**कतेने सर्व राष्ट्रा लाभते अखंडता
**स**र्वधर्म समभाव यातून लाभेल धर्मनिरपेक्षता

**कॅ**प एन्. एस्. एस् ची हीच आहे सद्‌भावना
**प**रोपकार, स्नेह, शिस्त, सहकार्य देती सर्व जीवना

# ३) महात्मा फुले– एक द्रष्टा समाजसुधारक

कु. वंदना बनसोडे
द्वितीय वर्ष, वाणिज्य

राजकीय लोकशाही यशस्वी करण्याचा आमच्या शासनाचा प्रयत्न काही अंशी यशस्वी झाला आहे. परंतु सामाजिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी अनेकांनी आपल्या हयातभर परिश्रम घेतले. यापैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, शाहू महाराज ही मंडळी अग्रणी आहेत. समाजाचा सर्वांगीण अभ्यास करून आपल्या समाज सुधारणांची दिशा ठरविणारा पहिला द्रष्टा कार्यकर्ता कोण असेल तर ते महात्मा ज्योतिराव फुले होत.

महात्मा फुले यांचे संपूर्ण नाव ज्योतिराव गोविंद फुले असे होते. त्यांचा जन्म १८२७ साली एका माळी कुटुंबात झाला. ज्योतिबा ज्या काळात जन्माला आले त्या काळात पेशव्यांच्या अमदानीत पोसलेल्या ब्राह्मणशाहीचेच वर्चस्व जीवनाच्या सर्व क्षेत्रात होते. महाराष्ट्रातील बहुजन समाज अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत होता. वडिलांच्या इच्छेविरूद्ध ज्योतिबांनी इंग्रजी शिक्षण घेतले. समाजातील दुष्ट रूढी पाहून धर्माविषयी सत्यशोधन करण्याचे त्यांनी याच काळात ठरवले आणि पुढल्या काळात एकापेक्षा एक अवघड सामाजिक कार्यांना धडाडीने हात घातला. इ. स. १८५१ मध्ये ज्योतिबांनी पुणे शहरात मुलींकरीता शाळा काढली. ती चालविण्यास शिक्षक मिळेनात, म्हणून स्वतःच्या पत्नीच्या साहाय्याने त्यांनी शाळा चालू ठेवली. इ. स. १८५३ मध्ये त्यांनी पुण्यासच अस्पृश्यांकरता शाळा काढली. अशा तऱ्हेने स्त्रीशिक्षण आणि अस्पृश्यांचे शिक्षण यांना महाराष्ट्रात प्रारंभ करणारे फुले हेच पहिले महाराष्ट्रीय होते. ज्योतिबांच्या कामगिरीबद्दल सरकारने त्यांचा शालजोडी देऊन गौरव केला.

शिक्षणाचे विधायक कार्य जसे ज्योतिबांनी हाती घेतले. तसेच जातिभेदाविरूद्ध विशेषतः ‘ भिक्षुकशाही ’ विरूद्ध त्यांनी बंड पुकारले. भिक्षुकशाहीचे गोडवे गाणाऱ्या आणि कर्मकांडात माणसाला गुंतवणाऱ्या ‘मनुस्मृती’चे प्रामाण्य त्यांनी नाकारले. १८८५ साली स्थापन झालेली राष्ट्रीय सभा ही जनमताची खरी निदर्शक नाही. म्हणून, त्यांनी तिच्यावर बहिष्कार घातला आणि पुण्यातील सार्वजनिक सभेची निर्भत्सना केली. त्यांनी ब्राह्मणांचा द्वेष केला नाही तर ब्राह्मण्याचा द्वेष केला. कारण सुरवातीच्या काळापासून गोवंडे, परांजपे यासारखे ब्राह्मण मित्र त्यांच्या सार्वजनिक कार्यात होते. त्यांचा दत्तक मुलगा यशवंत हा काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेचा मुलगा होता.

ज्योतिबांच्या जीवनातील सर्वात मोठी कामगिरी म्हणजे सत्यशोधक समाजाची स्थापना. सर्व मनुष्ये देवाची लेकरे आहेत म्हणूनच देव आणि मनुष्ये–यामध्ये कोणाही दलालाची अगर मध्यस्थाची गरज नाही असे सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान होते. या संघटनेद्वारा ज्योतिबांनी आपले शिष्य एकत्र केले आणि त्यांच्यापुढे निश्चित असा कार्यक्रम ठेवला. सत्यशोधक समाजाच्या द्वारा त्यांनी बहुजनसमाजोन्नतीच्या चळवळीचा पाया घातला. १८८८साली ज्योतिबांच्याअनुयायांनी कोळीवाडा मुंबई येथे एक प्रचंड सभा भरवून ज्योतिबांचा सत्कार केला व त्यांना ‘महात्मा’ ही पदवी दिली.

जोतिबांनी महाराष्ट्रातील अचेतन आणि साचेबंद जीवन आपल्या बंडखोरीने ढवळून काढले. दलित आणि उपेक्षित यांच्यासाठी विलक्षण आंतरिक तळमळीने त्यांनी कार्य केले म्हणूनच त्यांना एक द्रष्टे समाजसुधारक अशी उपाधी लावावीशी वाटते.

# ४) परतीची वाट

कु. पौर्णिमा विचारे
द्वितीय वर्ष, कला

( एक खोली. खोलीच्या एका बाजूला टेबलवर पुस्तकाच्या गराडयामध्ये डोक खुपसून बसलेला अविनाश. जमिनीवर सर्वत्र कागदाचे कपटे पडले आहेत. )

( एक मित्र प्रवेश करतो )

रमाकांत : अरे ! अव्या, चाललय काय तुझं ? वेडयासारखा बडबडत आहेस. काका, काकू नाहीत वाटत ? बरं, जाऊ दे, अभ्यास कुठवर आला आहे ? तुम्ही काय म्हणा, फर्स्टक्लासचे विद्यार्थी ! त्यात पुन्हा सायन्स असून सुद्धा कविता करण्यात पटाईत ! काही सुचलेलं दिसतंय वाटतं काव्य ?

अवि : नाही रे ! वेगळा विचार चाललाय, एक नवीन! २१व्या शतकामध्ये पाऊल टाकण्या-अगोदर २० व्या शतकाच्या शेवटी शेवटी - - -

रमाकांत : ३१डिसेंबरसारखी धमालच ना?

अवि : नाही.

रमाकांत : मग ?

अवि : मी एक --- मी एक ---शो ---ध लावणार आहे ! (मित्र हसतो)

रमाकांत : अरे, तुझ्या हातून लागणारा शोध नक्कीच गंभीर असेल? तू आजूबाजूला बघ जरा, शोध लावणाऱ्यांची अवस्था. म्हणे ! काय ? न्यूटनने गुरूत्वाकर्षणाचा शोध लावला, आर्कीमिडीजचा शोध, सॉक्रेटिसचे तत्वज्ञान आणि अविनाश मोहितेचा प्रताप - - -

( अविनाश नाराज होतो. मित्र त्याच्याकडे पाहतो )

रमाकांत : ( थट्टेने ) शोध तरी सांग कोणता आहे तो ? मी त्रोललो म्हणून नाराज झालास ? सोडून दे. शास्त्रज्ञांचा जास्त वेळ घेत नाही. जातो मी.

( अवि पुन्हा स्वतःशीच विचार करीत हातवारे करीत बसला असताना, आई–बाबा प्रवेश करतात. मुलाचा अवतार पाहून आई घाबरते. पण अवि तिला पाहताच पुन्हा काहीतरी आठवल्यासारखे करीत टेबलापाशी पोहचतो)

शांता : कित्ती वेळा सांगितल असा कचरा करू नको म्हणून ! काय लिहितो काही कळत नाही !

श्यामराव : कमाल आहे बुवा. कपटयांचा अर्थ समजत नाही ? मला तर जाणवते. एक ना एक दिवस आपले चिरंजीव नक्की थोर व्यक्तींच्या मालिकेत जावून बसतील.

शांता : कसलं थोरपण घेऊन बसलात आपल्यासारख्या मध्यमवर्गियांच्यात? उलट दोन खोल्यांच्या घरात नेटनेटका संसार करता करता मी तर फार थकून गेले. तिथं हा- - -

श्यामराव : अस निराश होऊन कसं चालेल? भावी काळाची स्वप्न पाहतांना माणसाने आशावादी असले पाहिजे.मला जर साथ मिळाली असती, तर नाही का एखादा डॉक्टर, इंजिनिअर, वकील, झालो असतो. ?- - जाऊदे नशिबच आमचं! (अविनाशकडे पाहत) काय चाललंय तुझं ?

अविनाश : काही नाही बाबा, एक संदर्भ पाहतो पुस्तकात ! कुठ सापडतच नाही. तो संदर्भ जर सापडला तर मी माझं मत ठामपणे मांडू शकेन.

श्यामराव : पण तुझ्या मताचा आणि त्या टोपलीतील कागदांचा काय संबंध आहे ? मी तर संदर्भ म्हणजे, 'कोण कोणास म्हणाले' या या पुरताच समजतो. ते असू दे. तुझा अभ्यास कुठवर आलाय ? आम्हाला त्याचे काहीं नाही. पण तुझ्याकडून अपेक्षा मात्र भरपूर आहेत. अशा कागदांच्या कपटयात वेळ घालविणार असशील तर मात्र- - -

अविनाश : तसं काही विशेष नाही बाबा पण-

श्यामराव : पण काय ? काय असणार त्याच्यात ? एखादं गणिताचं कोडं, एखादी

आवाज उठविणारी कथा, कविता, एखादे तर्कशास्त्र, किंवा इतरांवर टिका टिप्पणी !

शांता : आता बराच उशीर झाला म्हटलं! बाजारात जायच आहे ना ? अवि तू अभ्यास करत बैस हं! आम्ही बाहेर जाऊन येतो. तुला उगीच अडथळा! सारखी बडबड!

( अवि पुन्हा पुस्तकांच्या ढिगाऱ्याखाली बसून आहे. कधी बाहेर पाहतो तर कधी स्वतःशीच हसतो. खुर्चीवरून उठून दुसऱ्या टेबलाशी काहीतरी करत उभा आहे )

अविनाश : ( स्वतःशीच ) बरं, माझा विषय सायन्स. म्हणजे आली का विज्ञानाची पहाट, विजेचा करंट न पकडता नुसत्या ध्वनिलहरीवर चालणारा ट्रांझिस्टर, स्टिरिओचा आवाज, दोन बॉक्समध्ये म्युझिकचे ऐकू येत आहेत आणि काय धमाल ! आता तर, व्ही.डी.ओ., कॅसेट, टी. व्ही. वर दाखविले जाणारे कार्यक्रम. मजा आहे नाही. आपणही असा जागतिक एखादा शोध लावावा.

( दुसरा दिवस )

(उठतानाच अविनाश आनंदी, उत्साही असतो. )

अविनाश : आई, आई, नवीन शोध लागला ग !

आई : अरे कसला शोध ? कुणाचा शोधायला चालला आहेस ?

अविनाश : नाही ग, कालपासून माझ्या डोळ्यासमोर अनेक रंगाची वर्तुळे निर्माण झाली होती. ती कशाची ग ?

आई : अरे, तुझी तब्येत ठीक आहे ना ?

अविनाश : आई, मला रात्री ना रंगीबेरंगी वलयाचा अर्थ समजला. सायन्समध्ये पांढऱ्या रंगापासून सगळ्याची निर्मिती सांगतात. पण माझे रंग बघ वेगळे रूप घेऊन आले आहेत.

अविनाश : बाबा पाहिलंत, २१व्या शतकात जाणारी आम्ही मंडळी एकमेकात मिसळलेल्या रंगाप्रमाणे २० व्या शतकाच्या संस्कृतीची शिदोरी घेऊन प्रवेश करणार आहोत.

श्यामराव : ( रागाने ) सायन्समधील कोणत्या प्रयोगाचे निष्कर्ष हे ?

अविनाश : निष्कर्ष नाही,बाबा हे सत्य आहे. २० व्या शतकातील सुधारणा आणि २१ व्या शतकाची ओढ. चंद्राच्या शीतलतेचा अनुभव घेण्यासाठी जाताना दाह व्हावा त्याप्रमाणे माझी अवस्था झाली आहे. इथून माघारी जावे ! अगदी इ. सन पूर्वी. मला मिळाली आहे या परतीची वाट- - - या परतीची वाट माझी कविता परतीची वाट - - - !

( शांताबाई श्यामराव अवाक् होवून पहात रहातात. पण अविनाश मात्र तेजस्वी चेहऱ्यांने निश्चल उभा आहे.

## पराग

- माणसाची प्रखर इच्छाच त्याचं भविष्य घडवित असते.
- पुरुषाचं भाग्य त्याच्या मनगटात असते.
- माणूस स्वतःच्या कर्तृत्वानं आपल्या भाग्याचा लेख लिहित असतो.
- माणसाचं नशीब हे परमेश्वरानं लिहिलेले नसून ते त्याच्या कर्तृत्वाने घडवलं जाते.
- सुख आणि दुःख हे माणसाच्या जीवनातील दोन रस्ते आहेत.

# ५) वनदेवतेच्या सहवासात

कु. अनघा हावळ
प्रथम वर्ष, कला

आजच्या धकाधकीच्या, धावपळीच्या जीवनाचा विसर पडण्यासाठी, मानवाला मन गुंतविण्यासाठी एकांतवासाची गरज असते. अशावेळी सिनेमा, नाटक यांचा आधार साहजिकच घेतला जातो. पण यावेळी घडलं वेगळंच. सुट्टी सुरू झाली आणि " ॲडव्हेंचर क्लबतर्फे " गगनबावडा ते दाजीपूर हायकिंगची जाहिरात मला मिळाली. मी आनंदाने भारावून गेले. कारण माझ्या घरामध्ये वडील, भाऊ यांना याविषयीची आवड असल्याने मला विनासायास जाता येणार होते.

७ नोव्हेंबरला पदभ्रमंतीला सुरूवात होती. त्याच्या अगोदर सामानाची जुळवाजुळव करण्यास सुरूवात केली. या भ्रमंतीमध्ये सामान कमी असावे लागते. शिवाय या भ्रमंतीमुळे महत्वाचा लाभ होतो, तो इतरांच्या मैत्रीचा गावोगावाहून अनेक मंडळी निसर्गाच्या सान्निध्यात स्वतःचा ' मी ' पणा विसरून वावरताना दिसतात. यामध्ये आबाल-वृद्धांचा समावेश असतो. तुकोबा म्हणतात ते काही खोटं नाही.

" वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे " अशा प्रकारची स्वप्नं मी पाहत असतानाच सात तारीख उजाडली. सर्वांची एकच धावपळ सुरू होती. गगनबावड्याची गाडी रंकाळवेस स्टँडवरून सुटणार होती. तीन दिवसाचा प्रवास असल्याने आवश्यक ते साहित्य घेतल्याची खात्री करून आम्ही स्टँडवर पोहोचलो. आमच्याप्रमाणेच उत्सुक असणारे अनेक तरूण व तरूणी तेथे उपस्थित होते. एस्. टी. बस येईपर्यंत एकमेकांचे चेहरे न्याहळण्यापलिकडे काहीच घडले नाही.

बस आली आणि सर्वांचीच धावपळ सुरू झाली. बस ठीक २–३० ला गगनगडाच्या वाटेवर लागली. इतका वेळ मख्खपणे पाहणारे चेहरे थोडे स्मितहास्यांनी उजळले. प्रत्येकजण एकमेकांची ओळख करून घेण्याचा प्रयत्न करीत होते. कोणी सांगली, मुंबई इकडून आले होते. मीही ओळख दिली. आणि त्यांच्या गप्पागोष्टींमध्ये मिसळून गेले. गगनबावडा रेस्ट हाऊस कधी आले समजले नाही.

आठ तारखेला सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान आमची हायकर्सची पहिली तुकडी गगनगड चढायला सुरूवात करणार होती. म्हणून सर्वजण जय्यत तयारीने होते. सर्वांचा आनंद ओसंडून वाहत होता. गड चढायला सुरूवात केली. कुणाला फोटोग्राफीचा छंद होता, तर कुणाला काव्याचे वेड होते, तर कुणी जीवनाच्या चाकोरीतून बाहेर पडल्याने मोकळ्या वातावरणाचा आस्वाद घेत होते. आता प्रत्येकजण या निसर्गाच्या निरीक्षणातच मग्न होऊन गेलेले दिसत होते. पाहता–पाहता माझंही देहभान विसरले. मनामध्ये कुतुहलपूर्ण प्रश्न निर्माण झाले. गर्द झाडी, पशु–पक्षांचे चित्र–विचित्र आवाज, फुलांचे प्रकार ही सृष्टी म्हणजे परमेश्वराने मुक्त हस्ताने केलेली रंगाची उधळण होय, असं जाणवलं. वाट केंव्हा संपली कळलं नाही. थोड माग वळून पाहिलं आणि आश्चर्य ? या या झाडीतून आपण आलो यावर विश्वासच बसेना आणि मनात आनंदही मावेना. बर मग, यालाच म्हणतात का सृष्टीची मोहिनी ?

गड चढून वर गेल्यावर गगनगडच्या महाराजांचे दर्शन घडले. त्याचबरोबर गडाचे एक वैशिष्टच असते. त्याप्रमाणे इथही लोकांचा थकवा जाण्यासाठी असणारा गोड्या पाण्याचा झरा दिसला. त्याचे पाणी सर्वांनी प्राशन केले आणि पुन्हा गड उतरण्यास सुरूवात केली अन् पिवळ्या रानफुलांची मखमल पायाखाली अंथरली आहे की काय असा भास झाला. मध्येच असणारा श्री. बेरी यांचा बंगला

पाहण्यासाठी नेण्यात आले त्यांनी शिकारीसाठी तिथे मचाण बांधलेले पाहिले. रात्री मुक्कामी परतलो. एरव्ही चार भिंतीच्या आत असणारी सुरक्षितता येथे नसते. या तंबूमध्ये थंडीपासून बचाव करीत प्रत्येकजण शेकोटी भोवती हास्य विनोद, गाणी म्हणत वेळ घालवीत होती.

नऊ तारखेला सकाळी सूर्याची कोवळी किरणं तंबूच्या छतातून जाणवू लागली. पक्षांचा एकच किलकिलाट, फडफडाट चाललेला होता. हवेत गारवा होता. 'नास्टा' घेऊनच आम्ही दाजीपूरकडे गमन केले. दाजीपूरचे जंगल हे अभयारण्य आहे. ते गव्यासाठी प्रसिद्ध आहे. येथे फक्त चारच वाघ आहेत. जंगल भरपूर असल्याने सूर्यकिरण खाली जमिनीला स्पर्श करीत नाही. मोठमोठी झाडे,त्यांच्या कलाकृतीमय फांदया यांचा संग्रह करीत आमची वाटचाल चालू होती. काही ठिकाणी झुडुपातून रांगत जावं लागत होतं. जंगलात आतील पठारी भागामध्ये ओढयाच्या काठी कोल्हापूरचे श्री शाहू महाराज यांनी बांधलेला बायसन टॉवर पाहिला. शिकारी लोक येथे वास्तव्य करतात. आणि गव्यांच्या दर्शनाचा लाभ घेतात. असं त्याविषयी सांगण्यात आलं. इथपर्यंत पदभ्रमंतीचा आनंद लुटणे हेच कार्य झाल होतं. पण १० तारखेला या हायकिंगचा खरा चित्तथरारक अनुभव मिळणार होता.

१० तारखेला गडगडचाच्या ओढयातून रोप क्लायमिंगमध्ये आगेकूच करायचे होते. गडगडचाच्या ओढयात पुरुष–पुरुष उंच शिला होत्या. त्यातून वाट काढत बाहेर पडण अवघड होते. कारण मध्ये दलदलीचा प्रदेश असल्याने जळवांचा त्रास होत होता. (जळू लागू नये म्हणून पायातील बुटामध्ये तंबाखूची पूड टाकलेली होती.) पण रोप क्लायबिंगचा अनुभव घेण्याच्या जिज्ञासेपोटी हा त्रास जाणवला नाही. आम्ही दोरीजवळ येऊन पोहोचलो.हा रोप धबधब्याच्या कडेला होता. आणि तो सरळ होता. ते दृश्य पाहून मनात भितीचे सावट पसरले. पण प्रत्येकाने स्वत:ला आवरले. कारण रोपवरचा हात सुटल्यास आपण सरळ ३०० फूट खाली पडणार हे निश्चित होते. आमच्या गाईडनी प्रथम चढण्याची माहिती दिली. व प्रथम ते वर चढून गेले. मी जेव्हा चढू लागले त्यावेळी घश्याला कोरड पडली, अंग थरथरू लागलं. आणि हाताची पकड अधिकच घट्ट झाली. अशावेळी माझे लक्ष आठ वर्षाच्या माझ्या भाच्याकडं गेलं. तो बिनधास्तपणे चढत होता. मला त्याचीही काळजी वाटत होती. शेवटी आम्ही चढून वर आलो आणि स्वर्ग तीन बोट उरावा इतका आनंद झाला. जीवनातील एक अविस्मरणीय क्षणाचा प्रत्यय मला आला. त्या दिवशीच्या मुक्कामात सर्वांच्या चेहेऱ्यावर वेगळेच तेज झळकतयं असं दिसत होते. प्रत्येकाच्या ठिकाणी वेगळाच आत्मविश्वास निर्माण झाला होता.

अशी ही आमची हायकिंगची ट्रीप.

# ६) हुंडा-एक ज्वलंत समस्या

कु. मधुमती रणनवरे
तृतीय वर्ष कला

स्त्रियांच्या विधवाविवाह, केशवपन, सतीची चाल, बालविवाह, हुंडा समस्या, अत्याचार, बलात्कार, अमानुष छळ, इ. सर्व एकंदरीत समस्या मध्ये जी आज ज्वलंत समस्या बनली आहे ती हुंडाप्रथा होय. रोज वर्तमानपत्रे, रेडिओ इ. माध्यमाद्वारे या समस्येची कल्पना आपणास येते. याबाबत शासनाचे सुद्धा लक्ष वेधून राहिले आहे. त्यामुळे ही एक सामाजिक समस्या बनली आहे. हिंदू समाजाबरोबर, ख्रिश्चन, जैन धर्मियात देखील हुंडा पद्धती आढळते. सद्यःकाळात सर्वच जातीत हुंडा देण्याघेण्याची चढाओढ लागली आहे. अनुसूचित जाती-जमातीत मुलींना हुंडा देण्याची प्रथा होती. आता मात्र या जाती-जमातीत वरास हुंडा देण्याची पद्धती दृढ होऊ लागली आहे. हुंडा म्हणजे तरी काय ? तर वधुपक्षाकडून वरपक्षास मिळणारी धनसंपत्ती, किंवा वस्तू म्हणजे हुंडा होय. मॅक्सरेडीन याच्या मते विवाहाच्या वेळी वरास त्याच्या पत्नीकडून किंवा नातेवाईकाकडून मिळणारे धन संपत्ती म्हणजे हुंडा होय. १९६१ च्या हुंडा बंदी कायद्यात असे म्हटले की "विवाह आधी किंवा नंतर विवाहातील कोणत्याही एका पक्षाने दुसऱ्या पक्षास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कबूल केलेली किंवा दिलेली संपत्ती व मौल्यवान वस्तू म्हणजे हुंडा होय."

हुंडा ही अलिकडच्या काळातील दुष्ट प्रथा असून ती प्राचीन काळापासून सुरू आहे. विवाह हे एक दान मानले जाते. कन्येचे वराला दान करताना दानाबरोबर दक्षिणाही देणे आवश्यक असते. कारण दक्षिणेवाचून दान निष्फळ ठरते, असा धर्मशास्त्राचा दंडक आहे. ही दक्षिणा रोख रक्कम, सुवर्णात द्यावी अशी प्रथा पडली. धर्मशास्त्रात रूढीनुसार विधिपूर्वक कन्यादान करताना दक्षिणा देणे आलेच. त्यातूनच विवाहप्रसंगी कन्यादान करताना रोख रक्कम किंवा एखादा दागिना वराला देण्याची प्राचीन काळापासून पद्धत होती. परंतु ही दक्षिणा म्हणजे हुंडा नाही कारण हे देणे वधुपित्याच्या इच्छेवर अवलंबून असे. राजे महाराजे, श्रीमंत, जहागीरदार, सरंजामदार व्यक्ती आपल्या कन्येच्या विवाहावेळी वराला काही वस्तू भेट देत. अथर्ववेदात राजकन्यांनी आपल्या पतिगृही शंभर गाई भेट म्हणून आणल्याचा उल्लेख आहे. ( द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा ) या वस्तूंना हुंडा देणे असे म्हणता येत नाही. तर वधुपित्याने स्वेच्छेने व मुलीवरील मायेच्या पोटी त्या दिलेल्या असतात. प्राचीन काळी स्त्रियांना संपत्तीत वारसा हक्क नव्हता. नंतर तो मिळाला. मध्य युगापर्यंत हुंडाप्रथा नव्हती. प्रथमतः ती राजस्थानातील राजपूत लोकामध्ये सुरू झाली. ब्रिटीश आमदानीत या पद्धतीचा अधिकच वेग वाढला. हुंड्याच्या अनिष्ट प्रथेत अनेक लोक गुंतले कारण सामाजिक प्रतिष्ठा वाढते, असा त्यांचा गोड गैरसमज निर्माण झाला.

सद्यःकाळात भारतीय समाजात जी ही प्रथा सुरू आहे याची बरीच कारणे आपणास सांगत येतील. मला असे वाटते की, कोणतीही व्यक्ती हुंड्याबाबत नापसंती व्यक्त करते मग मुलीच्या लग्नात तिला देवाण-घेवाण करावी लागले, याचे कारण काय ? तर ती सामाजिक प्रथा ( रुढी ) होय. दुसरे म्हणजे जातीचे समाजावर असणारे आंतरविवाह नियम होय. प्रत्येकजण आपल्याच जातीतील वर मिळविण्यास प्रयत्नशील असतो. यातून चढाओढ लागते. मग वराचा भाव वाढला की इकडे हुंड्याचे वजनही वाढते. त्यामुळे प्रथा अधिकच बळकट बनते. पुढे जाऊन असे म्हणता येईल की, व्यक्तीस प्रतिष्ठा हवी असते. मी माझ्या मुलीच्या

लग्नात आमक्या वस्तू, इतकी रक्कम दिली ही फुशारकी म्हणजेच प्रतिष्ठेच्या खोटचा कल्पनेच्या आहारी गेल्यामुळे हुंड्याचा भाव वाढतो. अविवाहीत मुलगी राहिली अन् तिचा कोणी गैरफायदा घेतला तर अब्रू जाणार, म्हणून बाप कांहीतरी करून हुंडा देण्यासाठी तयार होतो. हुंडा म्हणजे ती एक दहशतच आहे. तसेच काही पालकाना असेही वाटते की विवाहोत्तर आपल्या मुलीचे जीवन सुखी व्हावे त्यासाठी उच्च कुळातील, शिक्षित, व्यावसायिक व कुटुंबाची प्रतिष्ठा इ. बाबीचा विचार करून अशा वरास तो आपली कन्या सालंकृत दान करतो. याचाच अर्थ योग्य वरासाठी हुंडा अधिकच प्रबळ बनतो. तसेच कांही बाप धूर्तही असतात. आपण आपल्या कन्येच्या विवाहावेळी जेवढा खर्च केला (हुंडा) त्याच्या दामदुप्पट किंवा त्याच पटीने ते आपल्या मुलाच्या लग्नात भरपाई म्हणून वसूल करतात. अशा दुष्टचक्राने उलट हुंडा वाढतच जातो. याच्यापुढेही जाऊन असेही म्हणता येईल की, जास्त हुंडा दिल्याने चांगला जावई मिळतो या भावनेतून रुढ झालेली ही प्रथा ही शेवटी प्रतिष्ठेची बाब बनते. दुर्दैवाची बाब अशी की, कांही मुली कुरुप, प्रौढ कुमारीका, व्यंगत्व असलेल्या, आईवडिल नसलेल्या मुली असल्यास तिचा विवाह लवकर न झाल्यास बापास किंवा पालकास अधिकच धास्ती लागते, व शेवटी तो हुंडा मोजतो. अशा विविध कारणाने हुंड्याची प्रथा अधिकच बळकट होत जाते. शेवटी असे म्हणता येईल की ज्यास एकुलती एकच मुलगी असते तो बाप आपल्या मुलीचे अपेक्षेपेक्षा जास्त हुंडा देऊन लग्न धुमधडाक्यात करून देतो. मग यांचे अनुकरण व प्रसार समाजात होतो. हुंड्याची समस्या वाढण्यास हीच कारणे जबाबदार आहेत असे वाटते.

या हुंडा निर्मितीच्या कारणाने समाजात अनेक प्रश्न ( समस्या ) उद्भवले आहेत. कित्येक कुटुंबाना झळ पोहचली आहे. कित्येक स्त्रिया नाहक बळी गेल्या आहेत. कित्येकजणी त्रास सहन करून जीवन कंठीत आहेत. आणि यातूनच अनेक सामाजिक समस्या उद्भवत आहेत. याचे बरेंच गंभीर परिणाम आपणास पाहावयास मिळतात. हा वरांचाच बाजार आहे. वराची किंमत ठरवावयाची व त्याला वधूकडून मूल्य द्यावयाचे. समजा एखाद्या पित्यास जर जास्त मुली असतील आणि त्याची तशी त्याची ऐपत नसेल तर प्रौढ कुमारीकांचा प्रश्न समाजात निर्माण होतो. कांही मुली आपले लग्न लवकर होत नाही म्हणून मानसिक रोगास बळी पडतात. तर काही वाममार्गास लागण्याची शक्यता असते. बऱ्याच पालकांना मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढावे लागते. कांही वेळेस बाप आपली शेती, घर व मौल्यवान वस्तू विकून हुंड्याची तजवीज करतो. वास्तु गहाण ठेवतो. यातूनच कौटुंबिक विघटन होते व स्वास्थ्य बिघडते. काही समाजात मुलीचा जन्म म्हणजे पापाचे फळ असे वाटते. त्यामुळेच जन्मतःच तिच्याकडे नापसंतीने पाहिले जाते. गुजरातमधील जाडेजा राजपूतांमध्ये जन्मतःच मुलीची हत्या करीत. यातूनच बालहत्येची समस्या उद्भवली. मुलगी थोराड झाली तर हुंडा जास्त द्यावा लागेल, म्हणून अल्पवयातच तिचा विवाह केला जाई. त्यामुळे अल्पवयातच तिच्यावर सासरच्या कुटुंबाची जबाबदारी पडते. शारिरीक व मानसिक ताण पडतो. बंगालमधील कुलीनवाद तर प्रसिद्धच आहे. कुरुप, वृद्ध, व्यसनी, दुराचारी, रोगी, लफंग्या अशा पुरुषांशी विजोड विवाह झाल्याने स्त्रियांच्या दुःखात अधिकच भर पडते. यातून पळवाट म्हणून निराश होऊन आत्महत्या करण्यात मुलींचा कल झुकू लागला आहे. प्रसंगी आई वडिलांना हुंडा देण्यात अडथळा किंवा ते असमर्थ ठरले तर ते लाचलुचपत, भ्रष्टाचार,

काळाबाजार, चोरी, गुन्हे, वेश्याव्यवसाय व प्रसंगी आत्महत्या इ. मार्गाचा आश्रय घेतात. गरीब बापाच्या मुली नोकरी करतात. प्रसंगी या कारणानेही त्यांचा लवकर विवाह होत नाही. कांही वेळेस हुंडा आणला नाही म्हणून किंवा इतर वस्तु ( फ्रीज, टी. व्ही. मोटारसायकल, दागिने इ. ) हवेत म्हणून पत्नीला क्रूरपणाने वागवतात, सासू-सासरे, दीर-नणंद, व इतरजण तिचा छळ करतात, प्रसंगी घटस्फोट घेण्यास भाग पाडले जाते. किंवा अकारण घटस्फोट दिला जातो. कांही पती तर स्वतः खून करून नंतर वधूस जाळून टाकणे,विहीरी तलाव, नदी इ. ठिकाणी ढकलून देणे, आत्महत्या करण्यास भाग पाडणे ह्या क्रूर व अनिष्ट मार्गाचा प्रसार आज समाजात वाढत आहे. घटस्फोटित स्त्रियांची समस्या अधिकच गंभीर बनते. आईवडिलानी सांभाळ केला तर बरे अन्यथा त्या वेश्याव्यवसाय किंवा आत्महत्या स्वीकारतात. पुरूष मात्र दुसरा विवाह करण्यास मोकळा ! कित्येकदा हुंड्यासाठी तरुण अनेक विवाह करून मुलींचा पैसा व शील लुटतात. समाजातील अडाणी माणसे मुलींला जास्त शिकू देत नाहीत. जरी शिकवली तरी त्या तोलामोलाचा वर शोधावाच लागतो. आणि हुंडा द्यावाच लागतो यामुळे तिच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते. नाही तर काय शेवटी मुलीच्या जातीस चूल व मूल ! यामुळे मुलीच्या व्यक्तिविकासात हुंडा अडचण ठरतो.

अर्थात वरील समस्यांचा आपण विचार केला तरी याबाबत शासनाने हुंडा प्रतिबंध कायदा करूनही ही प्रथा कमी झालेली नाही. त्यातून पळवाटा काढून हुंडा समस्या वाढतच आहे. यासाठी भावनात्मक परिवर्तन हवे आहे. ही हुंड्याची समस्या दूर करण्यासाठी वस्तुतः त्या समस्येबद्दल घृणा, तिरस्कार, द्वेष, निर्माण झाला पाहिजे. हुंड्याबाबत नावड निर्माण झाली पाहिजे. प्रत्येकाने मुलामुलीच्या लग्नावेळी हुंडा न घेता व देता लग्नकार्य साध्या पद्धतीने उरकावे. विशेषतः जुन्या पिढीतील स्त्रियांनी आपल्या आईवडिलाना हुंड्यासाठी झालेला त्रास लक्षात घेऊन हुंड्याचा आग्रह धरू नये. म्हणून समाजाच्या मूल्य व्यवस्थेत व अभिवृत्तीत बदल होणे हे अत्यंत महत्वाचे प्रभावी साधन आहे. दुसरी गोष्ट अशी की स्त्री आर्थिक दृष्टचा स्वावलंबी असेल तर ती आपल्या समस्येवर व अडचणीवर सहज मात करू शकेल. आर्थिक स्वावलंबनामुळे पुरूषांचा मालकी हक्क कमी होईल. स्त्री शिक्षणाचा अधिक प्रसार झाला पाहिजे. स्वतःचे व्यक्तिमत्व व विकास तिला घडविता येईल. आईवडिलांनी मुलामुलीच्या विवाह निवडीबाबत पूर्ण मोकळीक व मुभा द्यावी. म्हणजे स्वेच्छेनेच ते पसंती करतील. त्यातून हुंड्याची मागणी कमी होईल. तसेच आंतरजातीय विवाहास परवानगी दिल्यास हुंडाबंदीस अधिकच प्रोत्साहन मिळेल. यासाठी सामाजिक नियमने जरा बाजूला ठेवण्यास हवीत. आणखी महत्वाची बाब म्हणजे सध्या लोकशिक्षणाची माध्यमे म्हणून टी. व्ही. रेडिओ, वृत्तपत्रे, मासिके, शासन इ. मार्फत हुंडाबंदी प्रचार करून लोकजागृती वडवून आणली पाहिजे. खेड्यापासून ते अद्यावत शहरापर्यंत याचा प्रचाराचा वेग वाढविला पाहिजे. कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाबरोबर हा कार्यक्रम सुद्धा त्याबरोबर राबविण्यात यावा. विविध प्राथमिक शाळा, यातून लहान पणापासून या समस्येची गंभीर दखल करून दिल्यास हुंडा समस्या कमी होईल. शाळा, कॉलेज, विद्यापीठ, विविध संस्था, संघटना, मंडळे, शासकीय कार्यालये इ. मार्फत हुंडा समस्येबाबत चर्चा सत्रे, व्याख्याने, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, विविध देखावे, प्रदर्शने, घोषणा, काव्य, इ. हुंडासमस्येबाबत स्थानिक, शहरी, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित करून राष्ट्रीय

दिनी अशा व्यक्ती व संघटनांचा जाहीर सत्कार व पारितोषिके देऊन गौरव केल्यास हुंड्याची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होईल. तसेच यासाठी स्वतंत्र व्यासपीठे, न्यायालये, पोलीस खाते, स्त्री न्यायाधीश, इ. ची स्वतंत्रपणे उभारणी करण्यास हवीत. तसेच विविध संघटना, संस्था, कॉलेज,युवकयुवती यानी हुंडा प्रथेविरुद्ध संघटना उभी करण्यास हवी. सुनेला छळणाऱ्या कुटुंबियाविरुद्ध निषेध, धिक्कार, प्रचार सभा, आंदोलने, परिषदा, संमेलने घेण्यात यावीत. सुनेचा छळ करणाऱ्या कुटुंबियाविरुद्ध पोलीस चौकीत तत्परतेने पोलीसाना बातमी देऊन सत्कृत्य केले पाहिजे. प्रचलित कायद्यातील उणीवा, पळवाटा, यांचा अभ्यास करून नवीन कायदा केला पाहिजे. पोलीस, वकील, न्यायाधीश यानी याबाबतीत स्त्री अन्यायाचे परिमार्जन करताना तत्परतेने पावले उचलुन गुन्हेगारास जबर शासन केले पाहिजे. प्रत्येकानी (तरुण युवकांनी) " हुंडा घेणार नाही " अशी सार्वजनिक ठिकाणी शपथ घेण्यास हवी. हुंडा न घेता विवाह करू इच्छिणाऱ्या युवक युवतींसाठी स्वतंत्र मोफत विवाह केंद्रे उभारून अशा नव दाम्पत्याला शासकीय मदत दिली पाहिजे. गुणवत्ता पाहून त्यास नोकरी देऊन सहकार्य केले पाहिजे. शेवटी मुलींनीही स्वावलंबी बनून हुंडा मागणाऱ्या वराशी विवाह करणार नाही अशी प्रतिज्ञा केली पाहिजे. त्यासाठी सर्व मुलींनी शिक्षणापासून वंचित न राहता शिक्षण क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आघाडी घेतली पाहिजे. वेगवेगळ्या कला, व्यवसाय यात नैपुण्य दाखवून दिले पाहिजे. स्वावलंबी जीवन स्वीकारून कुटुंबाचा आर्थिक भार आपणही उचलला पाहिजे. स्त्रीही प्रतिकार करू शकते, हे दाखविण्यासाठी महिला मंडळे स्थापन करून अन्याय व शासकीय सवलती मागण्या यासाठी शासनाची दारे ठोठावली पाहिजे. यासाठी स्त्रियांची हवी आहे एकजूट, जागरूकता, आत्मनिर्धार व संयम !

## पराग

### स्वागताच्या काही पद्धती

- कांगो प्रदेशातील लोक प्रदक्षिणा घालून स्वागत करतात.
- एस्किमो लोक एकमेकांचे केस ओढून स्वागत करतात.
- रशियन लोक उजवा हात वर करून स्वागत करतात.
- अरब लोक एकमेकांच्या गालाला गाल लावून नंतर हात जोडतात.
- फिलीपाईन्समधील लोक डोक्यावर दोन्ही हात उलटे ठेवून स्वागत करतात.
- तिबेटमधील लोक डाव्या पायाचा अंगठा कपाळाला लावून स्वागत करतात.
- रेड इंडियन लोक डोक्यातील पिसांची अदलाबदल करून स्वागत करतात.
- आफ्रिकेतील " झुलू " लोक कंबर वाकवितात व स्वागत करतात.
- मलायातील जंगली लोक खूप मोठ्याने ओरडून नंतर उड्या मारून स्वागत करतात.
- भारतीय लोक एकमेकांना हात जोडून नमस्कार करतात.

# ७) गोमंतकीय कवी बा. भ. बोरकर

**संहिता शास्त्री**
द्वितीय वर्ष, कला

कवी बोरकरांचा जन्म इ. सन १९१० मध्ये गोमंतकात बोरी येथे झाला. १९४६ साली त्यांनी गोव्याच्या मुक्तिसंग्रामात भाग घेतला पण ते जास्त काळ राजकारणात रमू शकले नाहीत. १९५५नंतर त्यांनी आकाशवाणी केंद्रावर काम केले. म्हणून १९४६ ते १९५५या कालखंडाने त्यांना अधिक चिंतनशील बनविले. त्यांनी आपल्या वाणीला संस्कारित केले. वाणी ही त्यांच्या जीवनाची सहचरी होती.

प्रेम ही मानवी जीवनातील एक भावना आहे. प्रारंभ काळातील प्रेमभावना देवदेवतापुरतीच मर्यादित होती. नंतर पति-पत्नीच्या प्रेमाचेच चित्रण केले जात असे. म्हणजेच मनाने मनावर केलेले प्रेम यामध्ये ध्येयनिष्ठा कुठेही आढळत नाही. अशाप्रकारच्या प्रेमकविता केशवसुत लिहीत होते. यानंतर बोरकरांनी हा धागा पकडला. बोरकरांच्या व्यक्तिमत्वावर तांबे व टागोर यांचा प्रभाव आढळतो. त्यांच्यातील श्रद्धासाम्य, कलासक्ती आणि संगीत प्रेम यांच्यामध्ये समानधर्मत्व आढळते. तांबे यांची कविता बोरकरांना विशेष प्रेरक ठरली.

बोरकरांच्या कवितेत निसर्ग व प्रेम भावना हातात हात घालून वावरताना दिसते. म्हणून बोरकरांची कविता ही रोमँटिझिमला जवळची आहे. त्यांच्या प्रेमकवितेमध्ये मधुराभक्तीही जाणवते. उदा. राधा-कृष्ण हे दैवी पातळीवरचे काव्य आहे. पण त्यांनी त्याला मानवीरूप देऊन प्रकट केले आहे.

" मी नंदा घरची बावडी,
मी नंदा घरची बावडी ग
दिसून क्षणभर श्याम मनोहर
त्यासम झाल्ये लालडी ग "...

निसर्गप्रेम व प्रेमनिसर्ग याची जाण बोरकरांना एकाचवेळी आलेली आहे. प्रणयानुभूतीच्या अगोदर निसर्ग त्यांचा सखा होता. याचे कारण बोरकरांचा जन्मच रमणीयतेचे वरदान लाभलेल्या गोव्यात झाला. याचा आलेख त्यांनी " माझ्या गोव्याच्या भूमीत " या कवितेत काढलेला आहे.

" माझ्या गोव्याच्या भूमीत
वनश्रीची कारागिरी
पानाफुलांची कुसर
पशुपक्ष्यांची किनार " . . .

निसर्गातील अनेक प्रतिमांचा आधार व त्यातून व्यक्त केलेल्या मानवी भावना तसेच चंद्र–चांदणे, ऊन-पाऊस, बारा महिने सहाही ऋतू त्यांचे केलेले निरीक्षण आणि प्रेयसी बरोबर घेतलेला अनुभव हा निसर्ग भावनेला उत्तेजित करणारा आहे. त्यांचे निसर्गातील काही अनुभव बालकवीच्याही पलिकडे जातात. उदा.–

"गडद निळे गडद निळे जलद भरूनि आले
शितलतनु चपलचरण अनिलगण निघाले."

काही वेळेला हा निसर्ग पात्र बनूनही येतो. येथे निसर्गाची भीषणता आपणाला दिसून येते. व काही शब्द हे मानवी संवेदना चेतवण्याचे कार्य करीत असतात असे जाणवते.

उदा. " क्षितीजी आले भरते ग ---
लाजण झाली धरती ग
साजण काठावरती ग
उन्हात पान
मनात गान
ओलावून थरथरते ग "---

प्रेमाच्या बाबतीत चंद्र - चांदण्यांचे येणारे उल्लेख हे कवीच्या दृष्टीप्रमाणे नेहमीच बदलत

असतात. मग चांदणवेलीला आलेली फुले प्रणयगंधाने मुसमुसत असतात. अशा या गंधाने धुंद झालेल्या प्रेमयुगुलाच्या डोळ्यात, मनात, समुद्रकिनारी, घरा–दारात, सृष्टीत चांदणेच आढळून येते. यात काही नवल नाही. हा भाव स्पष्ट करताना बोरकर म्हणतात–

" मंद असावे जरा चांदणे, कुंद असावी
हवा जराशी
गर्द कुंतली तुझ्या खुलाव्या शुभ्र फुलांच्या
धुंद मिराशी "

बोरकरांच्या काव्यामध्ये प्रणयाचे उन्मादक दर्शन नाही. ते स्त्रीकडे आदिमाता आदिशक्तीच्या स्वरूपात पाहतात. तिचे सामर्थ्य हे अलौकिक आहे. तिच्या एका नेत्र कटाक्षाने त्रिभुवन डळमळते आहे असे त्यांनी आपल्या कवितेत वर्णिलेले आहे.

"तव नयनांचे दल हलले ग
पानावरल्या दवबिंदूपरी
त्रिभुवन हे डळमळले ग"---

अलौकिक अंगाने निसर्गप्रेम सौंदर्य चित्रित करून त्याचे आस्वादन करणे ही बोरकरांची मूळ प्रवृत्ती आहे. याविषयी मंगेश पाडगांवकर " बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद " या पुस्तकात म्हणतात " कवी हा जीवा शिवाचे साफल्य अनुभवतो. तेव्हा त्याचा अनुभव कलाकृतीतून आविष्कृत होतो.

बोरकरांनी निसर्ग प्रतिमामधून मानवी मनातील भावविश्व चित्रित केले आहे. निसर्गामुळे मानसिक उन्नती कशी होते याचा प्रत्ययही त्यांच्या कवितेतून येतो. निसर्गाच्या सहवासामध्ये मानवी मन आहे. मानवी बुद्धीला वेग निसर्गप्रतिमा देतात म्हणूनच बोरकरांविषयी म्हणतात, " गोव्यातील निसर्गाला पडलेले स्वप्न म्हणजे बोरकर होय. "

त्यांना गोमंतकीय म्हणण्याचे कारण कवितेतील प्रादेशिकता. गोवा हा प्रदेश राजकीय व सांस्कृतिक दृष्टया अलग असल्याने त्यावर ' प्रादेशिकतेचा ' शिक्का मारण्यात येतो. त्यांच्यावर झालेला लॅटिन संस्कृतीचा प्रभाव त्यामुळे नखरेलपणा रंगेलपणा व रसलोलुपता हे गुण दिसतात. त्यांच्या कवितेमध्ये वरील वैशिष्टचे आढळतात. उदा. ' मुसाफिर, ' सागरा ', ' दूध सागरास ' " माझ्या गोव्याच्या भूमीत " तसे काही शव्द ही आढळतात. उदा. वझरा, रूखावळ, पिसोळी, तणारा, फेन इ. गोमंतकीय कवी म्हणत असताना मला त्यांच्या कवितेचा दाखला द्यावा वाटतो. कारण रसिकाला ही कविता गोव्याच्या निसर्ग मनोहर वातावरणात घेऊन जाते.

" माझ्या गोव्याच्या भूमीत
येते चांदणे माहेरा
ओलावल्या लोचनांनी
भेटे आकाश सागरा "

## पराग

### भारतातील पारंपरिक नृत्य प्रकार

| राज्य | नृत्य प्रकार |
|---|---|
| आंध्र प्रदेश | भरतनाटचम् |
| राजस्थान, उत्तर प्रदेश | कथ्थक |
| ओरिसा | ओडिसी |
| गुजरात, काठेवाड | गरबा रास |
| मणिपूर | मणिपुरी |
| केरळ | कथकली |
| पंजाब | भांगडा |
| महाराष्ट्र | लावणी |

# ८) मुग्ध श्रावण मास

कु. प्रतिभा कुंभारे
तृतीय वर्ष, वाणिज्य

निसर्ग हा एक खराखुरा कलावंत आहे. तो आपल्या मुक्तहस्ताने विविध कलांची उधळण, बरसात मानवावर करीत आलेला आहे. करीत राहील.

श्रावण महिना म्हणजे अर्थातच निसर्गाची रेखीव सौंदर्यांची बरसात होय. या आल्हाददायक हृदयस्पर्शी मौसमाशी कोणाचे हितगुज होणार नाही. ? रिमझिम बरसणाऱ्या, मंदगतीने धावणाऱ्या जलधारा आणि त्यांच्याशी हळूवारपणे लडिवाळ चाळा करणारा सूर्य किरणांचा पिसारा मनाला निश्चितच मोहविणारा असतो आणि त्यांच्या परस्पर मीलनाने निळ्या आभाळात प्रतीत होणारे इंद्रधनुष्य कोणाला मोहित करणार नाही ? इतकेच काय पण कितीतरी धुंद मनात अशी अनंत इंद्रधनुष्ये परावर्तीत होत असतील. सुखदुःखाच्या लकेरीत हिंदोळणारा मानवच नव्हे तर सारी जीवसृष्टी अनोख्या दृश्याने रोमांचित होत नसेल तरच नवल.

श्रापण मास म्हणजे निसर्गाची एक विलक्षण किमयाच होय. श्रावणात हरिततृणे तृप्त होऊन आनंदाने डोलत असतात. तग लता वृक्षांशी अल्लडपणे सलगी करीत असतात. विविध पुष्पांच्या मधुर गंधाने फक्त भ्रमर मुग्ध होत नाही तर सारी जीवसृष्टीच पुलकित होत असते. बहरलेल्या लता, वेली, वृक्ष तृप्त यौवनेप्रमाणे मंत्रमुग्ध होऊन झुलत असतात. डोंगर, दऱ्यांनी आपला वैशाखातील रूक्षपणा अलिप्तता सोडून हिरवा शृंगार परिधान केलेला असतो. तर सर्वात खराखुरा आनंद मयुराला होत असतो. कोणी कवी मन मयुराला साद घालीत असते. ' मयुरा ऽ ऽ रे ! फुलवित येरे पिसारा ' केवडयाच्या बहरलेल्या वनात नागीण आपल्या सौंदर्यांची नागराजाला भुलावण घालीत असते.

श्रावणात एखाद्या कथाकारांचे, कादंबरीकारांचे, कवीचे प्रतिभा संपन्न चित्तकथा, कादंबरी आणि कवितारूपी लावण्य खुलवित असते. अर्थातच याला श्रावणांतील हरितशृंगारच अन्व्हान करीत असतो.

श्रावणमासाच्या अद्भूत किमयेनेच कवी मनात प्रतिभेची उधळण होत नसेल तरच नवल. कवी मनाचे सौंदर्य फुलून येते. आणि त्यातून निर्माण होते सुंदर काव्य–

" हिरवे हिरवे गार गालिचे,
हरिततृणाच्या मखमालिचे !
त्या सुंदर मखमालीवरती,
फुलराणी ही खेळत होती. "

स्वप्नील चित्रकाराचा कल्पनेचा कुंचला स्वप्नरंगी रंगलेला असतो. त्याची स्फूर्तिदेवता खचितच श्रावणमास असू शकेल.

असा हा मनोहारी श्रावणमास कोणाच्या हृदयात आल्हादसंगम घडवून आणत नसेल ? हा मौसम कवी मनातील प्रतिभाशक्ती आणि स्वानुभव यांचा प्रीतीसंगम घडवून आणण्यास मदत करतो. तर कोणी गानकोकीळा उल्हासाने हर्षभरित होऊन स्वरांची उधळण करते–

' श्रावण मासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे,
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात फिरूनी ऊन पडे. '

तर एखादी नवयौवना मनात गीत गुणगुणते–

" मी आज फूल झाले, जणू कालच्या कळीला, लावण्यरूप आले. " फक्त तारुण्यच रोमांचित न होता. पृथ्वीवरील रोमरोमांत शृंगाराची नशा उधळत असते. बरसत असते. ती फक्त श्रावणात हेच खरे. चैतन्याचे उल्हासाचे तुषार श्रावणरुपी कारंजातून मस्तीत येऊन, धुंदीत होऊन, गंधीत करून उसळत

असतात. निसर्गाची ही श्रावणरूपी नशा मानवाला निश्चितच झिंग आणू शकते.

निसर्ग हा खरा गुरू आहे. निसर्ग आणि मानव यांचे नाते अनादि कालापासून एका रेशीम धाग्याने बांधलेले आहे. निसर्गापासून ग्रहण करण्यासारखे अनंत गुण आहेत. मुंग्या आणि मधमाशी यांच्यापासून सहकाराचे तत्व शिकण्यासारखे आहे, अवखळपणे वाहणारा निर्झर एकाच पण योग्य दिशेने वाहण्याचा आदेश देतो, वठलेले बहारदार वृक्ष समानतेचे तत्व शिकवितात, स्पृश्य-अस्पृश्य, गरीब-श्रीमंत हे पहाताना ते प्रेमाच्या सावलीचे छत्र सर्वांवर धरतात. असा हा मुग्ध धुंद निसर्ग मानवाला मार्गदर्शक ठरतो.

# पराग

## " मराठीची असे माझी मायबोली "

महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचे नाते अतूट आहे. महाराष्ट्रात होऊन गेलेल्या अनेक संतांनी मराठीचे सौंदर्य वाढविले. संत ज्ञानेश्वर, एकनाथ, समर्थ रामदास, तुकाराम व शिवाजीच्या काळातील शाहीर या सर्वांनी मराठी भाषेचे वैभव वाढविले. संत ज्ञानदेवांनी मायबोलीला ज्ञानरूपी अमृत पाजले. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ही ग्रंथ रचना करून तिचे वैभव वाढविले, सौंदर्य वाढविले. एकनाथ महाराज आणि समर्थ रामदासांनी मराठीच्या शब्दांचे भांडार फोडून ते लोकांसमोर खुले केले. परमेश्वरांचे भक्त तुकाराम महाराजांनी विपुल अभंग रचना केली. त्यांनी अभंगांच्या भावविण्याची तार छेडल्याबरोबर लोकांची मने हेलावून गेली. शिवाजी महाराजांच्या काळात शाहिरांनी आपल्या पोवाड्यातून मराठी भाषेची स्तुती केली. वीर रस हा शृंगार रसापेक्षा श्रेष्ठ आहे हे त्यांनी दाखवून दिले. अशातऱ्हेने सर्वांनी मिळून मातृभाषेचे सौंदर्य व वैभव वाढविले. मातृभाषेवर अनेक तऱ्हेने काव्ये केली. त्या काव्यांमधून मातृभाषेचे प्रेम उदंडपणे व्यक्त झाले आहे. मातृभाषेची ठेवण राकट आहे. तिच्यातील निरनिराळे राकटपण प्रेमळ शब्द ऐकायला हवेहवेसे वाटतात. मातृभाषेतील शब्दांचा आवाज रोख ठोक आहे. तो सर्वत्र घुमत असतो. मातृभाषेची ठेंवण निसर्गनिर्मित आहे. मातृभाषेला तेजस्वी धार आहे. ती निर्भय वाटते. मातृभाषेला कोणी डिवचले तर ती आपल्या कणखर आवाजात उत्तर देते. जशी ती कणखर आहे तशी ती प्रेमळ आहे. तिच्या नसानसातून, शब्दाशब्दातून प्रेम पाझरत आहे आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की,

# १) 'उपरा'मधून जाणवणारा कैकाडीसमाज

कु. मधुजा केळकर
तृतीय वर्ष, कला

१) **उपेक्षित समाजाचे दर्शन** : मराठी गद्य वाङ्मय प्रकारामध्ये आत्मचरित्रलेखन हा प्रकार रूढ झाला या गोष्टीस बराच कालावधी लोटलेला आहे. पण एका विशिष्ट जमातीच्या संदर्भात उपेक्षित जीवन जगावे लागणाऱ्या व्यक्तीने स्वतःच्या आयुष्यातील कडू-गोड आठवणींना मूर्तरूप दिले हे मात्र अनन्यसाधारण होय. आत्मचरित्र जरी व्यक्तीचे असले तरी एका विशिष्ट सामाजिक घटकाचे प्रतिनिधित्व करते. ' उपरा ' ही जरी लक्ष्मण माने यांची कहाणी असली तरी सर्व कैकाडी समाजाची ती कहाणी आहे. त्या समाजापासून ' उपरा ' मधील कोणतीही व्यक्तिचित्रे वेगळी काढता येणार नाहीत. ती त्या समाजाचाच एक अंग होऊन राहतात

भटक्या आणि विमुक्त जातीपैकी कैकाडी समाजात जन्माला आलेला निवेदक जे जीवन जगतो, त्याचे हृदयस्पर्शी चित्रण ' उपरा 'मध्ये केलेले आहे. आपल्या ज्ञातिबांधवांच्या वाट्यास आलेल्या उपेक्षित जीवनाचा परिचय, ओळख मोठ्या वास्तववादी चित्रणातून निवेदकाने रंगविली आहे.कैकाडी समाजात जन्मलेल्या आणि वाढलेल्या लक्ष्मण माने यांनी स्वतःच्या जीवन-क्रमाचा आत्मचरित्राच्या माध्यमातून काढलेला बोलका आलेख म्हणजे ' उपरा ' हे पुस्तक.

२) **समाजातील चालीरीती** : उपरा-मध्ये कैकाडी समाजाच्या चालीरीती, रूढी, श्रद्धा, परंपरा व त्यानुसार झालेले संस्कार, न्यायकल्पना, देवधर्म, उत्सव यात्रादि बाबींचे मोठ्या समरसतेने आणि वास्तववादी दृष्टि-कोनातून चित्रण झाले आहे. कोणतेही धर्मसंस्कार व चालीरीती पिढीजातपणाचा आधार देऊन स्वीकारल्या जातात. आणि कोणताही बदल न करता त्यांचे परंपरागत अनुकरण केले जाते. धर्माच्या वर्चस्वाखाली या चालीरीती जन्मापासून ते मृत्यूपर्यंत तर असतातच पण जन्मापूर्वी ते मृत्यूनंतरही त्याचा पाठपुरावा केला जातो. हे पण कोणत्याही समाजाच्या चालीरीतीत आढळते व त्यास कैकाडी समाजही अपवाद नाही. " कारण हिंदु समाजाची कित्येक दूषणे कैकाडी अभिमानाने बागवितो, असे वाटते. विशेषतः उच्चनीचता (Hierarchy) अंतर्विवाह (Endogamy) जातपंचायत ( Caste Council ) इत्यादी वैशिष्टचे कैकाडचात आहेत. " वैदूंच्या पालावर कैकाडी जात नाहीत. त्यांच्यात शिवाशिव होत नाही ' अशी निरीक्षणे 'उपरा' मध्ये ठायीठायी आढळतात. बिन्हाडें उचलली जाताना " उरक उरक, महार आडवा येईल. " असे म्हणणारा बापू कैकाडी किंवा बाप्याचं पोरगं शिकतय. त्यानं म्हारलाड बंद करावेत. " असे बोलणारे भाऊबंद हे परंपरागत हिंदु मनोवृत्तीचे प्रदर्शन करतात. हिंदु तत्वज्ञानाचा कणा असलेली विटाळाची कल्पना (Idea of pollution) ही सुद्धा प्रकर्षाने कैकाडी समाजात आढळते. " आई विटाळशी असली की विटाळाच्या भयाने आपण नागडचाने हिंडत असू. " असे लेखक सांगतो. देवाला नैवेद्य दाखविण्यापूर्वी जत्रेच्या दिवशी तोंडात घास घालायचा नाही, ही शिकवण त्याला आई देते.

व्यक्ती फिरत्या असल्या तरी जमातीचा अदृश्य अंमल त्यांना भिववीत असतोच. समाजामध्ये रूजलेल्या रूढी, अंधश्रद्धा, चालीरीती व धार्मिक सण, उत्सव देखील समस्येने ग्रासलेले आहेत. बालविवाहाची सर्रास चाल या समाजात असून मोठ्यांच्या मांडीवर

लहान मुलांचे विवाहसोहळे पार पाडले जात. उदाहरणार्थ, समी आणि वश्याचे लग्न !

देवाधर्माच्या नावे कर्ज काढून मिळविलेली प्राप्ती खर्चिली जाते, उत्सवप्रसंगी गावी परतणे आणि मरीआई दैवदेवते यांचे ऋण फेडणे हा एक महत्वपूर्ण चालीरीतीचा भाग म्हटला पाहिजे. लक्ष्मणची आई ही देखील भ्रमंती चालू असताना ज्या खेड्यात मुक्कामास असेल तेथे प्रसूत होते, आणि बाप मोठ्या उत्साहाने चालीरीतीनुसार पाचवीची पूजा करण्यासाठी तयारीने कामाला लागतो. त्या दिवशी पत्नी सांगेल ते सर्व सामान आणून मुकाट्याने ठराविक मंडळींना रानात घेऊन जाऊन पाचवीची पूजा करून, नैवेद्य दाखवून यथासांग सर्व सोपस्कार पूर्ण करतो.

पोटापाण्यासाठी भटकत असताना हा समाज खंडोबाची यात्रा नियमीतपणे करतो त्यासाठी त्या त्या ठराविक ठिकाणी ठराविक दिवशी एकत्र जमून कोंबडी–बकरा याचा नैवेद्य देतो. जत्रेलाच सगळ्यांना नवे कपडे घालावयास मिळतात. घरोघर शिजणारे मटण सर्वत्र प्रसाद म्हणून का होइना, खावेच लागते. त्याशिवाय मुळेवाळे व स्त्रियादेखील 'दारु पिणे' हे चालीरीतीने, धर्माचे काम समजतात.

गावाबाहेर जाऊन डुक्कर भाजणे, त्याचे मांस तेथेच संपविणे व त्यातील काहीही घरी परत न आणणे, याचे येथे सविस्तर वर्णन निवेदकाने केले आहे. मोठमोठ्या यात्रा जमतात. तेव्हा गांवोगांव विखुरलेला कैकाडी समाज व बांधव एकत्र येतात. आपल्या कमाइचा हिशेब देतात आणि देवाचे नवस मोठ्या श्रद्धेने फेडतात. भावकीभावकीत हे नवस फेडण्याबद्दल विचारविनिमय केला जातो. व एकत्र जमलेले बांधव रोटीबेटीचा व्यवहार पूर्ण करतात. अनेक लग्ने जमविणे व ती पार पाडणे हे या यात्रेच्या निमित्ताने साधले जाते.

**३) समाजातील जात पंचायत** : आपापसातील मतभेद, देण्याघेण्याचे व्यवहार किंवा पतिपत्नीच्या संदर्भातील नाजूक बाबींचे निवाडे पंचायतीसमोर होतात. पंचांना भरपूर बिदागी, खाणेपिणे दिले जाते व सर्वजण पंचायत परमेश्वर मानून त्यांना आपापले गाऱ्हाणे निःसंकोचपणे सांगतात. अगदी गहाण ठेवलेली बायको परत देत नाही अशा पुन्नप्पाने धर्म्याविरुद्ध केलेल्या तक्रारीपासून, चोरीमारी पर्यंतच्या सर्व तक्रारी जात पंचायतीसमोर मांडल्या जातात. त्यांनी दिलेल्या शिक्षाही जबर असतात. गुन्हेगाराच्या डोइवर मानवी विष्ठेचा डेरा ठेवून दगडांनी तो सावकाश फोडत मौज पहाणारे पंच (कँ) ह्या समाजात दिसतात. कुटुंबाला वाळीत घालून कोंडी करणारी जातगंगा येथे दिसून येते. प्रगल्भ विचारांनी भारलेला नायकसुद्धा मराठा मुलीशी विवाह करण्याची बंडखोरी करु शकत नाही. त्याला सपशेल शरणागती पत्करावी लागते. लेखकाची मराठा पत्नी त्याची आत्या दत्तक घेते. तेंव्हा लेखकाला, त्याच्या पत्नीला व त्यामुळे वाळीत पडलेल्या त्याच्या कुटुंबाला जातगंगा शुद्ध (!) करून घेते.

**४) समाजातील स्त्री** : कैकाड्यांची कुटुंबे एकटीदुकटी असली तरी भटक्या एकाकी जीवनाला पोषक असे तत्त्वज्ञान त्यांच्याजवळ आहे. विशेषतः स्त्रीच्या अब्रूची रखवाली करण्यासाठी कैकाड्यांचे एक तत्त्वज्ञान आहे. "घाणीत रहावयाचे तर घाणीसारखे राहिले पाहिजे" असा या समाज जीवनाचा दंडक आहे. म्हणून आपली आई वेणीफणी, आंघोळ याबाबत उदास राहावयाची असे लेखक सांगतो. "कडुसं पडायच्या आत बाईनं घरी परत आलं पाहिजे. नाहीतर तिला नांदवायची नाही." असेही एक निषेधक (Taboo) लेखक नोंदवतो.

कैकाड्याच्या भटक्या जीवनातील स्त्री ही एक करूणामूर्ती आहे. नवऱ्याकडून आणि

शेतकऱ्याकडून अमानुष मार खाणारी, उघड्या वाऱ्यात तीन दगडांची चूल फुंकणारी, माळ-रानावर बाळंत होणारी, शिव्या खाणारी आणि शिव्या देणारी लेखकाची आई कैकाडी समाजा-तील स्त्रीचे प्रतिनिधित्व करते. ती नवऱ्या बरोबरीने राबते आणि होणाऱ्या यातनांना मुकाट सामोरी जाते. नशिबाने बरे रुप दिलेल्या मामीवर अपरात्री कसा बलात्कार होतो, किंवा कुणी चवचाल गजरा कैकाडीण कशी वाळीत पडते, याची लेखकाने केलेली वर्णने वाचताना कैकाडी स्त्रीची असहाय्यता अंत:करण भेदून टाकते.

ही भटकी कुटुंबे नातेसंबंधाला फार जपतात. गावाची काही कलागत झाली, तर कैकाड्याची सगळी बिऱ्हाडे पदर पसरण्यासाठी पुढे असतात. सख्खे, चुलत, आत्याकडचे आणि मामाकडचे सगळे आप्तसंबंध कैकाडी कसोशीने पाळतात. बहुतेक भटक्या जमातीप्रमाणेच कैकाड्यातही लग्नायोग्य मुलींचा दुष्काळच आहे. त्यामुळे काडीमोड दिलेल्या बाईची चार चारसुद्धा लग्ने होतात. एखादी वाईट चालीची स्त्री निघाल्यास पुरुष तिचा काही विचार न करता तिला जिथल्या तिथे सोडून निघून जाताना दिसतो.

**५) समाजाच्या वेदना** : हा समाज फिरतेपणाबरोबरच डोरली, टोपली विणून लग्नप्रसंगी इतरत्र वाजंत्री वाजविण्यास जात असतो. त्यासाठी सुपारी देणे, सराव करणे ही कामे तो करतो. वाजंत्री वाजविणे मात्र जिकीरीचे असते. प्रत्येकांची फर्माइश पूर्ण करण्याची जबाबदारी आणि वाजवून दमछाक झाली तरी जेवणं शेवटी–अलगपणे घ्यावी लागतात. लग्नघरी पाण्याला शिवायची सोय नव्हती ! कैकाड्याच्या पोरांनी पाणी बाटवलं म्हणून आरडाओरडा होत असे. गावकऱ्यांना, पाटलांना प्रस्थापितांना भिऊन वागणे, त्यांना विरोध न करणे, त्यांच्यापासून शक्यतो अदबीने दूर राहाणे व त्यांनी अन्याय केला तरी तो सहन करणे हाच न्याय, अशी मनोवृत्ती ह्या कैकाडी समाजाच्या चालीरीती मध्ये मुरलेली दिसून येते. आपल्या समाजाच्या चालीरीतींचा वैताग लेखकाने पुढील शब्दांत वर्णन केला आहे " नारायण जितं माणसं हागत्यात, तिथं रहायचं, जितं उकिरडं असत्यात, तिथं बसून जेवायचं, आन शेंबड्या पोरानं वाजीव म्हटलं, वाजवायचं, नको होतं. " कैकाडी असा एक समाज आहे की, ज्याला पाऊलवाटा, रस्तेच सोबत करतात. तेच त्यांना आपले वाटतात. आणि रस्ते मात्र कोणालाही स्थिर होऊन देत नाहीत. म्हणून " कैकाडी समाजातील माणसाची कहाणी म्हणजे एक ' मोबाईल ॲगनी ' असते.

लेखकाला त्याच्या समाजाचे आणि त्या समाजाशी संबंधित एकूण समाजाचे वास्तवच दिग्दर्शित करावयाचे आहे, तसे त्याने " या मुक्कामावरून " मध्ये नमूद केले आहे :

" पिढ्यान्‌पिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन गाढवाचं जिणं जगणाऱ्या मंडळीच्या वेदना हे पुस्तक वाचून समाज समजावून घेऊ शकला तरी खूप झालं. "

# १०) संगम हवा नव्या जुन्यांचा

कु. मीनाक्षी गायकवाड
१२ वी, कला

आपण कुटुंबात राहतो. गावात राहतो. आपल्या समाजाचा एक घटक म्हणून राहतो. आपल्या जीवनात या कुटुंबाचा, गावाचा, समाजाचा प्रभाव नकळत पडलेला असतो. त्यामुळेच आपण कुटुंबातील, गावातील समाजातील व्यक्ती ज्या ज्या प्रमाणे वर्तन करीत असतील, वागत असतील, इतरांना वागवत असतील त्या सर्वांचे प्रतिबिंब आपल्या वागण्यात बोलण्यात दिसत असते. त्याचे कारण मानव अनुकरणशील असतो. समाजप्रिय असतो. परंपरेनुसार चालत असतो.

परंपरा म्हणजे काय? आपण विचार केला तर असे दिसून येते की, आपले पूर्वज जसे वागत आले तसेच त्यांच्या नंतरच्या पिढ्या वागत आल्या. आपले आई-वडील ज्याप्रमाणे समाजातील रुढी सणवार कार्ये करीत आले, त्याचप्रमाणे आपणही करीत असतो. यालाच परंपरा असे म्हणता येईल.

परंतु काळ बदलत असतो. त्याचप्रमाणे समाजही बदलत असतो त्यात सुधारणा होत असते. सुधारणा म्हणजे काय ? तर बदलत्या काळामुळे काही गोष्टी कालबाह्य होत असतात. त्या गोष्टीच जर करायचे म्हटले तर कठीण परिस्थिती निर्माण होईल. पूर्वी आजोबा, पणजोबा बाराबंद असलेली बाराबंदी घालीत, आता तशी बाराबंदी घालून नातू कॉलेजात गेला तर? किंवा केसाचा खोपा घालून नऊवारी साडी नेसून नात कॉलेजात गेली तर ? घरातील सासू जात्यावर दळत होती. आता नात सून जात्यावर दळत बसली तर ?

हा सगळा विचार केला तर बदलत्या परिस्थिती प्रमाणे जुन्या काही गोष्टी परंपरागत असूनही सोडून द्याव्या लागतात. नव्हे तर सोडून देणेच हिताचे ठरते म्हणूनच मराठीतील पहिले बंडखोर कवी केशवसुतांनी ‘तुतारी’ या कवितेत “जूने जाऊं त्या मरणा लागुनी” असे म्हटले आहे.

परंतु सारेच जुने वाईट नसते. काही ‘जुने ते सोने’ ही असते. त्यामुळेच नव्या जुन्याचा सुरेख संगम हवा. नवे ते सारेच चांगले असेही छाती ठोकपणे म्हणू शकत नाही. सिनेमा पाहून आल्यानंतर त्यातील काही गोष्टी फॅशन म्हणून स्विकारल्या जातात, त्या सगळ्याच चांगल्या असतात असे मुळीच नाही. नटीसारखे तोकडे कपडे घालून घरात सर्वासमोर जर पत्नी किंवा मुलगी वावरू लागली तर तिला नक्कीच बोलणी खावी लागतील, याचे कारण परंपरा. आपले पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेले आपले संस्कार होत. आज तसा विचार केला तर असे म्हणता येईल की, खरी भारतीय परंपरा खेड्यातूनच जोपासली जात आहे. शहरातील व्यक्ती खेड्यात गेली तर त्याला हा फरक चांगला जाणवतो. तिथला प्रेमळपणा. आदरातिथ्याची भावना, त्यागाची भावना, आजूबाजूच्या परिसरातील व्यक्तींच्या सुख दुःखात सहभागी होण्याची भावना. तिथला माणूस भावनेमुळे कर्तव्याला धावून जातो. केवळ कर्तव्य करायचे म्हणून कर्तव्य करीत नाही. या सर्वांत श्रेष्ठ अशी माणुसकीची भावना तीव्र असते. ‘मला काय त्याचे !’ ही शहरीविचार सरणी झाली. कोण पोलिसाचे लफडं मागे लावून घेईल ह्या विचाराने शहरी माणूस विव्हळणाऱ्याला पाणी देणार नाही. पण खेड्यातून आजही “पहिले त्याला वाचवू मग पाहू पोलीस बिलीस.” अशीच परंपरा चालत येते आहे. आपण कुठेतरी चुकतो आहोत

याची खंतही वाटेनाशी झाली आहे. परंपरा म्हणजे आचार विचारांच्या रुळलेल्या सवयी.

जुन्या काळात स्त्रीला स्वातंत्र्य दिले जात नव्हते. त्या विचारावर निष्कारण वाद घातला जात आहे. परंतु परंपरा रीती, रिवाज हे त्या त्या काळाला त्या काळच्या समाज सुधारकांनीच तयार केलेले होते हे विचारात घेतलेच पाहिजे. मुगलकाळात हिंदू स्त्रियावर फार अत्याचार होत असत. कुठलीही स्त्री दिसली की तिला पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार होत असे. प्रदेश लुटला की पोरीबाळींचीही लुट होत असे. आपल्या समाजातील स्त्रियांनी घरातच रहावे असा नियम करणे त्या काळातल्या समाजसुधारकांना आवश्यक वाटले. आज असा नियम केला तर किंवा बुरखा पद्धती सुरू ठेवायचे म्हटले तर ते शक्य होणार नाही. कारण काळाचा महिमा.

विशेषतः महाराष्ट्रात गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, ज्योतिबा फुले, न्यायमूर्ती रानडे, रमाबाई रानडे ह्या व्यक्तींनी समाजसुधारणा करण्यासाठी फार मोठे कार्य केले आहे. स्त्री शिक्षणासाठी ह्या सर्वांनी पुढाकार घेतला. त्यांच्यामुळेच स्त्री सुशिक्षित होऊन मिळवतीही झालेली दिसते. समाजातील अनेक अनिष्ट गोष्टी नष्ट करण्यासाठी त्यांनी परिश्रम केले. त्यासाठी त्यांना विरोधही सहन करावा लागला. परंतु धर्म स्थापनेसाठी दुष्कृत्ये करणाऱ्यांसाठी देवाला अवतार घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे समाजातील अनिष्ट, समाजाला घातक ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करण्यासाठी समाज सुधारकांना कार्य करणे भाग पडते. साऱ्याच गोष्टी कायद्याने किंवा सरकारकडून होण्यासारख्या नसतात. हुंडाबंदीचा कायदा सन १९६१ मध्ये तयार झाला. परंतु आज अगदी १९८७ साली देखील हुंडा दिल्याशिवाय मुलींची लग्ने होत नाहीत. हुंडाबळींची संख्या वाढतच आहे. अशा काळात तरुण–तरुणींनी पुढाकार घेऊन हुंड्याची प्रथा बंद करण्याची सुधारणा घडवून आणली पाहिजे. ह्या बाबतीत परंपरागत वागून चालेल काय ?

असाच विचार जातीयतेबाबत करणे आवश्यक आहे. यासाठी म. ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव 'अजरामर' राहील यात शंकाच नाही. आज सारेच सिनेमागृहात, हॉटेलात व एकाच समाजात बरोबरीच्या नात्याने वागत आहेत. रोटी व्यवहारच नव्हे तर बेटी व्यवहार देखील मोठ्या सख्येने होत आहेत. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे प्रत्येकजण शिक्षण घेऊन आपले ज्ञान वाढवू शकतो. आपल्या कुवतीप्रमाणे शिक्षणाच्या दर्जाला साजेशी नोकरीही मिळवू शकतो. भारतीय संविधानाने सर्वांना एकाच पातळीवर आणले आहे. प्रत्येकाला स्वतःचा विकास करता येईल असे स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. जी परंपरा समाज विघातक होती, व्यक्तिस्वातंत्र्याला मारक होती, ती आम्ही पूर्णपणे मोडून काढली आहे.

" जुने ते मरणालागूनी जाऊ दिले आहे.
नवे निशाण हाती धरले आहे, सामंजस्याचे "

# ११) मृत्यू-एक महान वर

कु. अंजली कुलकर्णी
द्वितीय वर्ष, कला

मृत्यू, अरे बापरे ! महाभयंकर !

नुसता शब्द ऐकला तरी मनुष्याची पाचारण धारण बसते. अक्षरशः त्याची बोबडी वळते. मनुष्य मग तो गरीब असो अथवा श्रीमंत असो. मृत्यू शब्द ऐकला की, त्याला अक्षरशः बोलताही येत नाही. पण मनुष्य मृत्यूला भीत असतो. तरी मृत्यू मात्र त्याला दया नाही दाखवत. तो मात्र कोणालाही भीत नाही. मृत्यू नुसते आमंत्रण देऊन परत जात नाही. एकदा आला की, एखाद्या नवीन पाहुण्याला तो बरोबर घेऊनच जातो. जन्मल्या दिवसापासून मृत्यूकडे तोंड करून त्याच्याच दिशेने मानवाचा प्रवास चालू असतो.

मृत्यूच्या गुहेकडे जाण्याऱ्याचीच पाऊले नेहमी उमटत असतात. परतीची पाऊले आजपर्यंत तरी कोणी पाहिली नसतील. मनुष्य जन्माला आलेल्या दिवसापासून जसजशा तारखा उलटतील, तसतसा मनुष्य मृत्यूच्या जवळ जात असतो. आणि म्हणूनच जसजशा तऱ्हेने आपले वाढदिवस साजरे करतो, त्या त्या वेळी आपण मृत्यूच्या जवळजवळ जात आहोत, हेही त्याने लक्षात ठेवायला हवे.

प्रत्येक प्राण्याच्या जीवनातील ' मृत्यू ' ही काळचा दगडावरची पांढरी अन स्पष्ट रेघ वाहे. "जन्मा आले तितुके प्राणी, मृत्यू पावती" असे समर्थ रामदास सांगून गेले ते काही खोटं नाही. व्यवहारात प्रत्येक गोष्ट मनुष्य अनुभवीत असतो. परंतु मृत्यूइतकी निश्चित गोष्ट दुसरी कोणतीच नाही. आज मनुष्य चंद्रावर चाललाय विज्ञानाच्या साहाय्याने अनेक नवनवीन शोध लावतोय. पण मृत्यूला कायमचे टाळण्याचे सामर्थ्य अजूनही एकाही शास्त्रज्ञाच्या अंगी आलेलं नाही. आपण अनेक निग्रह आपल्या आयुष्यात करीत असतो. " मी लग्न करणार नाही. " असा निग्रह करून एखादी व्यक्ती जन्मभर ब्रह्मचारी राहून दाखवेल. "मी नोकरी करणार नाही." असे म्हणून एखादी व्यक्ती कायम बेकार राहू शकेल. " मी कधीही गोड खाणार नाही. " असे म्हणून एखादी व्यक्ती आजन्म तो निग्रह दृढ करेल. पण- - -पण "मी कायम जिवंतच राहीन, मी मरणार नाही " असा निग्रह कोण करू शकेल ? अशक्यप्राय गोष्ट आहे. अशी एखादी व्यक्ती सुदृढ आरोग्य ठेवून फारतर शंभर वर्षेपर्यंत जगेल. पण काही काळात यमराज येणारच बोलवायला !

थोडक्यात, अमर मनुष्य अजून जन्माला यायचा आहे. ' अमर ' म्हणजे शारिरीकदृष्टचा अमर असा इथे अर्थ आहे. कारण बौद्धिकदृष्टचा व कर्तृत्वदृष्टचा अमर अशा व्यक्ती आपल्या ऐकीवात आहेतच. राणी ताराराणी, शिवाजी महाराज, महात्मा गांधी, भगतसिग, इंदिराजी या आणि अशा अनेक व्यक्ती अमर झाल्या त्या त्यांच्या कर्तृत्वाने, धाडसाने, त्यांच्या देशप्रेमाने. पण एक मात्र खरं आहे की, परमेश्वर याबाबतीत आपल्यावर फार मोठी कृपा करतो. खरोखरच, हा एक "महान वर" देवाने आपल्याला दिला आहे की, आपण मर्त्य आहोत. कारण 'वर' म्हटल्यावर आपल्याला थोडं विचित्र वाटणार कारण ' मृत्यू ' हा तर आपला शत्रू आहे. पण ' वर ' म्हटला की तो चांगला असतो. सुखदायी असतो. पण ' मृत्यू ' हा खरोखरच ' वर ' आहे कारण 'अटळ मृत्यू' हा महान वर जर मानवाला परमेश्वाने दिला नसता तर तर- - - काय झाले असते ?

आज चाललेले अत्याचार, हिंसाचार यांना तर उतच आला असता. त्यात कधीच खंड म्हणून पडला नसता. दुर्जनांचा तर हैदोस माजला असता. पण या कुकर्मी दुर्जनांच्यामुळे सामान्य जनता मात्र पिळवटून निघाली असती. मृत्यूची, फाशीची भीती नसल्याने खून,

अत्याचार या गोष्टींना आळाच बसला नसता. मनुष्यप्राण्याच्या बेफाम वागण्याला सीमाच उरली नसती.

बेफाम मनुष्याच्या नीच कर्मांना आळा बसावा यासाठी तर भगवंताने आपला शेवट ठेवला आहे. तेच ते संसाराचे रहाटगाडगे ओढून ओढून कंटाळलेल्या मानवाला 'मृत्यू एक वरदान' नाही का ठरत ? कुष्ठरोग, कॅन्सर आणि अशा अनेक यमयातनायुक्त रोगांनी पछाडलेल्या आजाऱ्याला मृत्यू नाही का मदत करत त्यातून सोडविण्यासाठी ? पण एक मात्र खरं की, चौऱ्याऐंशीलक्ष जन्मातून मानव जन्म फक्त एकदाच आणि नशीबानेच मिळतो. त्या जन्मात येऊन आनंद लुटून मग मरणाला तयार का होऊ नये ? आपणाला कधी ना कधी मरण येणारच आहे. हे माहित असल्यानेच माणूस आहे त्या जीवनाचा आनंद उपभोगू शकतो, कशात ना कशात पुढे येण्याचा प्रयत्न तरी करू शकतो. त्यामुळे 'मृत्यू' हा शाप म्हणणं हेच मूर्खपणाचं, असभ्यपणाचं आहे. उलट मरणाला आपण सतत तयार राहायलं हवं. मरणाला हसत हसत सामोरं जायला हवं. आपल्याला उदाहरण समोर आहेच की, " परिक्षित " नावाच्या राजाला सात दिवसात तुला मृत्यू आहे असा शाप मिळालेला असतो. पण मृत्यूपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी समुद्रात उंच ठिकाणी एक काचेचा महाल बांधून त्यात तो राहातो की, जेणेकरून कोणत्या अपायाने आपल्याला मृत्यू येऊ नये. पण बोराच्या अळीच्या मोठा साप बनून तो त्याला दंश करतो व राजा मृत्यूमुखी पडतो. खरंच, मानव आपल्या रोजच्या व्यवहारातील कामातही कामचुकारपणा करतो. पण यमराजासारखा कामसू कोणीही अजून जन्माला आला नसेल. कारण ठराविक वेळी ठराविक व्यक्तीजवळ जाऊ त्याला नेण्याचे काम किती चोख असते यमराजाचे ! मृत्यू जर ठराविक दिवशी येणार असेल तर त्याला कशाचीही पर्वा नसते कितीही उपाय करून त्याला दूर करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा काहीही उपयोग होत नाही. त्यामुळेच " प्रयत्नांती परमेश्वर " ही म्हण इतर कोणत्याही कारणासाठी उपयोगी पडू शकेल. पण त्याला अपवाद एकच आणि तो म्हणजे ' मृत्यू '.

पण एक मात्र खरंच की, सर्व आनंद, सुख आणि पृथ्वीतलावरील सर्व निसर्गनियमित गोष्टींचा उपभोग घेतल्यानंतर मृत्यू यावा. जन्मतःच एखाद्याचा बळी किंवा नव्याचे नवेपण संपायच्या आतच एखाद्या वधूला वैधव्य आणणे या गोष्टी मात्र मृत्यूने करू नयेत. पण असे अपवाद वगळता इतरांनी आपली गात्रं शिथील होत चाललीयत असे दिसताच मृत्यूची आराधना करायला हवी, त्याची वाट पाहायला हवी. मग कशाला भीती वाटेल मृत्यूची ?

# १२) कासऱ्याच्या येढ्यात

कु. सुजाता संकपाळ
प्रथम वर्ष, वाणिज्य

आजच्याला आई पाटचच उठली व्हती, काहीतरी खुडबूड चालली व्हती. हाथरूणाला पडल्या पडल्या मला समदं ऐकू येत व्हतं, पण पडूनच ऐकत व्हतो. तसं एकदम आठवलं, आज हा बाजाराचा दिवस नाय का ? म्हणूनच आई इतक्या पाटंच उठली व्हती. कांबरून तोंडावर घेऊनच बघत व्हतो. वाकळच्याच्या बिळकातून आईची सावली फक्त हलताना दिसत व्हती. वाईच कुठं तांबड फुटाया लागलं असल तवर आईनं हाक मारली.

''भगवंता, बाबा उठ, आरं पार फटफटलं बघ ! '' काम करता करताच माझ्याकडं न बघताच हाका मारीत व्हती. मी समदं ऐकत व्हतो. पण उठावसं वाटंना. घडीभर यीळ गेला. तवर हाक परत ऐकाया आली. तशा त्या लागोपाठच '' आरं भागू ऽऽ, बाबा उठ, मला लय येळ व्हतोया. अजून लय काम पडलया ! '' तरीबी मी गप्पच ऐकत व्हतो. मग जरा रागानं येऊनच अंगावरची गोधडी खासकन वडली गेली. तसाच मग कसातरी उठलो. शेजारी आजारल्याल्या धाकट्या सितारामाच्या अंगावरती गोधडी घातली आणि मला म्हणाली ''कव्हाचा झोपतुया रं? उठ जा लवकर त्वांड धून ये जा! ''

मी तसाच डोळे चोळीत रांजणातला तांब्या भरूनशान घेतला. त्वांड कसंबसं खंगाळलं आणि सदऱ्यानीच पुशीत चाललो, ते थेट चुलीबशी येऊनशान शेकत बसलु असल नसल तसं आईने सांगितलं, '' तुला सांगीतल्या नव्हं एकदा उठ म्हणून, त्ये तेवढं कासरं आण नि आळं बांध जा, सरळ बांध जा उठ. ''

मी तसाच त्वांड वाकडं करीत उठलू, कासरं कसतरी बांधलं नि परत चुलीला पाय लावून बसलू तशी पुन्हा आय म्हणाली,

'' उठ जा ! ह्या सितारामाला उठव, म्हणाव वाईच च्या तरी घे, रातच्याला कायबी खाल्लं न्हवतं. ''

मी जोरातच उठलो नि त्येच्या अंगावरली गोधडी वडली नि त्येला म्हणालो, '' सित्या, च्या घ्याला उठ ! '' त्यो काय उठंना मग काय केलं, त्याच्या काखंत हात घालून त्याला उठीवला. तसा त्यो रडत झोकांडत आईच्या कुशीत जाऊन रडत बसला. आई मला म्हणाली, '' केवढ्यानी गोधडी वडलीस रं, त्यो तापलाया किती बघ ? म्हाईत हाय न्हवं तुला ? कायतरी अंगाव आण त्येच्या '' वाईच जाऊन खुटीवलं आईचं लुगडं त्येच्या अंगावर फेकलं. आईनं त्ये घेतलं नि त्याच्या हुनवटीखाली हात लावला नि पुटपुटली. '' अजून ताप हाय की माझ्या बाबाच्या अंगात. लक्ष्मी गुण दे बाबाला ! ''

'' सुकलय ग सुकलय ! खारकीवाणी प्वार माझं ! '' मग म्हणती कशी '' वाईच गुळणा करून ये जा. च्या पी '' तस त्ये मान वाकडी करून नाय म्हणालं. आय म्हंटली, '' जाऊदे तसाच प्ये. आन गोधडीत गप पडून न्हा. आज बाजारचा दिस हाय. कायतरी खाऊ खाया आणील हं. माझ्या बाबाला बरं का ? ''

त्ये च्या पिऊन झाल्यावर मला बी त्याच ताटलीत वतला. मी त्ये गूळमाट पाणी मीटक्या मारीत प्यालो. बाहीला त्वांड पुसून तसाच उभा न्हायलो. घडीभरश्यान आईचं काम उरकत आलं. ती उठली नी बांधल्यालं कासरं बघीतली तशी ती खेकसली, मी मागच सरलो '' काय रे भग्या आसं तुझ्या कुणी बांधल व्हत रे ? लयी आळशी हायस बघ ! तिनं ते आळं परत सोडूनशान बांधलं.आळच्या कासऱ्याचा एक बिंडा केला. बुचडा बांधत म्हणाली, '' भग्या पोराकडं ध्यान दे बर का ! मी अत्ता इकडून येती. येतानी खाया आणीन तुमास्नी. शिक्यावरल्या टोपल्यात दोन बारक्या बारक्या दामट्या ठेवल्यात. तेवढं पीठ व्हतं. सांच्याला आल्यावं दाणं दळूनशानं आणल्यावन प्वॉट भरून जेवा आणि तेवढा रामसाच्या मळ्यातनबी शिबड्याचं वझं

घेऊन ये. दुपारच्याला जा सिताराम झोपल्याव. मी मुंडकं हलवून नुसत हा म्हटलं. ती म्हणाली "धर वझ्याला वाईच जरा" तस मी लगेच डावा हात लावला तशी ती वराडली "आर मुडदचा, डाव्या हातानच भवानी केलीस व्हय ? बरं ते ऱ्हावदे. तेवढं काम कर" आणि निघतानाही सित्याच्या तोंडावरनं हात फिरवीत मुका घेत म्हणाली, "बाबा रडू नगस आं, मी आता तुला खायला घेऊनच येती, भायर जाऊ नगस" आन मग आय चौकटीतून वाकून निघून गेली. लई येळ आईच्या आकृतीकडं बघत ऱ्हायलो. ती आपली झपाझपा चालली व्हती.

घडी भरश्यानं सित्या केकाटत म्हणाला, "नाना ! मला उठीव" मी म्हणालो, "आयनं तुला उठाया नाय सांगीतल," तस ते जादाच केकाटात बोललं., "मला भायर जायाचं हाय!" तसा मी त्याला उठविला. त्यो बाहचर गेला. तेवढचात मी खुंटीवल्या शिक्याकड वळलो. त्यात डोकावलं. त्यात दोन दामटचा नी त्यावर हिरव्या मीरचीचा खरडा व्हता. माझ्या तोंडाला पाणी सुटलं. मी एक घास खाल्ला मग इच्चार केला आता खाल्याव दुपारच्याला काय ? मग टोपलं झाकून ठेवलं. चड्डीला हात पुशीत भायेर जात सित्याला म्हणालू, "सितू, परत भायेर निघु नगस मी आलु वाईच फिरून. तसाच निघालूं. देवळाच्या मागं येऊन बसलूं. तिथं कोनच न्हवतं. घडीभरानं चांभाराचा गंग्या आलं, मला म्हणालं, लय लवकर आलास भग्या ? तसा मी म्हणालो, "घरात कवनच नाय, एकटचाला करमना," त्यो म्हणाला, "भग्या टाकतूस का डाव ?" मी इकडं तिकडं बघत खीसा चाचपला आणि दोन गोटचा भरिस काढल्या मी म्हणालु, "एवढचाच हायती चालल का ?" त्यो बरं म्हणाला. घडीभर डाव झाला तेवढचात रंगा शिप्याचा सुरशा आला. मी पार चेकाळलो व्हतो. सुरशा आला म्हटल्यावर डाव लय रंगला. लई येळ झाला. भानच न्हवत. मग एकदम सित्याची आठवण झाली. तसा पळतच सुटलो.

सित्या एकटच कऱ्हत पडलं व्हतं. घरी गेल्याव भुकेच ध्यान आलं. तशा टोपल्यातल्या दामटचा काढल्या नी सित्याजवळ घेऊन गेलू. तस त्ये ह्या कुशीवनं ह्या कुशीव झालं. नी पुन्हा कऱ्हाया लागलं. मी त्येच्या हाथरूणाजवळच जेवाया बसलूं. मी सित्याला बळबळ उठवून दामटी चारली व उरल्याली, ती मी खाल्ली. त्येला पाणी पाजीवलं व परत झोपीवलं मी अनुसयाच्या धन्याची भाकरी घेऊन त्येच्या शेताकड पळत सुटलो व त्यो डबा दिऊन आलूं.

लई येळ झाला व्हता. आय अजून आली न्हवती. मी आयची दगडाव बसून वाट बघू लागलो. आय आली. ती लागलीच डोक्यावली पाटी खाली ठेवुनशान म्हणाली, "आई, देवी गुण दे माझ्या लेकराला !" आणि म्हणाली, "बाबा तूला खाया नाय आणलं. दोनच आळं इकल गेलं. ते पैसबी भिकाबयाची उसनवारी दचाची ऱ्हायलिती, ते तीनं घेतली."

तिनं चुलीपाशी जाऊन दिवा लावण्यासाठी काडीपीटी हालीवली तर त्यात एक बी काडी न्हवती. तशी आय मला म्हणाली, "भग्या जा भिकाबयाकडनं दोन काडचा आण" तसा मी जाऊन दोन काडचा आणल्या. दिवा लावला. (लावायचा म्हणून) आज चूल पेटणार न्हवती. दानं बी न्हवती नी पीठ बी न्हवतं, आम्ही तसच बसून ऱ्हायलो.

आयनं विचारल, "भग्या घायाळाचं वझं आणल ?" तसा मी चरकलो आणि खाल्ली मान घालून नाय म्हणालो. आय मारंल या भीतीन भायर पण पळालो. आय सित्याजवळ गेली. त्येच डोस्क मांडीवर घेऊनशानी घळाघळा डोळचातनं पाणी काढू लागली. मला बी रडू आल. इतका रडलू की आमचा बापू वारला तवा बी रडलूं न्हवतूं. आई आमास्नी कुरवाळीत व्हती. तीचा हात घायाळ वळून खरबडीत झाला व्हता. तरी त्यो कापसासारखा मव लागत व्हता. शेवटी तिथं कवा डुलकी लागली, कळल बी नाय.

# १३) प्रदूषण

कु. शोभा पाटील
प्रथम वर्ष, कला

मानवाला स्वत:चे जीवन अधिकाधिक सुखी, समृद्धी आणि आनंदी असावे असे वाटत असते. सभोवतालच्या पर्यावरणातील असंख्य गोष्टींचा उपयोग मानव स्वत:चे जीवन सुखी करण्यासाठी करून घेत असतो. किंबहुना मानवी जीवन पूर्णत: पर्यावरणावर अवलंबून असते. सार्वजनिक आणि वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टिकोणातून पर्यावरण समतोल राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे; परंतु वाढते औद्योगिकरण, वाढते शहरीकरण, शहरातील सिमेंट काँक्रीटच्या इमारतीचे जंगल, अक्राळविक्राळ पसरत जाणाऱ्या झोपडपट्ट्या, वाहतुकीच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणारा प्रचंड धूर आणि बेसुमार जंगलतोड या सर्वांमुळे आज शहरातील नव्हे तर सर्वच ठिकाणचे पर्यावरण असंतुलीत झाले आहे. नुसते परिसंवाद घेऊन हे संतुलन साधले जाणार नाही, याची जाणीव ठेवायला हवी. आजची वैज्ञानिक प्रगती पहाता, प्रगती-बरोबरच काही समस्या निर्माण झाल्या आहेत. मानवी जीवनावर परिणाम करणारी आणि संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या म्हणजेच ' प्रदूषण ' होय. आज सर्वत्र प्रदूषणाच्या प्रश्नाने थैमान घातले आहे.

पर्यावरणामध्ये अन्न, हवा, पाणी इत्यादी जे घटक असतात हे घटक दूषित होणे अथवा अशुद्ध बनणे म्हणजेच ' प्रदूषण ' होय. शहरातील हवेचे प्रदूषण होते म्हणजेच तेथील हवा अशुद्ध होते. कारखान्यातील सांडपाण्यामुळे व शहरातील सांडपाण्यामुळे नदीचे पाणी दूषित होते. म्हणजेच नदीच्या पाण्याचे प्रदूषण होते. म्हणूनच पर्यावरणातील हवा शुद्ध, स्वच्छ आणि निरोगी राखली पाहिजे. प्रदूषणाचे प्रामुख्याने दोन भागांत वर्गीकरण केले जाते. नैसर्गिक प्रदूषण आणि मानवनिर्मित प्रदूषण. नैसर्गिक प्रदूषणामध्ये प्रामुख्याने वादळांमुळे, कुजण्याच्या क्रियेमुळे आणि ज्वालामुखीतून बाहेर पडणाऱ्या वायूमुळे निर्माण होतो. तर मानवनिर्मित प्रदूषण वाढते उद्योगधंदे, वाहतुकींची साधने, अण्वस्त्रांचा स्फोट आणि वाढती लोकसंख्या यामुळे निर्माण होते. खऱ्या अर्थाने प्रदूषणाची खरी समस्या मानवी घडामोडीतूनच निर्माण होते.

प्रदूषणाचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. एक हवा प्रदूषण, ध्वनी प्रदूषण आणि जलप्रदूषण होय. हवेच्या प्रदूषणाचे एक ठळक उदाहरण म्हणजे, भोपाळ वायुदुर्घटनेत हजारो लोक विषारी वायुमुळे मृत्यूमुखी पडले. अनेक लोक अपंग झाले. दुसरे एक उदाहरण देता येईल की, आग्रा येथील ताजमहालावर तेथील असणाऱ्या जवळपासच्या कारखानदारीमुळे त्याच्या सौंदर्यावर ( चकाकीवर ) अनिष्ट परिणाम होत आहे. जलप्रदूषणाचे उदाहरण म्हणजे, १९७६ साली सांगलीमध्ये विषमज्वराची मोठी साथ उद्भवली होती. त्याचे कारण असे होते की, शहरातील सांडपाण्यामुळे आणि कारखानदारीच्या सांडपाण्यामुळे कृष्णा नदीचे पाणी दूषित झाले होते. यामुळे त्याकाळात अनेक लोकांना पचनसंस्थेचे रोग झाले होते. ध्वनी प्रदूषणामुळे वातावरणात गोंगाट अधिक निर्माण झाला आहे. मानव ५०–६० डिसीबल-पर्यंत ध्वनी ऐकू शकतो, तथापि शहरातील वाढत्या वाहनामुळे, कारखान्यामध्ये काम करणाऱ्या लोकांमध्ये व विमानतळानजीक असलेल्या घरांमध्ये हे प्रदूषण अधिक प्रमाणात झाले आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे आयुष्य कमी झालेले आहे. तसेच याचा परिणाम म्हणून बहिरेपणा येणे, निद्रानाशाचा विकार होणे, बुबुळे बाहेर येणे, पचनसंस्थेचे विकार होणे इ. भारतात मुंबई, कलकत्ता, दिल्ली, कानपूर या ठिकाणी हवा प्रदूषण व

ध्वनी प्रदूषण प्रचंड प्रमाणात दिसून येते. . . सध्या राज्यात १६ लाख वाहने आहेत. सर्वांत जास्त प्रदूषण वाहतुकीमुळें होतो, असा शास्त्रज्ञांचा समज आहे. याशिवाय कारखानदारीमुळे सल्फरडायॉक्साइड, कार्बनमोनॉक्साइड, कार्बनडायॉक्साइड यामुळे डोके दुखणे, मळमळणे, झटके येणे यासारखे विकृती उद्‌भवतात. तसेच या वायुमुळे हृदयविकार, फुफ्फुसविकार होण्याचा संभव असतो. सल्फरडायॉक्साइडमुळे श्वसनेंद्रियेचे अनेक रोग होतात. नेत्ररोग होऊन अंधत्व येण्याची शक्यता असते. खरोखरच लाखो रुपये कमविणारे हे उद्योग मानवी जीवनाशी क्रूरपणे खेळत आहे हे संतापजनक आहे. खरोखरच पर्यावरणाला लागलेला हा कर्करोग आहे.

प्रदूषणाचा हा तोल ढळू नये, म्हणून सध्या अस्तित्वात असलेला कायदा अधिक कडक करण्याची घोषणा महामंत्री राजीव गांधी यांनी नुकतीच मुंबईमध्ये झालेल्या परिसंवादात केली. श्री. गांधी यांचे खरे तर स्वागत करायला हवे, कारण पर्यावरणाशी निगडीत अशा अनेक प्रश्नांकडे लक्ष वेधण्याची गरज या निमित्ताने झाली असे वाटते. यावर उपाय म्हणून धुराड्याची उंची वाढली पाहिजे, कारखान्यातील पाणी नदीवाटे किंवा समुद्रात प्रक्रिया करून सोडले पाहिजे. शहरातील कचरा यांत्रिक पध्दतीने कुजवून त्यापासून खत तयार केले पाहिजे, धुराड्यांना इलेक्ट्रॉस्ट्रॅटिक प्रेसिपिटेटर्स सारख्या यंत्रणा बसविल्या पाहिजेत. सामाजिक वनीकरणाची गरज आहे, जंगलाची तोड थोपविली पाहिजे, अण्वस्त्रांचे स्फोट थांबविले पाहिजेत. यासाठी लोकशिक्षण व लोकजागृती केली पाहिजे. आपले घर, शहर अधिक स्वच्छ कसे राहील, याकडे लक्ष दिले पाहिजे. 'झाडे लावा, प्रदूषण हटवा' हा मंत्र सर्वांना समजावून सांगितला पाहिजे. त्यासाठी आपणास मूलमंत्र असावयास हवा की,

"लोक हो ! प्रदूषणाची आली ही लाट  
पर्यावरण समतोल राखा पट्‌पट्‌,  
वनीकरणाची करा हो खट्‌पट्‌,  
मानवी जीवन समृद्ध होईल झट्‌पट्‌."

# १४) दहाव्या एशियाडमधील भारताचे स्थान

**विद्या बाजीराव पाटील**
प्रथम वर्ष, कला

आधुनिक जगात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक देश व त्या-त्या देशातील खेळाडू निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतून आपले श्रेष्ठत्व दाखवण्याचा प्रयत्न करीत असतात. हल्लीच्या जगात तर खेळ हा प्रतिष्ठेचा विषय बनलेला आहे. अशी आपली प्रतिष्ठा दाखवण्यासाठी संधी प्रत्येक देशाला मिळत असते. आशियातील देशांना तर चार वर्षातून एक संधी मिळत असते. ती म्हणजे एशियाई स्पर्धातून. १९८६ च्या १० व्या एशिआड स्पर्धा सेऊल या द. कोरियाच्या मुख्य शहरात २० सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या कालात पार पडल्या. या स्पर्धेत चीनने ९४ सुवर्णपदके मिळवून पहिला क्रमांक पटकावला तर यजमान कोरियाने ९३ सुवर्णपदके मिळवून दुसरा क्रमांक पटकावला जपानचा ५८ सुवर्णपदकांसह तिसरा क्रमांक आला. मात्र भारत ५ सुवर्णपदकांसह ५ व्या क्रमांकावर फेकला गेला. छोटयाशा इराणने ६ सुवर्णपदके मिळवून ४ था क्रमांक पटकावला. भारताने लॉस एंजेलसच्या ऑलिंपिक स्पर्धेत एक सुद्धा पदक मिळवले नव्हते. पण आशियातसुद्धा समाधानकारक यश भारत मिळवू शकले नाही.

भारताने या स्पर्धात सर्वांत जास्त म्हणजे ४०० स्पर्धकांचे दल पाठवले होते. जवळ-जवळ प्रत्येक खेळात भारताने भाग घेतला. पण म्हणावे तितके यश भारताला मिळाले नाही. सुरवातीचे स्पर्धेचे दहा दिवस तर अत्यंत निराशाजनक गेले. नंतर उषाने भारतास सुवर्णपदके मिळवून देण्यास सुरवात केली. भारताला मिळालेल्या एकूण ५ सुवर्णपदकांपैकी ४ पदके एकटया उषाने मिळवली. सोमा दत्ताने नेमबाजीत दोन पदके पटकावली. सुमन रावतने ३००० मी. पळण्याच्या स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवला. मात्र आशा अग्रवाल निम्म्या वाटेतच थकल्याने तिला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. शायनी अब्राहमचा नंबर येऊन सुद्धा काही तांत्रिक चुकीमुळे तिचे सुवर्णपदक हुकले. भारताला हॉकीचा जादूगार समजले जात होते. पण या स्पर्धात सुवर्ण तर नाहीच, पण रौप्यपदकसुद्धा भारताचा पुरुष संघ मिळवू शकला नाही. महिला हॉकी संघाने अंतिम फेरीत द. कोरिया संघाकडून पराभव पत्करला. ह्या मुलींच्या खेळात मंदपणा होता, तसेच त्या लवकर थकत होत्या. याचा फायदा द.कोरियाने घेतला. कुस्तीमध्ये सर्वांत मोठे दल पाठवले पण केवळ कर्तारसिंगच सुवर्णपदक मिळवू शकला. पोहण्याच्या स्पर्धेत खजानसिंहने दुसरा क्रमांक पटकावला. भारताला कुस्ती, हॉकी, गोल्फ यात जास्त आशा होती पण ती फोल ठरली. बलविंदरचा गोळाफेकमध्ये पहिल्या चारात सुद्धा नंबर येऊ शकला नाही. ( याने चार महिन्यापूर्वी नवीन आशियाई उच्चांक स्थापन केला होता ! ) बॉक्सिंगमध्ये १२पैकी ९जणांना पदके मिळाली. व्हॉलीबॉलमध्ये २४ वर्षानंतर भारताला पदक मिळाले. हे यश म्हणावे तितके पुरेसे नाही. याची कारणे शोधून त्यावर उपाय-योजना करणे आवश्यक आहे. १९८२ च्या दिल्लीतील स्पर्धेत भारताला १३ सुवर्णपदके मिळाली. द. कोरियाला या स्पर्धातून म्हणावे तितके यश मिळाले नव्हते. पण मधल्या चार वर्षात द. कोरियाने सतत मेहनत व अभ्यास करून खेळ सुधारला पण भारत अधोगतीच्या मार्गावर निघाला आहे.

या अधोगतीचा विचार करता असे आढळून येईल की, भारताच्या क्रीडा मंडळात राजकारणाचे खेळ खेळले जातात. वशिलेबाजी केली जाते. त्यामुळे ज्यांच्या अंगी पोषक गुण आहेत ते वशिल्याअभावी पुढे येऊ शकत नाहीत. तर जे त्या योग्यतेचे नाहीत ते देशाचे प्रतिनिधीत्व करतात. याचा परिणाम देशालाच भोगावा लागतो. यासाठी खेळातील राजकारण उपटून काढले पाहिजे. तसेच इतर देशात जसे चांगले प्रशिक्षक व प्रशिक्षण खेळाडूंना मिळते. तसे आपल्या खेळाडूंना मिळाले पाहिजे. तसेच इतर देशात खेळाडूंना सोयी, सवलती दिल्या जातात. तशा आपल्या खेळाडूंना मिळू शकत नाहीत. तसेच योग्य ती साधनसामग्री आपल्याकडे नाही. त्यामुळे बाहेरच्या देशात गेल्यावर खेळाडूंना खेळणे अवघड जाते. उदा. आपल्या देशात फक्त मातीवर कुस्ती खेळण्याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे बाहेरच्या देशात गेल्यावर गादीवर कुस्ती करणे आपल्या कुस्तीगिरांना जमत नाही. नेमकी हीच गोष्ट सेऊलमध्ये घडली. घोडेस्वारीत सुद्धा भारताला फारसे यश मिळाले नाही.

केरळ सरकार या बाबतीत आघाडीवर आहे. त्यांना नांबियार व श्रीरामसिंह यांच्यासारख्या अनुभवी व कुशल, निपुण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण लाभते. त्यामुळे केरळमध्ये पी. टी. उषा, शायनी अब्राहम, वंदना राव यासारखे खेळाडू तयार होतात. तसेच केरळ सरकार खेळाडूंना शिष्यवृत्त्याही देते. या सगळ्याचे अनुकरण इतर राज्यांनी केले पाहिजे.

आपल्या देशाची लोकसंख्या ८० कोटी आहे. प्रत्येक १० कोटीला १ याप्रमाणे ८ सुवर्णपदकेसुद्धा आपण मिळवू शकत नाही. कारण आपल्या शासन व्यवस्थेत गडबड आहे. नाही तर इतकी माणसे असताना आपण मागे पडलो नसतो. आता राजीव गांधी यांनी खेळातील राजकारण निपटून काढण्याचे आश्वासन दिले आहे. पाहू या, आपला देश कितपत यशस्वी होतो ते!

◆ ◆

# १५) प्रौढ साक्षरता- एक काळाची गरज

**कु. स्मिता हसबनीस**
प्रथम वर्ष, कला

आजकाल कोणत्याही भागात, जिल्ह्यात, खेडयात प्रौढ साक्षरता या मोहिमेने जोर धरला आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनीही यामध्ये सक्रीय भाग घेत आहेत. जवळ जवळ सगळी महाविद्यालयेही मोहीम चालवत आहेत. प्रौढ साक्षरता याचा अर्थ असा की, खेडेगावातील अथवा शहरातील कोणतीही व्यक्ती ( १८ ते ३५ वयोगटातील ) ती जर निरक्षर असेल तर त्यांना साक्षरतेचे महत्त्व पटवून देऊन त्यांना साक्षर करणे. नुसते साक्षर न करता त्यांना समाजातील अनेक प्रश्नांची माहिती करून देणे. तर अशा या प्रौढांना साक्षर करण्याच्या मोहिमेने खूप जोर धरला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने एकाला तरी साक्षर करावे, ही मोहीम सर्वांनीच स्विकारली आहे. या साक्षरतेवर सरकार आज लाखो रुपये खर्च करीत आहे. कारण साक्षरता ही एक काळाची गरज आहे. साधे बसमध्ये किंवा एस. टी. मध्ये चढायचे झाले तरी निरक्षर लोकांना दुसऱ्याला ही कुठे जाणारी एस. टी. आहे, हे विचारून मगच चढावे लागते. कारण त्यावर असलेली पाटी त्यांना वाचता येत नाही. पण शिकलेले लोकं ते खरं सांगतीलच असे नाही. त्यामुळे अशा कितीतरी अडचणी निर्माण होतात.

निरक्षर लोकांना साधे मुलाला पत्र लिहायचे झाले तरी दुसऱ्याला सांगावे लागते व आपल्याला आलेले पत्र दुसऱ्याकडून वाचून घ्यावे लागते, हे पूर्ण परावलंबनच आहे. खेडेगावातील अशिक्षित लोकाच्यात कोणत्याही प्रकारची जाणीव जागृत झालेली नसते. त्या लोकाना शहरात निघालेल्या बँका किंवा डाकघर यंत्रणा याची माहितीच नसते व जरी असली तरी त्यांचे म्हणणे त्या बँकेत जाऊन तेथे आपले अज्ञान प्रकट करण्यापेक्षा सावकराकडून कर्ज घेतलेले काय वाईट. सावकार कर्ज देतच आहे. पण निरक्षर लोकांना पैसे किती दिले व आकडा किती घातला हे वाचता येत नाही. पैसे मोजता येतात. पण १०० च्या ऐवजी त्या सावकाराने १००० रु. लिहिलेले त्यांना कळत नाही. हा बिचारा शेतकरी असाच फसतो व कर्ज फेडता फेडता फेडणाऱ्याचा जन्म जातो. ही गोष्ट अज्ञानामुळेच (निरक्षरतेमुळेच) झाली.

अशा प्रकारे प्रत्येक ठिकाणी अशिक्षित लोकांना त्रास होतो. खेडेगावातही डॉक्टर असतात. अनेक सुधारक असतात. पण या लोकांचा विश्वास गावातील भगत व बुवाबाजी करणाऱ्या लोकांवरच असतो. कोणालाही कांहीही आजार झाला तरी ते त्या भगताकडेच जातात. तो त्यांच्याकडून लिंबू, पैसे, कोंबडी वगैरे गोष्टी लांबवतो व साधा अंगारा किंवा राख देतो. त्यावर हे लोक आपला विश्वास ठेवतात, पण ती बिचारी आजारी व्यक्ती औषधोपचार न झाल्याने प्राणास मुकते. भगत म्हणतो, " देवाची करणी " पण ही चूक या खेडेगावातील अशिक्षितांची असते. वेळीच डॉक्टरी उपाय झाला असता, तर दगावणारी व्यक्ती जगली असती. हे त्यांना पटवून सांगितले पाहिजे. त्यांच्यातील अंधःश्रद्धा, देवभोळेपणा, खुळ्या समजुती या घालवून टाकल्या पाहिजेत. कारण कांहीही झाले, कोणतीही गोष्ट झाली की, हे लोक त्या भगताकडे जातात. आता दारातील सायकल हरवली ( चोरीला गेली ) तर पोलिस रिपोर्ट करण्याऐवजी ही माणसे ज्योतिषाकडे जातात. तो सांगतो, पूर्व दिशेला डाव्या हाताच्या उजव्या घराच्या कोपऱ्यात तुमची सायकल सापडेल. पण त्या आधी देवाला

शांत करून घेतले पाहिजे. त्याचा कोप झाला आहे. असे सांगून पैसे उकळतात. पण सायकल तर मिळतच नाहीत. कारण ती तिथे नसतेच. अशा प्रकारे साध्या साध्या गोष्टीतही अशिक्षितांची फसवणूक केली जाते.

त्याचप्रमाणे वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी त्यांना सुशिक्षित करणे किंवा कमी मुलामध्ये आपण कसे सुखी राहू शकतो हे त्यांना समजावून सांगितले पाहीजे. एक किलो तांदूळ जर आणले तर ४ माणसे त्याचा भात ८ दिवस खाऊ शकतील. पण ८ माणसे असतील तर ते तांदूळ दोन किंवा तीन दिवसातच संपतील. म्हणजे आर्थिकदृष्टचा ते त्यांना किती महाग पडते हे समजावून सांगून त्यांच्या मनावर ते बिंबवले पाहिजे.

कोणतीही गोष्ट करायची झाली तरी लिहिता वाचता येणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पेपरमध्ये मोठ्या मोठ्या बातम्या येतात पण त्या त्यांना वाचताच जर येत नसतील तर जगाचे जाऊ द्या. पण आपल्या गावात काय चालले आहे. हेही त्या लोकांना कळणार नाही.

तर प्रौढसाक्षरता ही आज एक महत्वाची गोष्ट आहे. आपल्या देशाला जर प्रगतीपथावर न्यायचे असेल तर खेडेगावाचा विकास झाला पाहिजे व हा विकास शिक्षणाशिवाय होणार नाही. पालकानांच जर शिक्षणाचे महत्व कळले नाही तर ते मुलांना काय शिकवणार ? जर उद्याची तरुण पिढी सुधारायची असेल तर आजच त्यांच्या पालकांना साक्षर करणे आवश्यक आहे.

पण आपण जरी साक्षरतेची मोहिम हाती घेऊन त्यांना सुधारण्यास गेलो तरी त्यांना त्याचे महत्व पटले पाहिजे. कारण त्यांना कितीही पटवून दिले तरी त्यांना ते पटत नसते. जरी चार पाच वेळा अपमान झाला तरी ते त्यांना पटवून देणे आजच्या सुशिक्षितांचे कर्तव्य आहे. तरी अपमानाने न खचता त्यांना सुधारणे हे आपल्या तरुण पिढीचे ध्येय आहे. हे ओळखून गोड बोलून, त्यांच्या भाषेत त्यांच्याशी एकरूप होऊन किंवा वेळ पडल्यास रागावून त्यांना साक्षर करणे हे महत्वाचे आहे. पण आपण प्रयत्नांना न कंटाळता असे म्हटले पाहिजे.

'' प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेल ही गळे. '' प्रयत्नांनी जर वाळूचे तेल निघत असेल तर निरक्षर लोकांना नक्कीच साक्षर करता येईल.

◆ ◆

# विकृती आणि सामाजिक दृष्टिकोण

कु. अनिता लटके
प्रथम वर्ष, कला

आज जगातील प्रत्येक देशासमोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्या सोडविणे हीच एक फार मोठी 'समस्या' आहे. या समस्येच्या मुळाशी असणारी आणि थोड्या फार प्रमाणात सर्व समस्या सोडविण्यासाठी मदत करणारी अशी प्रक्रीया आहे " मानवी वर्तन ". मानव विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट पद्धतीने वागतो असे का? या प्रश्नाचे उत्तर सर्वसाधारणपणे अगदी प्राचीन काळात ग्रीक तत्वज्ञापासून ते आजच्या मानसशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञांना सुद्धा सापडले नाही. याचा अभ्यास करण्याची सुरवात ग्रीक तत्वज्ञ हिपोक्रॅटस (इ. स. पू. ४६० ते ३५७) आणि रोमन तत्वज्ञ गॅलन यांनी केली. मानसशास्त्र हे तत्वज्ञानापासून वेगळे झाल्यानंतर त्यामध्ये मन व आत्मा यांचा विचार न करता मानवी वर्तन आणि मानवास वर्तनासाठी प्रवृत्त करणारे घटक काय आहेत याचा अभ्यास करण्यास सुरवात झाली. यामध्ये पहिली मानसशास्त्रीय प्रयोगशाळा वुन्ट या मानसशास्त्रज्ञाने १८७९ साली जर्मनीमधील लीपझीग येथे स्थापन केली व तेव्हापासून आजपर्यंत मानसशास्त्रात मानवी वर्तनाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जाऊ लागला.

I stood looking at her helplessly. For the second time, she was taken away from me. Between I and her there was a big wide solid wall of social **taboos**, conventions. Now ' I ' was as helpless as she was. She flashed like thunderbolt in my dark life and left me **Forever**. With her, she took my peace. Both she and her poetry was **seized**, from me once again. Her vision became **rarity** for me. I am still lestless, **upset** as I would not do anything for her, I missed her, her poetry. But what is about her? It just beyond the words.

✡ ✡ ✡

# Wole Soyinka - Nobel Prize Winner-1986

**Dhundre Shobha**
B. A. I

Whenever exploited, humiliated section of society starts expressing themselves, there is fire, revolutionary spirit and force in their writings. They write for change. African Literature is living example of it. It expresses Black people's aspirations and their grievances. African literature is rich in forms and contents. It is creative. There are two parts of African literature from the language point of view. On the one hand, there is literature in the native languages like Swahili, Bantu and on the other hand there is literature in languages like English, French, Dutch, Portugese. African writers in English have gained eminence all over the world. There are famous writers like Achebe, Okara, Wole Soyinka. And now African literature has claimed the Noble prize.

Noble Prize of 1986 for literature is awarded to a Nigerian playwright, poet novelist and critic Wole Soyinka. He has played crucial role in the creation of a distinctive African body of writing with Achebe, Okara, Okigbu, Clark. These writers have also played distinctive role in creative African literature. Political and intellectual awareness in the new African society has been always at the centre of Soyinka's writing. His writing is explosive but he is not iconoclast. There is humour, satire, sex, violence, imagery in his writings. A short sketch of his early life will not be out of place here.

Soyinka got his B. A. degree from Leeds University, London. Then he did all sorts of jobs for three years. He also worked as a script reader in the Royal Court of London for a short period of time. In 1960-61 he got Rockfeller Research Scholarsuip in Ibadan. Thenceforward he started his career as a writer. In Ibadan University College Soyinka started publishing his writings, there he first published his famous poem 'Thunder to storm '. He also worked as the editor of ' The Eagle '. Around the same time he wrote one article entitled ' Ten Most Boring Books '. To the surprize of American and British people there he included Bunyans **Pilgrim's Progress,** Melville's **Mobi Dick,** Milton's **Paradise Lost,** Spencer's **Fairy Queene** Boswell's **Life of Samuel Johnson**, Richardson's **Pamela,** Walter, Scotts **Ivanhoe,** Goethe's **Faustes** etc. which are considered milestones in the history of English literature.

At the age of 52, 20 collections of prose and poetry are at Soyinka's credit. In all his writings, there is emphasis on human values which he has considered superior to social and political values. There is a depth, complexity and subtlety in Soyinka's vision of human life. Through his writings he has shown dilemmas in the 20th century African society.

Soyinka is mainly famous for his plays. The first three plays he wrote in London are regarded as good comedies. **The Lion and the Jwell** is very pleasing; **The Invention** and **The Trial of Brother Jero** are full of political ironies. In '**The Trial of Brother Jero**' is presentnd as prophet who has lust for women. He always deceives people by displaying his greatness with word-games and seeks pleasure. But in the end Jero's mask is tored by one woman.

In **Swamp Dwellers** there is mud, water famine, crops and beggars superstitions. The mother in this play has fear of her child's death. There is brutality of brothers, blind faiths of tribals. There is mystery of spiritualism and also corruption of clergyes. There are moving paradoxes in the play like famine and flood at the same place.

His most famous play **The Road** is related to his life also. The professor in the play says, " There are dangers in the Quest I know, but the Word may be found companion not to life, but Death ". This play is full of commentry on modern life. Another character, Samson says, " As for Professor, I will give him special office with airconditioner, automatic printing press and so on and so forth. So he can forget driving licences for all my drivers. The man is an artist and as a millionaire, I must support culture ".

Salubi : " The day the police catch you . . . "

Samson : " Which kind police ? They will form line infront of my house every morning to to receive their trip. No one will touch my lorry on the road."

Such dialogues reflect what our life is. There is no need to explain this.

Soyinka's most of the plays are written in verse and they sound natural in that medium. They are highly poetic and full of typical African imagery. There is frequent use of pidgin words in his plays. His characters are living and sound. Each emotion is sharp and clear. Really he is a comic genius. He laughs at predicments. In his plays there is no humour for the sake of humour.

He also suffered long imprisonment in his country Nigeria. He always stood against oppressive rulers, tyrants. He shows how even African people exploit, oppress African people. He does not want to establish himself as only Negro writer. He dislikes the word Negrotude. It seems to him as mental slavery. He has successfully established as playwright in the world.

✡ ✡ ✡

## QUOTATIONS

✡ There is no great genius without a touch of madness.

– **Seneca**

✡ Talent is that which is in a man's power; genius is that in whose power a man is.

– **James Lowell**

✡ We have no more right to consume happiness without producing it than to consume wealth without producing it.

– **G. B. Shaw**

✡ The first requisite for the happiness of the people is the abolition of religion·

– **Karl Marx**

✡ Hate is gained through good deals as well as bad ones.

– **Machiaveli**

# POETRY SECTION

## BROKEN

*The bank of the*
*calm and quiet sea*
*The golden vastness of the*
*shying and setting sun*
*The innocent silvery soil*
*All are witness of your oath.*
*An oath*
*with empty mouth*
*giving certainty*
*To live and love*
*Forever . . . .*
*But . . . .*
*Broken words*
*with their airy tread*
*engulfed by the hollow*
*of the blue sky*
*And then,*
*My mind*
*Itself an echoed hollow*
*with the words*
*B . . R . . O . . K . . E . . N.*

**Miss Kurane C. B.**
B. A II

✡ ✡

## HELPLESS

*Two children*
*of a hapless mother*
*Hunger in eyes*
*on the lap of the mother.*
*Poverty stricken face*
*w r i n k l e d,*
*Under a thatch.*
*Bread . . . Bread ?*
*Heart tearing sound !*
*Helpless eyes*
*Answering through*
*Cold tears*
*Smothered voice*
*Upto the quivering lips*
*Dared not*
*To out*

**Miss Desai Vandana**
B. A. II

## HONESTY

*In the darkness*
*Of the dark room*
*A man*
*Deeply drunken*
*The wine of thought.*
*He has a friend intimate*
*Without any sentiment*
*But a supposed faith*
*Who lived on his bounty*
*Deceived him.*
*And he remembered*
*His Dog*
*Of Loyal company*
*Without any self*
*His face then -*
*The sea of waves*
*Foamy, splashing*
*And eyes*
*A furnace of red*
*Coals*
*Pouring fire*
*Signalling to lips*
*To mutter*
*And the lips muttered*
*' Honesty is but a*
*Bubble of water '*

**Miss Kawale S. J.**
B. A. I

## बोल अमृताचें :

कविवर्य ' सुधांशु '




वार्षिक पारितोषिक– समारंभ प्रसंगी भाषण करताना

**प्रा. शरद कणबरकर**



# प्रतिष्ठा श्रमाची :

**मौजे चिंचवाड–**



विद्यार्थिनी श्रमदान करीत आहेत

# सेना छात्रांची :



मा. प्राचार्या समवेत छात्रसेनेच्या विद्यार्थिनी

# शुभास्ते पन्थानः सन्तु

## माजी कुलगुरु प्राचार्य रा. कृ. कणबरकर



तृतीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थिनींच्या निरोप प्रसंगी

**आणि**



तृतीय वर्ष कला वर्गाच्या निरोपप्रसंगी

# अहवाल विभाग

१९८६-८७

# जिमखाना अहवाल

चालू वर्षीच्या जिमखाना विभागाच्या निवडणुका २ ऑगस्ट १९८६ रोजी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. निवडून आलेल्या विद्यार्थिनी प्रतिनिधी पुढीलप्रमाणे –

१) बी. ए. भाग १ – कु. लटके अनिता तुकाराम
२) बी. कॉम. भाग १ – कु. मोहिते वैशाली बाबासो
३) बी. ए. भाग २ – कु. शेटचे प्रभावती धर्माप्पा
४) बी. कॉम. भाग २ – कु. नार्वेकर स्मिता रामचंद्र
५) बी. ए. भाग ३ – कु. भोजे राजश्री भालचंद्र
६) बी. कॉम. भाग ३ – कु. जितकर सीमा बंडोपंत

कनिष्ठ महाविद्यालयातील निवडून आलेल्या विद्यार्थिनी प्रतिनिधी पुढीलप्रमाणे–

१) ११ वी आर्टस् – कु. सूर्यवंशी मंजुश्री विष्णूपंत
२) ११ वी कॉमर्स – कु. पाटील शैलजा निवृत्ती
३) १२ वी आर्टस् – कु. मोरे जयश्री पांडुरंग
४) १२ वी कॉमर्स – कु. डोईजड सुवर्णा राजकुमार

## क्रीडानैपुण्य

कमला महाविद्यालयाच्या आमच्या विद्यार्थिनींनी आंतरमहाविद्यालयीन सामन्यांमध्ये अॅथलॅटिक्स, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, बुद्धिबळ या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. अॅथलॅटिक्समध्ये कु. सुनिता कोळेकरने थाळीफेक व भालाफेक यामध्ये प्रथम क्रमांक मिळविला.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या आमच्या विद्यार्थिनींनी अॅथलॅटिक्स, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल कबड्डी, टेबल टेनिस या स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. अॅथलॅटिक्समध्ये कु. सुवर्णा डोईजडने उंच उडीमध्ये शहर पातळीवर प्रथम तर जिल्हा पातळीवर द्वितीय क्रमांक पटकावला. शहर पातळीवर कु. पद्मश्री अथणे हिने लांब उडी व ४०० मीटर धावण्यामध्ये तिसरा क्रमांक पटकाविला. ४ ×१०० मीटर रिलेमध्ये कु. घाटगे सुजाता, कु. भोसले उल्का, कु. अथणे पद्मश्री व कु. बेकनाळकर शीतल यांचा संघ दुसरा आला. बास्केटबॉलच्या संघाने शहर पातळीवर दुसरा क्रमांक पटकाविला. व्हॉलीबॉलच्या संघाने शहर पातळीवर विजेतेपद, व जिल्हा पातळीवर उपविजेतेपद पटकाविले. या संघात कु. कल्पना कांबळे, कु. सुजाता घाटगे, कु. शीतल बेकनाळकर, कु. उलका भोसले कु. अल्पना लिंग्रस, कु. मनीषा उपाध्ये, कु. अंजली पाटील, कु. सुवर्णा कामत यांचा समावेश होता. टेबल टेनिसचा संघ जिल्हा विभागीय व राज्य पातळीवरही अजिंक्य ठरला. यात कु. कविता टेंगशे व कु. मृदुला बोकील यांचा सहभाग होता. कु. कविता टेंगशे हिची महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघात निवड झाली. हा संघ राष्ट्रीय पातळीवर दुसरा आला.

खुल्या महिला क्रीडा स्पर्धेमध्ये शहर पातळीवर तसेच जिल्हा पातळीवर आमचा बॉस्केट बॉलचा संघ अजिक्य ठरला. या संघाची निवड पुणे येथे झालेल्या राज्यपातळीवरील महिला क्रीडा स्पर्धेसाठी झाली होती. यात कु. नंदा भोसले, कु. सुनिता कोळेकर, कु. सुस्मिता निंबाळकर, कु. प्रभा कुरणे, कु. लता भोपळे, सुवर्णा डोईजड, कु. पद्मश्री अथणे, कु. विजया पटेल, यांचा समावेश होता. या क्रीडास्पर्धांमध्ये अॅथलॅटिक्समध्ये कु. नंदा भोसलेने भालाफेक व गोळाफेक मध्ये प्रथम, तसेच कु. सुनिता कोळेकरने थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक मिळविले. या दोघींची निवड नागपूर येथे झालेल्या राज्य पातळीवरील महिला क्रीडास्पर्धेसाठी झाली होती.

वरील क्रीडास्पर्धांच्या व्यतिरिक्त कोल्हापुरात झालेल्या खुल्या बास्केटबॉल स्पर्धेत आमचा बास्केटबॉलचा संघ द्वितीय आला. तसेच सुनिता कोळेकर, व कु. नंदा भोसले या दोघींनी महिला वेट–लिफ्टींगच्या क्षेत्रात पदार्पण करून उल्लेखनीय यश मिळविले. कु. सुनिता कोळेकरने कोल्हापूरची '' बेस्ट वेटलिफ्टर '' हा किताब मिळविला. हिने ज्युनिअर नॅशनल वेट लेफ्टींग स्पर्धेत भाग घेऊन एक रौप्य, व दोन कास्य पदके मिळवून महाराष्ट्रास प्रथमच तिसरा क्रमांक मिळवून दिला. तर सिनिअर नॅशनल वेट-लिफ्टींग स्पर्धेत कु. नंदा भोसले हिने सहावा क्रमांक मिळविला.

मुलींनी मिळविलेल्या या यशामध्ये माननीय काकाजी, प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. शिरगोपीकर यांचा मोठा वाटा आहे.

**प्रा. श्रीमती एस्. एस्. पाटील**
कनिष्ठ विभाग

**प्रा. श्रीमती एस् एच्. देशपांडे**
कमला महाविद्यालय

## राष्ट्रीय छात्र सेना विभाग ( एन. सी. सी. )

शिस्त आणि सुव्यवस्था म्हणजे मानवी जीवनातील प्रगतीचे प्रतीक. आज आपल्या देशाला आवश्यक असणाऱ्या या दोन्ही गोष्टीत आमच्या महाविद्यालयाने अल्पावधीतच नेत्रदीपक यश मिळविले आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र–६, गर्ल्स बटालियन कोल्हापूरच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या आमच्या राष्ट्रीय छात्र सेना विभागात महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील एकूण ३५ वीर विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या विभागात वेळोवेळी होणा-या सर्वच कार्यक्रमात सर्वांचा सहभाग या विभागाची गोडी आणि आवड प्रदर्शित करणारा होता. ' बी ' प्रमाणपत्रासाठी कु. सुनिता पाटील, कु. शारदा हुलस्वार, कु. नंदा भोसले, कु. सुरभिणी हुलस्वार, कु. उर्मिला माने या विद्यार्थिनींनी परिक्षा दिली. या विभागातर्फे घेतले जाणारे वार्षिक प्रशिक्षण शिबीर वारणानगर येथील निसर्गरम्य परिसरात पार पडले. यात एकूण २० विद्यार्थिनींची निवड झाली.

आमच्या विभागातर्फे घेतल्या जाणा-या बास्केटबॉल स्पर्धेत कु. नंदा भोसले, कु. लता भोपळे व कु. सुनिता सन्नके यानी अमरावती येथील क्रीडा–स्पर्धेत भाग घेऊन स्पृहणीय यश मिळविले. ' राष्ट्रीय एकात्मता ' दिनानिमित्त्य सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात आमच्या विभागातील कु. नयना कक्कड व कु. शीतल बेकनाळकर या प्रतिभासंपन्न कलाकार विद्यार्थिनींनी आपल्या कलेने मोहित करून टाकले. ' राष्ट्रीय छात्र सेना ' दिना–निमित्त्य आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमात कु. शारदा हुलस्वार, कु. विजया चव्हाण, कु. सुनिता शरवर, कु. सुनिता पाटील,

कु. सुरभिणी हूलस्वार, कु. नंदा भोसले, कु. सुजाता किल्लेदार यांची उत्कृष्ट छात्र म्हणून निवड झाली, तसेच २६ जानेवारी रोजी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमातही आमच्या महाविद्यालयाच्या बहुसंख्य विद्यार्थीनींना अग्रक्रम देण्यात आला होता. रक्तदानासारख्या जीवदानाच्या सत्कार्यातही कु. नयना कक्कड, कु. शारदा हुलस्वार, कु. सुनिता पाटील, कु. उर्मिला माने या विद्यार्थिनी आघाडीवर आहेत.

आम्हाला नेहमीच प्रेरणा देण्याचे कार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील करीत असतात.

**प्रा. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार**
एन. सी. सी. विभाग

## वार्षिक स्नेहसंमेलन

वार्षिक स्नेहसंमेलन हा समारंभ सर्वांच्याच आकर्षणाचा एक भाग असतो. त्यामधून विद्यार्थिनींना त्यांच्या विविध कलागुणांचे दर्शन घडविता येते.

या वर्षी आमच्या कॉलेजमध्ये स्नेहसंमेलनाची तयारी दुसऱ्या सत्राच्या प्रारंभापासून उत्साहात सुरू झाली. प्रत्यक्ष स्नेहसंमेलन मात्र दि. ९ जानेवारी पासूनच सुरू झाले. दि. ९ जानेवारीस महाविद्यालयाच्या भव्य हॉलमध्ये विद्यार्थिनींच्या विविध हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन ताराराणी विद्यापीठाचे संस्थाध्यक्ष माननीय श्री. काकाजीनी आपल्या शुभहस्ते केले. या कलाप्रदर्शनामध्ये भरतकाम, विणकाम, पेंटिंग्ज इ. हस्तकलेचे मनोवेधक नमुने विद्यार्थिनींनी मांडले होते. याचबरोबर रांगोळी, पुष्परचना, मेहंदी स्पर्धाही आयोजित केल्या होत्या.

दि. १० जानेवारी रोजी शाहू स्मारक येथे विद्यार्थिनींनी त्यांचा बहारदार विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम सादर केला. त्याला प्रेक्षकांनी रसिकवृत्तीने दाद दिली.

यानंतर दि. ११ जानेवारीस ताराराणी विद्यापीठाच्या भव्य प्रांगणात मनोरंजक फनीगेम्सचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. नंतर लॉटरी सोडतीचा औत्सुक्यपूर्ण कार्यक्रम झाला. याच सोबत विद्यार्थिनींच्या बौद्धिक गुणांना वाव मिळावा म्हणून प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्या प्रश्नांना अचूक व मार्मिक उत्तर देण्याचे कार्य आमच्या प्राध्यापक वर्गाने केले. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली.

स्नेहसंमेलनाचा दुसरा व महत्त्वाचा भाग म्हणजे पारितोषिक वितरण समारंभ होय. हा सभारंभ दि. ७ फेब्रुवारी १९८७ रोजी माननीय श्री. काकाजी यांच्या अध्यक्षतेखाली व कविवर्य श्री सुंधांशू उर्फ ह. ना. जोशी यांच्या उपस्थितीत ताराराणी विद्यापीठाच्या शारदा मंदिरामध्ये संपन्न झाला. या सर्व कार्यक्रमास आमच्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. एन. के. शितोळे**
**( स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष)**

## ' गुंजारव '

शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश केल्यानंतर विद्यार्थिनींच्या मधील सुप्त गुणांना हळूहळू पूर्ण आकार मिळत असतो. विशेषत: त्यांच्यामधील साहित्यिक गुण जोपासावे आणि वाढवावे या हेतूने ' गुंजारव ' या भित्तीपत्रिकेची निर्मिती झाली. कथा, कविता, वैचारिक लेख, ललित निबंध वगैरे साहित्य विद्यार्थिनींनी सुवाच्च अक्षरात लिहून दिले. या वर्षीचा शुभारंभ विशेषांक ती. काकाजींच्या वाढदिनी काढण्यात आला. ती. काकाजींच्या जीवनाची वाटचाल या अंकामध्ये शद्बबद्ध करण्यात आली होती. त्याचप्रमाणे त्यांच्या वाटचालीची दिशा दाखविणारी काही छायाचित्रेही आम्ही या अंकात प्रदर्शित केली होती. दर महिन्याला एक असे अंक काढण्यात आले. कु. माधुरी कोण्णूर, कु. निशा भांडवले, कु. मंगल चपाले, कु. वंदना बनसोडे यांनी आपले दर्जेदार साहित्य देऊन ' गुंजारव ' च्या अंकास शोभा आणली. कु. सुनीता अपराज व कु. धनश्री चव्हाण यांनी भित्तीपत्रिकेची सजावट केली. प्रा. कु. मीना भोसले, प्रा. सौ. सुमित्रा पोवार व प्रा. श्री. जे. बी. पाटील यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.

**कु. राजश्री भोजे**
तृतीय वर्ष, कला ( विद्यार्थिनी प्रतिनिधी )

**प्रा. सौ. वरदा माडगूळकर**
( विभाग प्रमुख )

## कला गुण विकास मंडळ

विद्यार्थिनींच्या अंगातील सुप्त कला–गुणांचा विकास व्हावा या हेतूने हे मंडळ कार्यरत असते. वेगवेगळचा कलाक्षेत्रातील नामवंत व्यक्तींच्या बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ करवून देणारे असे हे मंडळ आहे.

सर्वप्रथम या मंडळातर्फे १० ऑगस्ट रोजी संस्थाध्यक्ष श्री. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांच्या ८७ व्या वाढदिवसानिमित्त्य विद्यार्थिनींच्यावतीने सोहळा आयोजित करण्यात आला. त्यानंतर न्यू कॉलेजचे प्राध्यापक तसेच नामवंत व्याख्याते प्रा. डी. यू. पवार यांच्या हस्ते या कला-गुण विकास मंडळाचे उद्‌घाटन झाले. सदर कार्यक्रमाचे वेळी ' स्त्रियांचे प्रश्न-अंधश्रद्धा कारणे- आणि उपाययोजना ' याविषयीचे बहुमोल मनोगत त्यांनी व्यक्त केले. याच व्यासपीठावरून आणखी एक व्याख्यान पुष्प गुंफले गेले. कोल्हापूर महिला दक्षता समिती व कमला कॉलेज यांच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ' स्त्री ' मासिकाच्या संपादिका विद्या बाळ यांनी स्त्री-मुक्तीचा खरा अर्थ स्पष्ट करून त्याविषयीची विद्यार्थिनी समवेत त्यांनी केलेली चर्चा हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ठच ठरले.

सुप्रसिद्ध चित्रपट कथा लेखक मा. दिनकरराव द. पाटील यांची द्वितीय सत्रातील उपस्थिती हा वर्षभरातील उपक्रमातील आणखी एक विशेष. वेटलिफ्टिंग आणि टेबलटेनिस या दोनही क्षेत्रात राज्यप्रतिनिधीत्व करण्याची संधी लाभलेल्या आमच्या विद्यार्थिनी अनुक्रमे कु. सुनिता कोळेकर व कु. कविता टेंगशे यांचा महाविद्यालयाच्यावतीने मा. दिनकररावजींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सिने–क्षेत्रातील कल्पकता आणि वास्तवता याबद्दलचे अनुभव त्यानी व्यक्त केले. हुंडाबंदी चळवळीचे प्रवर्तक आणि अध्यक्ष श्री. मामासाहेब कुलकर्णी

यांनी हुंड्यासारख्या अनिष्ट रूढींचे गंभीर परिणाम त्याची कारणे आणि त्याकडे केलेली डोळेझाक याविषयी त्यांची परखड मते व्यक्त केली. हा या कार्यक्रमाचा विशेष होय. हा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळ आणि कमला कॉलेज यांनी संयुक्तरीत्या आयोजित केला होता.

**प्रा. हेमा कुलकर्णी**
कार्यक्रम समिती प्रमुख
व इतर सहकारी प्राध्यापक

## ग्रंथालय अहवाल

१ ऑक्टोबर १९८६ पासून कमला महाविद्यालयाचे ग्रंथालय नवीन व प्रशस्त हॉलमध्ये सुरु झाले आहे. जून १९८६ पासून ज्युनियर विभाग कमला महाविद्यालयाला जोडल्यामुळे ग्रंथाच्या संख्येत भरपूर वाढ झाली. आज अखेर ग्रंथसंख्या एकूण ५०३५ असून किंमत ८५,०००।- रु. झाली आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये ३०,००० रुपयांची ११२३ पुस्तके खरेदी केली. या वर्षी बुकबँकेतून २४२५ पुस्तके दिली असून, त्याचा लाभ ५७४ विद्यार्थिनींनी घेतलेला आहे. खेळाडू व हुशार अशा दीडशे विद्यार्थिनींना या ग्रंथालयातून पुस्तकांचा संच मोफत देण्यात आला आहे. ग्रंथालयात एकूण ४४ मासिके व ७ दैनिके येतात. त्यासाठी वर्षाला ५००० रुपये खर्च होतो.

नवीन हॉलमध्ये अभ्यासिकेची सोय ग्रंथालयीन वेळात चांगली करण्यात आली आहे. नवीन मासिके, दैनिके वाचण्यासाठी पेपरस्टँड व रॅकची चांगली सोय केलेली आहे. या कॉलेजचे ग्रंथालय समृद्ध आणि अद्यावत असावे यासाठी संस्थापक व प्राचार्य प्रयत्नशील आहेत.

**श्री. जे. पी. जाधव**
ग्रंथपाल

## राष्ट्रीय सेवा योजना ( N. S. S. )

उद्याच्या विकसित समाजाचे स्वप्न साकार होण्यासाठी आणि समाज आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सुसंपन्न बनविण्यासाठी मन, मनगट आणि मेंदू मजबूत करून नि:स्वार्थी समाजसेवक म्हणून आजच्या युवक–युवतींनी मिशन म्हणून काम करण्याची नितांत गरज आहे. अशा युवक–युवतींची निर्मिती करण्याची राष्ट्रीय सेवा योजना एक आदर्श शाळा आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी शिवाजी विद्यापीठाने आमच्या कॉलेजला १९८५–८६ या शैक्षणिक वर्गात १०० विद्यार्थिनींच्या एका युनिटची परवानगी दिली होती. राष्ट्रीय सेवा योजनेची १९८५–८६ या शैक्षणिक वर्षातील गौरवास्पद असलेली कामगिरी पाहून आणि मा. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या जिद्दीतून आणि सक्रीय प्रेरणात्मक मार्गदर्शनातून साकारलेल्या या अभिनव राष्ट्रीय सेवा योजनेचे फळ म्हणून या वर्षी शिवाजी विद्यापीठाने आमच्या कॉलेजला १५० विद्यार्थिनींच्या दोन युनिटला परवानगी दिली. या १५० विद्यार्थिनींपैकी ५३ विद्यार्थिनीं शिवाजी विद्यापीठाच्या नियमानुसार " प्रौढ–शिक्षण " आणि " राष्ट्रीय सेवा योजना " अशा दोन्ही योजनेत काम करतात.

## नियमित सेवा योजना

या योजनेअंतर्गतच्या आम्ही दत्तक खेडे मौजे, चिंचवाड आणि कॉलेज परिसरात अनेक प्रकल्प आणि विविध कामे हाती घेऊन यशस्वी केली आहेत.

स्त्रिया या दुर्बल असतात. त्यांना शारीरिक कष्टाची कामे करता येत नाही. असा अनेक लोकांचा गैरसमज आहे. पण आमच्या विद्यार्थिनींनी चिंचवाडसारख्या खेडयात जाऊन रस्ता दुरुस्त करणे, शाळेच्या क्रीडांगणावरील खड्डे, दगड मातीने बुजवणे, वृक्षारोपणासाठी प्राथमिक शाळेच्या परिसरात खड्डे काढणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारे काढणे. इ. सारखी शारीरिक कष्टाची कामे करून तेथील ग्रामस्थांना आश्चर्याचा धक्का तर दिलाच पण कोल्हापूरसारख्या शहरातील सुशिक्षित मुली खेडयात येऊन काम करतात हे पाहून आमच्या प्रकल्पामध्ये ते उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

आमच्या कॉलेजचे प्राचार्य आणि प्रकल्प अधिकारी यांनी आयोजित केलेल्या " रक्षाबंधन कार्यक्रमा " निमित्य राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनींनी " सर्वपल्ली राधाकृष्णन रिमांडहोम " मधील मुलांना राख्या बांधून व खाऊ वाटून भगिनी प्रेमाला वंचित झालेल्या मुलांना दिलासा दिला. रक्षाबंधनाचा कार्यक्रम यशस्वी करण्याच्या कामी रिमांडहोममधील व्यवस्थापकांनी आम्हाला मोलाचे सहकार्य दिले. आमच्या सक्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनी कु. माधुरी कोण्णूर हिने दर शनिवारी रिमांडहोममध्ये जाऊन " बाल विकास वर्ग" हा कार्यक्रम यशस्वी केला

चिंचवाडमधील ग्रामस्थांनी आयोजित केलेल्या " कर्मवीर जयंति " या कार्यक्रमामध्ये आमच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन ग्रामस्थांना कार्यक्रम यशस्वी करण्याच्या कामी मदत केली. त्याचप्रमाणे गांधी जयंतीच्या दिवशी ग्रामस्थांचा मेळावा व दारुबंदी परिसंवाद हे कार्यक्रम घेण्यात आले. तसेच चिंचवाडची सामाजिक व आर्थिक पहाणी करण्यात आली.

कॉलेजच्या आवारात असलेल्या नारळाच्या रोपांना आणि इतर झाडांना आळी करून प्रत्येक आठवडयाला पाणी व दर महिन्याला शेणखत घालून त्यांची निगा ( संवर्धन ) राखण्याचे अत्यंत कौतुकास्पद काम आमच्या विद्यार्थिनींनी वर्षभर केलेले आहे. त्याचप्रमाणे " अशोक " वृक्षांचे कटिंग करून, काही ठिकाणी असलेल्या गाजर गवताच्या निर्मूलनाचे विशेष काम विद्यार्थिनींनी केलेले आहे.

## विशेष शिबीर

आमचे वार्षिक श्रमसंस्कार शिबीर मौजे, चिंचवाड येथे दिनांक १८।१०।८६ ते २७।१०।८६ या काळात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन मा. श्री सुभाष समुद्रविजय पाटील, सरपंच ग्रामपंचायत चिंचवाड यांच्या हस्ते झाले. शिबीरात विविध प्रकल्प हाती घेऊन ते यशस्वी केले. पहिल्या सत्रात श्रमदान व प्रचार संध्याकाळच्या सत्रात तज्ञ व नामवंत व्यक्तींची व्याख्याने, चर्चा आणि रात्रीच्या सत्रात विविध गुण दर्शन कार्यक्रम, सिनेमा व माहितीपट आयोजित केले होते.

शिबीरातील दहा दिवसांमध्ये शिबीरार्थी विद्यार्थिनींनी प्राथमिक शाळेच्या पटांगणातील खड्डे दगड–मातीने भरून काढणे, साफ–सफाई करणे, आवारात कर्दळी व फुलबाग लावणे, शाळेच्या

भोवतालच्या मेंदीच्या कुंपणाला योग्य आकार देण्याचे काम, प्राथमिक शाळेचा पूर्वीचा रस्ता दुरुस्त करणे आणि वृक्षारोपणासाठी खड्डे काढणे इ. कामे प्राथमिक शाळेसाठी केली आहेत. तर ग्रामपंचायतीच्या आवारातील नारळ, चिक्कू, पेरू, लिंबू इ. रोपांना आळी करून व पाणी घालून रोपांची निगा राखण्याचे कौतुकास्पद काम विद्यार्थिनींनी केलेले आहे. तसेच ग्रामपंचायती भोवती असलेल्या मेंदीला योग्य आकार देऊन व काटेरी कुंपण घालून आतील रोपांचे संरक्षण केले आहे.

ग्रामपंचायत, विविध सहकारी सोसायटी, प्राथमिक शाळा, गावचे रस्ते इ. ठिकाणचे गाजर गवताच्या निर्मूलनाचे काम, गावातील रस्ते दुरुस्त करणे, तसेच पावसाचे व सांडपाणी वाहून जाण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस गटारी काढण्याचे अत्यंत अवघड व शारीरिक कष्टाची कामे आमच्या विद्यार्थिनींनी केलेली आहेत.

तसेच दारूबंदी, हुंडाबंदी, अस्पृश्यता निवारण, अन्न–भेसळ प्रतिबंधक व वृक्ष संवर्धन इ. विषयावरची भितीपत्रके गावातून चिकटवून प्रचार केला. याच बरोबर प्रचलित समाजातील स्त्री सुरक्षितताविषयक कायदे, प्रौढ शिक्षण, कुटुंब नियोजन व आरोग्य, दुग्धव्यवसाय, " स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद " कर्मवीर, अन्नभेसळ प्रतिबंध, स्त्री शिक्षण काल व आज, राष्ट्रीय एकात्मता इ. विषयांवर नामवंत व तज्ञ व्यक्तींची व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित केली होती. हा उपक्रम यशस्वी करण्यामध्ये ॲडव्होकेट सौ. मंगला पाटील, श्री. व्ही. डी. जोशी, श्री. डी. एस्. निंबाळकर, प्रा. डॉ. डी. झेड. जगताप, मा. प्राचार्य श्री. आण्णासाहेब गरूड. प्रा. आर. व्ही. शेटचे श्री. एस. ए. मोरे प्रा. श्री.आर.एस. माने इ. चे सहकार्य लाभले. तसेच दंतचिकीत्सेसाठी डॉ. सूर्यकांत शिरगोपीकर आणि त्यांचे सहकारी, अंधश्रद्धा निर्मूलन प्रात्यक्षिकासाठी श्री. टी. एस्. पाटील व श्री. पी. सी. पाटील, टोमॅटो सॉस व केक तयार करणे या प्रात्यक्षिकासाठी प्रा. व्ही. एम. भोयार व विविध गुण दर्शनासाठी श्री. के. विलास कौलगेकर यांचे सहकार्य लाभले. तसेच हे विशेष शिबीर संपन्न करण्यासाठी सरपंच, ग्रामस्थ आणि प्राथमिक शाळेचे शिक्षक यांचे विशेष सहकार्य लाभले.

या नियोजित कामाशिवाय आमच्या विद्यार्थिनींची वैजापूर येथे संपन्न झालेल्या " राष्ट्रीय एकात्मता " शिबीरासाठी शिवाजी विद्यापीठातून १० विद्यार्थिनींची निवड झाली होती. त्यामध्ये आमच्या कॉलेजच्या कु. वंदना देसाई व कु. सुजाता मोरे यांची निवड झालेली होती.

याचबरोबर औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या " राष्ट्रीय एकात्मता " शिबीरासाठी शिवाजी विद्यापीठाने पाठविलेल्या १० विद्यार्थ्यांच्या संघाचे नेतृत्व आमच्या कॉलेजचे प्रा. एन. के. शितोळे यांनी केले होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत वर्षभरात आम्ही जे विविध प्रकल्प व उपक्रम कार्यान्वित केले. ते यशस्वी होण्यासाठी आमच्या विद्यार्थिनींनी नि:स्वार्थी व समर्पित भावनेने योगदान अरून शिक्षणमहर्षी, संस्थाध्यक्ष मा. श्री. व्ही. टी. पाटील तथा काकाजी यांनी अत्यंत कष्टातून उभा केलेल्या ताराराणी विद्यापीठाच्या उज्ज्वल परंपरेत आणि नावलौकिकात मोलाची भर टाकली आहे. या पाठीमागे शिक्षणमहर्षी संस्थाध्यक्ष मा. श्री. व्ही. टी. पाटील आणि मा. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.

**प्रा. श्री. तुकाराम शा. थोरात**
प्रकल्प अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

सहाय्यक सदस्य –

१) प्रा. एन्. एस्. शिरोळकर
२) प्रा. एस्. ए जाधव
३) प्रा. ए. एम्. साळोखे
४) प्रा. कु. एच्. व्ही. कुलकर्णी
५) प्रा. सौ. आर आर. हराळे
६) प्रा. कु. एम्. आर. भोसले

# प्रौढ व निरंतर शिक्षण योजना

प्रौढ साक्षरतेचा प्रश्न केवळ भारतालाच नव्हे तर सर्व जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. भारत सरकारही विद्यापीठ अनुदान मंडळ, शिक्षण संस्था, व स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून प्रौढ साक्षरतेची मोहीम राबवित आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळ संचलित आणि शिवाजी विद्यापीठामार्फत राबविली जाणारी 'प्रौढ शिक्षण योजना' आमच्या कॉलेजने गतवर्षीपासून अंगिकारली आहे. गतवर्षी आम्ही एकंदर पांच प्रौढ शिक्षण केंद्रे चालविली होती. तसेच गतवर्षीपासून सुरू झालेल्या 'कार्यात्मक जनसाक्षरता मोहीमेत' आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सक्रीय भाग घेतला. डि. ८ सप्टेंबर १९८६ रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनामित्त कार्यात्मक साक्षारता सिद्धीस नेण्यासाठी आम्ही भजन साक्षारता दिंडी, स्थानिक वर्तमानपत्रांतून लेख, आदी उपक्रम साजरे केले. याच दिवशी आमच्या महाविद्यालयातील एन्. एस्. एस् व बिगर एन्. एस्. एस्, मधील एकंदर ९२ विद्यार्थिनींनी कार्यात्मक साक्षरता मोहिमेत स्वयंस्फूर्त सहभाग घेतला.

१९८७ च्या वर्षासाठी शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागाने आमच्या महाविद्यालयात १० केंद्रे चालविण्यास परवानगी दिली आहे.

त्याचप्रमाणे या विभागाने " प्रौढ शिक्षण संघटक प्रशिक्षणाची' जबाबदारी आमच्या महाविद्यालयावर सोपविली होती. त्यास अनुसरून दि. १ जानेवारी, १९८७ ते ६ जाने. १९८७ या कालावधीमध्ये आमच्या महाविद्यालयात " प्रौढ शिक्षण संघटक शिबीर " संपन्न झाले. या शिबिरामध्ये एकंदर ४६ शिबिरार्थींना प्रशिक्षण दिले. शिबिरार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील; प्रा. डी. यु. पवार; जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी– मा. एस. एन. पवार, डॉ. देवस्थळी, डॉ. भालबा विभूते, प्रा. सौ. अनुराधा गुरव, डॉ. सारंग, प्रा. विश्वासराव यादव, प्रा. मुरलीधर जगताप, प्रा. बी. एम. पाटील इ. तज्ञांची व्याख्याने आणि श्री. रंगराव मांडरे यांचे एक खास कृतीसत्र आयोजित केले होते.

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. विद्या पोवार, कु. अनिता पाटील, कु. सुवर्णा शिंदे, कु. विमल शिर्के, कु. लक्ष्मी कुरणे तसेच सौ. सुमन जगताप, सौ. माधवी नरके, सौ. मिनाक्षी सुतार, श्री. उदयसिंह घाटगे यांनी कोल्हापूर परिसरातील राजारामपुरी, मुडशिंगी, उचगांव, चिंचवाड, नेहरुनगर, सदर बाजार, भोसलेवाडी, कदमवाडी, या ठिकाणी प्रौढ शिक्षण केंद्रे सुरु केली आहेत. साक्षरता, जाणीव जागृती व कार्यात्मकता ही राष्ट्रीय उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून ही योजना डोळसपणे चालविण्याचे कार्य आमचे संघटक करीत आहेत.

या योजनेसाठी आमच्या महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व सहकारी प्राध्यापक आणि कार्यालयीन कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले.

**प्रा. जे. बी. पाटील**
पर्यवेक्षक

**प्रा. एस. एन. कोळेकर**
प्रकल्प अधिकारी

# " प्राध्यापक प्रबोधिनी "

वेगवेगळच्या विषयांचा सखोल अभ्यास करणाऱ्या प्राध्यापकांचा वैचारिक सुसंवाद घडवून आणण्याच्या हेतूने यावर्षी प्रथमच या मंडळाची स्थापना करण्यात आली. या प्रबोधिनीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते झाले.
" राष्ट्रीय एकात्मता गरज " या विषयावरील त्यांचे मार्गदर्शक विचार त्यासोबत इतर प्राध्यापकांसमवेत रंगलेली चर्चा हा या नव्या उपक्रमाचा विशेष ठरला. त्यानंतरचे दुसरे व्याख्यान पुष्प गुंफले, अर्थशास्त्राचे प्राध्यापक श्री. एस्. ए. जाधव यांनी ' नवे आर्थिक धोरण ' या विषयावरील त्यांचे मनोगत आणि त्यानंतरची चर्चा त्यामुळे याही कार्यक्रमास रंगत आली. विभागातर्फे अंतिम व्याख्यान पुष्प गुंफण्याचा मान मानसशास्त्राच्या प्राध्यापिका सौ. एल्. टी. मगदूम यांनी घेतला. विकृतवर्तन यावरील त्यांचे अभ्यासपूर्ण विचार आणि त्याविषयीची रंगलेली, प्रश्नोत्तरे अशा पद्धतीने 'प्राध्यापक प्रबोधिनीने ' आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न केला. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे सहकार्य लाभले व इतर प्राध्यापक वक्त्यांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल विभाग यांचा ऋणी आहे.

**प्रा. हेमा कुलकर्णी**
प्राध्यापक प्रबोधिनी विभाग प्रमुख

# " हिन्दी विभाग "

## गतिविधियाँ

हमारे महाविद्यालयका हिन्दी विभाग एक सदृढ एवं गतिशील और क्रीयाशील विभाग है । साहित्यिक, सांस्कृतिक एवं अध्ययन के क्षेत्रमें वह लगातार प्रगति पथपर है । हिंदी भाषाकों अध्ययन करनेवाली सभी छात्राएँ अच्छे अंकोके साथ उत्तीर्ण होती रही है । साहित्यिक गतिविधियोंमे ' गुंजारव ' हस्तलिखित पत्रिकामें हमारी कु. शाहिस्ता शेख, कु. अनिता भोसले, कु. सुनिता कोळेकर, कु. विद्या पाटील, कु. अनुपमा घेवडे, आदि छात्राओंने अनेक कविताएँ, कहानियाँ और निबंधों को लिखा । ' हिन्दी दिवस ' हमारे विभाग का त्यौहार है । इस त्यौहार पर परम्पराके अनुरुप हिन्दी के प्रचारक एवं प्रसारक प्रा. शरदचंद्र कणबरकरजी को प्रमुख अतिथि के रुपमें निमंत्रित किया गया था । उन्होंने अपनी रसीली भाषासे हम सबको प्रभावित किया । इस अवसरपर हमारे महाविद्यालय की छात्राओंने एक मनोरंजनका समारोह आयोजित किया था । इसमें गीत, कविता, शायरी, गझल, अभिनय और नृत्य ने चार चाँद लगाए थे । इस रंगारंग कार्यक्रम से सभी प्रभावित हुए ।

हमारे विभागकी गतिविधियोंकी प्रशंसा के हेतू भारत सरकारके ' केन्द्रिय हिन्दी निदेशालय ' ने इस वर्ष भी ग्रंथ सहायता की । इन ग्रंथो में हमारी माँग के अनुसार प्रतिभाशाली साहित्यकारोंकी साहित्य कृतियाँ और समीक्षा ग्रंथ है । हम भारत सरकारके ऋणी है । हिन्दी भाषा की अध्ययन में रुच्ची बढाने के अवसरोंपर हमारे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटीलजीका हमेशा सहयोग रहा है ।

**प्रा. सौ. सुमित्रा बाबासाहेब पोवार**
अध्यक्ष हिन्दी विभाग

## ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज,

### प्राचार्य, डॉ. क्रांतीकुमार पाटील, एम्. ए. पीएच्. डी.

## प्राध्यापक वर्ग

### सिनिअर कॉलेज

**इंग्रजी**

प्रा. श्री. जे. बी, पाटील एम्. ए.

प्रा. श्रीमती एस्. आर. साळुंखे एम्. ए, एम्.फिल्

**मराठी**

प्रा. श्रीमती एम्. आर. भोसले एम्. ए.

**हिंदी**

प्रा. श्रीमती सुमित्रा पोवार एम्. ए. बी. एड्.

**अर्थशास्त्र**

प्रा. एन्. के. शितोळे एम्. ए.

प्रा. श्री. एस्. ए. जाधव एम्. ए.

प्रा. श्रीमती आर. आर. हराळे एम्. ए.

**समाजशास्त्र**

प्रा. श्री. टी. एस्. थोरात एम्. ए.

प्रा. श्री. ए. एम्. साळोखे एम्. ए.

**इतिहास**

प्रा. श्री. एन्. एस्. शिरोळकर एम्. ए. एम्. फिल्

**मानसशास्त्र**

प्रा. श्री. एस्. बी. निंबाळकर एम्. ए.

**गृहशास्त्र**

प्रा. श्रीमती व्ही. एम्. भोयार एम्. एस्. सी.

**वाणिज्य विभाग**

प्रा. श्रीमती एच्. व्ही. कुलकर्णी एम्. कॉम.

प्रा. श्री. एस्. व्ही. बागल एम्. कॉम.डी.एच्.ई.

प्रा. श्रीमती एम्. एस्. पाटील एल् एल्. एम्.

प्रा. श्रीमती ए. जी. कुलकर्णी एम्. एस्. सी.

**फिजिकल डायरेक्टर**

प्रा. श्रीमती एस्. एच्. देशपांडे एम्. पी. एड्.

### ज्युनिअर कॉलेज

**इंग्रजी**

प्रा. श्री. एस्. एन्. कोळेकर एम्. ए. बी. एड्.

**मराठी**

प्रा. श्रीमती व्ही. ए. माडगूळकर एम्. ए. एम्. फिल्. डी. एच्. ई.

**हिंदी**

प्रा. श्रीमती बी. व्ही. चव्हाण एम्.ए.डी.एच् ई.

**अर्थशास्त्र**

प्रा. श्रीमती आर. व्ही. आंबवडे एम् ए.बी.एड्.

प्रा. श्रीमती के. आर. कुलकर्णी एम्. ए. डी. एच्. ई.

**समाजशास्त्र**

प्रा. डॉ. श्रीमती एस्. एस्. सारंग एम्. ए. पी. एच्. डी.

**मानसशास्त्र**

प्रा. श्रीमती एल्. टी. मगदूम एम्. ए.

**वाणिज्य विभाग**

प्रा. श्री. ए. एल्. नरके एम्. कॉम एम्. फिल्. डी. एच्. ई.

प्रा. श्रीमती यु. डी. इंदूलकर एम्. कॉम. डी. एच्. ई.

प्रा. श्री. पी. पी. कुलकर्णी एम्. कॉम.

**फिजिकल डायरेक्टर**

प्रा. श्रीमती एस्. एस्. पाटील एम्. ए. बी. पी. एड्.

## शिक्षकेतर सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. जे. पी. जाधव | एम.ए. डीप् लिब् | ग्रंथपाल |
| श्री. एम. व्ही. शिंदे | बी. ए. | मुख्य लेखनिक |
| श्री. बी. डी. सुतार | | ज्येष्ठ लेखनिक |
| श्री. पी. आर पाटील | बी. कॉम. | लेखनिक |
| श्रीमती यु. पी. शिराळकर | | ,, |
| श्रीमती व्ही. जे. सरनोबत | | ,, |

| | |
|---|---|
| श्री. व्ही. एस. मोटे | शिपाई |
| श्री. सी. एम. स्वामी | ,, |
| श्री. व्ही. एम. चिमणे | ,, |
| श्री. के. व्ही. शिंदे | ,, |
| श्री. एच. एम. संकपाळ | ,, |

ताराराणी विद्यापीठास काही हितचिंतक आणि दानशूर लोकांनी देणग्या दिलेल्या आहेत. त्या रकमेच्या वार्षिक व्याजातून अभ्यासामध्ये विशेष गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना पुढील बक्षिसे दिली जातात.

# ताराराणी विद्यापीठ ट्रस्ट शिष्यवृत्त्या

| अ. क्र. | देणगीदाराचे नांव | स्मरणार्थ | देणगी रक्कम रुपये | बक्षीस रक्कम रुपये | पारितोषिकासाठी आवश्यक असलेली गुणवत्ता | रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | |
| १. | भावनगर महाराज. | -- | ३,००० | ३०० | ११ वी आर्टस् सर्वप्रथम. | – १०० |
| | | | | | ११ वी कॉमर्स सर्वप्रथम | – १०० |
| | | | | | १२ वी कॉमर्स सर्वप्रथम. | – १०० |
| २. | कोल्हापूर केनल क्लब. | -- | १,००० | १०० | १२ वी कॉमर्स अकौंन्टसी सर्वप्रथम. | – ५० |
| | | | | | १२ वी इंग्रजी विषयात सर्वप्रथम. | – ५० |
| ३. | श्री दिनकर द. पाटील. | पत्नी कै. सौ. सुमन दिनकर पाटील. | १,००० | १०० | १२ वी आर्टस् सर्वप्रथम | – १०० |
| ४. | श्री. बाबूराव रांजदेकर. | मातोश्री कै. इंदिरा रा. राजंदेकर. | ५,००० | ५०० | बी. ए. भाग – १ सर्वप्रथम. | – १०० |
| | | | | | बी. कॉम. भाग – १ सर्वप्रथम. | – १०० |
| | | | | | बी. ए. भाग – २ सर्वप्रथम. | – १०० |
| | | | | | बी. कॉम. भाग – २ सर्वप्रथम. | – १०० |
| | | | | | राष्ट्रीय स्तरावर निवड झालेल्या क्रिडापटूस. | – १०० |
| ५. | श्री. रामराव स. बेनाडीकर. | मातोश्री कै. सौ. मापिकबाई स. बेनाडीकर. | १,००० | १०० | बी. ए. भाग – १ कंम्पलसरी इंग्रजी सर्वप्रथम. | – ५० |
| | | | | | बी. कॉम. भाग – १ अकौंटन्सी सर्वप्रथम. | – ५० |
| ६. | श्री. विजयसिंह स. बेनाडीकर. | मातोश्री कै. सौ. शकुंतलाबाई स. बेनाडीकर. | १,००० | १०० | बी. ए. भाग – २ कंम्पलसरी इंग्रजी सर्वप्रथम. | – ५० |
| | | | | | बी. कॉम. भाग – २ अकौंटन्सी सर्वप्रथम | – ५० |
| ७. | श्री. रंगराव वि. पाटील. | हुतात्मा राजेंद्र रंगराव पाटील. | १,००० | १०० | बी. ए. (स्पेशल) भाग-३ समाजशास्त्र सर्वप्रथम. | – १०० |
| ८. | श्री. व्ही. टी. पाटील. | भगिनी श्रीमती भागिरथीबाई आ. पाटील यांच्या नांवे. | १,००० | १०० | बी. ए. (स्पेशल) भाग – ३ अर्थशास्त्र सर्वप्रथम. | – १०० |

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रुपये | रुपये | | | रुपये |
| ९. | श्री. बी. एन. मेढें – पवार. | मातोश्री श्रीमती भागिरथीबाई भ्र. मेढे – पवार. | १,००० | १०० | बी. कॉम. (स्पेशल) भाग– ३ इंडस्ट्रियल मॅनेजमेंट विषयांत सर्वप्रथम. | – | १०० |
| १०. | सौ. राजलक्ष्मी आ. जाधव. | सासूबाई भागिरथीबाई भा. जाधव. | १,००० | १०० | बी. कॉम. (स्पेशल) भाग– ३ अॅडव्हान्सड अकौंटिग व ऑडिटिंग विषयात सर्वप्रथम. | – | १०० |
| ११. | श्री. श. रा. वाघ. | कै. गंगूबाई बा. काळे. | १,००० | १०० | बी. ए. (स्पेशल) भाग– ३ हिंदी सर्वप्रथम. | – | १०० |
| १२. | श्रीमती गुलाबबाई कागलकर. | कन्या बेबी यांचे स्मरणार्थ. | ५,०० | ५० | बेस्ट एन. सी. सी. कॅडेट | – | ५० |
| १३. | श्री. व्ही. टी. पाटील. | आत्या गौजराबाई रा. पाटील यांच्या स्मरणार्थ. | ५,०० | ५० | बेस्ट एन. एस. एस. कॅडेट | – | ५० |
| १४. | देवस्थान मंडळ. | –– | ५,००० | ५०० | बी. ए. (स्पेशल) भाग– ३ होमसायन्स सर्वप्रथम. | – | १०० |
| | | | | | राज्यस्तरावर निवड झालेल्या क्रीडापटूस. | – | ५० |
| | | | | | विद्यापीठ झोनल क्रीडास्पर्धेत सर्वप्रथम. | – | ५० |
| | | | | | विद्यापीठ झोनल क्रीडास्पर्धेत सर्वप्रथम. | – | ७५ |
| | | | | | १२ वी मराठी विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी अर्थशास्त्र विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी हिंदी विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी आर्टस् समाजशास्त्र विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी आर्टस् मानसशास्त्र विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी आर्टस् इतिहास विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी कॉमर्स सेक्रेटरीयल प्रॅक्टीस सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी कॉमर्स व्यापार संघटन विषयात सर्वप्रथम. | – | २५ |
| | | | | | १२ वी आर्टस् होमसायन्स विषयात सर्वप्रथम. | – | २५ |

॥ निर्मातुं शिव सुंदरम ॥

## ताराराणी विद्यापीठाचे

# कमला कॉलेज, कोल्हापूर

## [ कला-वाणिज्य ]

## ( संस्थापक - अध्यक्ष : श्री. व्ही. टी. पाटील )

ताराराणी विद्यापीठाने जून १९८४ मध्ये या महिला महाविद्यालयाची स्थापना केली. या महिला महाविद्यालयाद्वारे महिलांसाठी विविध शैक्षणिक उपक्रम सुरू करून, बदलत्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी तिची मानसिक जडणघडण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असून, येथे बी. ए. भाग १ ते ३ व बी. कॉम. भाग १ ते ३ या वर्गाच्या अध्यापनाची सोय आहे. तसेच ११ वी, १२ वी चे कला व वाणिज्य शाखेचे वर्गही या महाविद्यालयात सुरू आहेत.

**-: वैशिष्टचे :-**

- मुलींच्या विकासाला पोषक असे संपूर्णतः सुरक्षित वातावरण.
- अभ्यासाबरोबर ललित कला, क्रीडा, वाङ्मय इ. विविध विषयातील गुणांना प्रोत्साहन.
- विद्यार्थिनींसाठी सुसज्ज वसतिगृहाची कॉलेजच्या आवारात सोय.
- ताराराणी विद्यापीठ व सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ विश्वस्त मंडळामार्फत प्रत्येक वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या व इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थिनींना खास पारितोषिके :-
- एच्. एस्. सी व शिवाजी विद्यापीठ परीक्षा यातील निकालांची उज्ज्वल परंपरा.
- १२ वी साठी उन्हाळी सुट्टीत इंग्रजी व अकौन्टसी विषयाचे खास वर्ग.
- १२ वी च्या हुषार विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र "स्कॉलर बॅच" व दर्जेदार मार्गदर्शनाची सोय.
- बी. ए. भाग ३ साठी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, हिंदी व गृहशास्त्र व बी. कॉम्. भाग- ३ साठी ॲडव्हान्स अकौंटिंग व ऑडिटींग, इंडस्ट्रिअल मॅनेजमेंट या विषयांची विशेष स्तरावर सोय.
- कॉमर्स शाखेकडील ज्युनिअर व सिनियर वर्गांना इंग्रजी माध्यमांतून शिकविण्याची सोय.
- विद्यार्थिनींना वर्षभर अभ्यासासाठी क्रमिक पुस्तकांचा संच बुक बँकेतून देण्याची सोय.
- गरीब व होतकरू विद्यार्थिनींना सर्वतोपरी सहाय्य.

**कॉलेजची वेळ- सकाळी ७-३० ते १२.** **प्राचार्य**

॥ निर्मातुं शिवसुंदरम् ॥

# ताराराणी विद्यापीठ

राजारामपुरी, कोल्हापूर

## कार्यविस्तार

- बाल भवन, कोल्हापूर
- ताराराणी मराठी शाखा, कोल्हापूर
- उषाराजे गर्ल्स हायस्कूल, कोल्हापूर
- ताराराणी ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन कोल्हापूर.
- कुमार भवन, कडगाव
- कमला कॉलेज ( आर्टस् व कॉमर्स ), कोल्हापूर
- ताराराणी महिला वसतिगृह, कोल्हापूर
- ताराराणी विद्यापीठ पगारदार नोकरांची विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि., कोल्हापूर
- श्री विश्वनाथ को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., कोल्हापूर

दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स अॅक्ट
नियम ८ फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

प्रकाशन स्थळ–ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रकाशन काळ–वार्षिक

मुद्रकाचे नाव– दि. गं. कुलकर्णी, राजहंस प्रेस, कोल्हापूर

राष्ट्रीयत्व–भारतीय

पत्ता–२०५ ब/२७ नागाळा पार्क, कोल्हापूर

प्रकाशकाचे नाव–प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार रं. पाटील

राष्ट्रीयत्व–भारतीय

पत्ता–कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, राजारामपुरी, कोल्हापूर

संपादकाचे नाव–प्रा. सौ. वरदा माडगूळकर

राष्ट्रीयत्व–भारतीय

पत्ता–कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

मालकी–कमला महाविद्यालय, ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

मी डॉ. के आर. पाटील जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य, डॉ. क्रांतीकुमार रं. पाटील**

# स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे -

कविवर्य ' सुधांशु ' व मान. श्री. काकाजी यांच्या समवेत



' कमला ' कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व सेवक वर्ग

आणि



वर्ग प्रतिनिधी


ताराराणी विद्यापीठ
कमला कॉलेज
कमला कॉलेज